नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ३०० | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### ‘महिंद्रा’ने बाजारात आणली 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'

मुंबई (स. गांवकरी) : भारतातील आघाडीची एसयूव्ही उत्पादक कंपनी महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड हिने ‘एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी’ ही आपली पहिली सर्वसामान्य ग्राहकांसाठीची सीएनजी प्रवासी कार बाजारात आणली आहे. या गाडीची सुरुवातीची किंमत ९.९९ लाख रुपये आहे. ‘एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी’मुळे सीएनजी गाड्यांमधूनही वेगवान आणि उत्साही ड्रायव्हिंगचा अनुभव घेता येतो, हे दिसून येईल. या गाडीत टर्बोचार्ज्ड इंजिन आहे. सीएनजी आणि पेट्रोल या दोन्ही प्रकारच्या इंधनांवर हे इंजिन ८२ किलोवॅट शक्ती आणि २०० एनएम टॉर्क देते. ही गाडी प्रति किलो सीएनजीमध्ये २४.७ किलोमीटरचे प्रमाणित मायलेज देते.

### मंचर बायपासवर अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

मंचर (स. गांवकरी) : निघोटवाडी गावच्या हद्दीत नाशिक-पुणे मंचर बायपास मार्गावरील पुलाजवळ मोटारीतून गोमांसाची वाहतूक होत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मंचर पोलिसांनी शुक्रवार दि.१६ रोजी सकाळी केलेल्या कारवाईत २५० किलो मांस आणि मोटार असा एकूण दोन लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून, तिसऱ्या संशयिताचा शोध सुरू आहे. मंचर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डायल ११२ वर मोटारीतून गोमांसाची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली होती.त्यानुसार मंचर पोलिसांनी निघोटवाडी हद्दीत बायपास मार्गावरील पुलाजवळ जाऊन संबंधित मोटारीची तपासणी केली.त्या वेळी मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर मोटारीत काळ्या रंगाच्या प्लास्टिक पिशव्यांमध्ये भरलेले अंदाजे २५० किलो मांस आढळले.त्याची किंमत ५० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.तसेच दोन लाख रुपये किमतीची मोटारही जप्त करण्यात आली.या प्रकरणी अझरुद्दीन साबुद्दीन पटेल (वय ३२, रा.शुक्रवार पेठ, जुन्नर) आणि शहानवाज मुक्तार कुरेशी (वय ३२, रा.पनसुबा पेठ, जुन्नर) यांना अटक करण्यात आली आहे.

### शिरदाळे येथील दगडखाणीत कॉम्प्रेसरला आग

मंचर (स. गांवकरी) : आंबेगाव तालुक्यातील शिरदाळे गावच्या हद्दीतील दगडखाणीत कॉम्प्रेसर यंत्राच्या वायरी आणि दोन बॅटऱ्या जळाल्याची घटना उघडकीस आली आहे. शनिवार दि.१० रात्री नऊ ते रविवार दि.११ रोजी सकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान ही घटना घडली.याप्रकरणी पारगाव (कारखाना) पोलीस ठाण्यात जळीत नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संभाजी रभाजी पडवळ (वय ६१) यांची शिरदाळे गावच्या हद्दीतील गट क्रमांक ४ मधील दगडखाण आहे.शनिवार दि.१० रोजी सकाळी नेहमीप्रमाणे दगडखाणीचे काम सुरू करण्यात आले होते.रात्री नऊ वाजता काम बंद करून कामगार घरी गेले. त्यावेळी कॉम्प्रेसर यंत्र दगडखाणीतच ठेवण्यात आले होते.दुसऱ्या दिवशी सकाळी कामगार दगडखाणीत आले असता कॉम्प्रेसर यंत्राच्या वायरी आणि दोन बॅटऱ्या जळालेल्या अवस्थेत आढळल्या.रात्री यंत्र बंद केले, त्या वेळी वायरी व बॅटऱ्या सुस्थितीत होत्या. त्यामुळे अज्ञात कारणामुळे आग लागून यंत्राचे नुकसान झाल्याची खबर पडवळ यांनी पोलिसांना दिली. या घटनेची नोंद दि.१६ रोजी पारगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली.

# राहता तालुका टंचाई आढावा बैठक

## उपलब्ध पाण्याचे सूक्ष्म नियोजन आणि जलस्रोतांचे बळकटीकरण करावे- पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

शिर्डी : (स. गांवकरी)

टंचाई निवारण्यासाठी उपलब्ध पाण्याचे सूक्ष्म नियोजन करण्याबरोबरच पाणी स्रोताचे बळकटीकरण मध्ये, दुरुस्ती, खोलीकरण करावे, तसेच ग्रामविकास व महसूल, महावितरण आणि पाणीपुरवठा कृषी आणि पशुसंवर्धन या विभागाने समन्वयाने काम करण्याचे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

राहता येथे तालुकास्तरीय टंचाई आढावा बैठकीचे आयोजन कुंदन हॉल येथे करण्यात आले होते. यावेळी शिर्डी नगराध्यक्ष जयश्री थोरात, उपनगर अध्यक्ष अभय शेळके, राहता नगर परिषदेचे नगराध्यक्ष स्वाधीन गाडेकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी , प्रभारी जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधीर बोराळे, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त उमेश पाटील, तहसीलदार अमोल मोरे, गटविकास अधिकारी विवेक गुंड,यांच्यासह कृषी, पशुसंवर्धन जलसंपदा, महावितरण व सर्व विभागाचे तालुकास्तरीय विभाग प्रमुख, शेतकरी , नागरिक,उपस्थित होते.



पाणी टंचाईच्या निवारणार्थ विविध पाण्याचे स्रोत बळकटीकरण करण्यासाठी कालवे , सिंचन विहिरी, नाले आणि बंधाऱ्याच्या दुरुस्ती करून पाण्याची पाणी गळती थांबावे यासाठी स्वच्छता करण्यात यावी. यासाठी जलसंपदा विभागाने पुढाकार घेतलेला आहे .यात महावितरण कंपनी आणि संबंधित यंत्रणेने पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी आवश्यक असलेला वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा. वारंवार येणाऱ्या शेजाऱ्याच्या विजेचा प्रश्न उद्भवू नये यासाठी योग्य वीजप्रवाह करण्यावर तांत्रिक बाबतीत दक्षता घ्यावी.

लग्न सोहळे व विविध उत्सवातील खर्च कमी करावा- राज्यातील टंचाईची परिस्थिती पाहता लग्न सोहळे व विविध उत्सवावर होणारा खर्च कमी करण्याचे आवाहन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

कृषी विभागाने कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ट्रॅक्टर आणि विविध अवजारासाठी असलेले अनुदान शेतकऱ्यांना वेळेत उपलब्ध करून द्यावे, शिर्डी आणि राहता नगर परिषदेने पाणी वापराबाबत नागरिकांमध्ये जाणीव जागृती करून पाण्याचा जपून आणि काटकसरीने योग्य वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. आढावा बैठकीनंतर जिल्हा परिषदेचा सामान्य प्रशासन विभागाअंतर्गत अनुकंपा तत्त्वावर देण्यात आलेल्या उमेदवारांना नियुक्ती पत्राचे वितरण पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले .यामध्ये आदित्य अनाम, युवराज डोईफोडे, जीविका खांडेकर, प्रवीण पुणेकर, ललिता साळवे प्रथमेश कुसळेकर रिहान खान यांच्यासह इतर उमेदवारांना यांना लिपिक, कनिष्ठ अभियंता, शिक्षक सेवक, ग्रामपंचायत अधिकारी व अन्य पदावरील नियुक्ती पत्राचे वितरण केले.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी आरोपीस दहा वर्षे सश्रम कारावास

## राजगुरुनगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाचा निकाल

राजगुरुनगर : (स. गांवकरी)

पिस्तुलाचा धाक दाखवत अल्पवयीन मुलीला पळवून नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीला राजगुरुनगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने १० वर्षे सश्रम कारावास आणि पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. कृष्णा राजपूत उर्फ विजयकुमार स्वरगीदास जठार उर्फ विजयकुमार रामदिन चढार (वय २५) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

थोडक्यात माहिती अशी की खेड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात राहणाऱ्या १७ वर्षीय मुलीची आरोपीशी ओळख झाली होती. त्यातून त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले. आरोपीने मुलीला त्याच्या गावी जायचे आहे असे सांगितले. तिने नकार दिल्यानंतर पिस्तुलाचा धाक दाखवून तिला चाकणमार्गे पुणे रेल्वे स्थानकावर आणले आणि रेल्वेने मध्यप्रदेशातील त्याच्या गावी नेले. तेथे तिच्यावर जबरदस्तीने शरीरसंबंध ठेवले. त्यानंतर सुमारे तीन महिने ती आरोपीच्या गावी राहिली. पुढे ती आपल्या मूळ गावी परत आली. दरम्यान, १५ जून २०१७ रोजी सकाळी आरोपी मुलीच्या गावात आला. पीडिता दूध आणण्यासाठी दुकानात गेली असता आरोपीने तिचा हात धरून तिला सोबत नेण्याचा प्रयत्न केला. तिने विरोध केल्याने आरोपीने पिस्तुलातून तिच्या छातीत गोळी झाडली.त्यात ती गंभीर जखमी झाली होती. त्यानंतर महामार्गावरून पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला पीडितेच्या नातेवाइकांनी आणि नागरिकांनी पकडले. त्याच्याकडील पिस्तूल व चाकूसह त्याला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. जखमी मुलीवर राजगुरुनगर येथील खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. पीडितेच्या जबाबावरून खेड पोलिस ठाण्यात आरोपीविरोधात भारतीय दंड विधानातील कलम ३०७, ३६३, ३७६, ३६६, पॉक्सो कायद्यातील कलम ४, ६, ८, १०, १२ तसेच आर्म्स ॲक्टच्या कलम ३ व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन सहाय्यक पोलिस निरीक्षक गणेश म्हस्के यांनी तपास करून आरोपीला अटक केली.

हा खटला राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश बी. एस. वावरे यांच्या न्यायालयात सुरू होता. या खटल्यात सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील विकास देशपांडे आणि वसंत वाळेकर यांनी काम पाहिले. सरकारी पक्षाच्या वतीने एकूण १३ साक्षीदार तपासण्यात आले. पीडित मुलगी आणि डॉक्टर यांची साक्ष महत्त्वपूर्ण ठरली. न्यायालयाने आरोपीला १० वर्षे सश्रम कारावास आणि पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. न्यायालयीन पोलिस कामकाज हवालदार जाधव यांनी पाहिले.

# सणासुदीतील अन्नभेसळीविरोधात प्रशासनाची धडक कारवाई

नांदेड : (स. गांवकरी)

सणासुदीच्या काळात नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत ‘सुरक्षित अन्न, सुरक्षित महाराष्ट्र’ ही राज्यव्यापी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत नांदेड जिल्ह्यात नवरात्रोत्सव सुरू झाल्यापासून 32 आस्थापनांची तपासणी करण्यात आली. यामध्ये भेसळीचा संशय असलेली मिरची पूड, हळद पूड, धने पूड आणि मीठ या पदार्थांचा एकूण 25 हजार 832 किलो साठा जप्त करण्यात आला आहे. त्याची किंमत 29 लाख 17 हजार 172 रुपये आहे,

अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेंतर्गत तपासणीदरम्यान 53 अन्न नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत. आढळलेल्या त्रुटींबाबत 13 आस्थापनांना सुधारणा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. विना नोंदणी व्यवसाय करणाऱ्या एका आस्थापनेला व्यवसाय तत्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सुधारणा नोटीस देऊनही त्रुटींची पूर्तता न करणाऱ्या एका आस्थापनेचा परवाना निलंबित करण्यात आला आहे. तसेच चार आस्थापनांविरुद्ध तडजोडीची प्रकरणे दाखल करून 21 हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

माहूरगड येथे होणाऱ्या शारदीय नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवरही प्रशासनाने विशेष तपासणी केली. यामध्ये 15 अन्न आस्थापनांची तपासणी करून 16 अन्न नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले. संबंधित व्यावसायिकांना स्वच्छतेचे नियम काटेकोरपणे पाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सणासुदीच्या काळात ग्राहकांनी परवानाधारक विक्रेत्यांकडूनच अन्नपदार्थ खरेदी करावेत. पॅकबंद पदार्थ खरेदी करताना त्यांची मुदत तपासावी.

# पोलीस पंच मोहन सोनवणे यांच्यावर उपासमारीची वेळ!

## वरिष्ठ पोलीस अधिकारी गब्बर, पण पोलिसांना मदत करणाऱ्या पंचांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर!

नवी मुंबई : (स. गांवकरी)

गुन्ह्यांचा तपास करताना पोलिसांना पंचांची मदत महत्त्वाची ठरते. पंचांच्या उपस्थितीत आणि स्वाक्षरीने अनेक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्या जातात. मात्र, गेल्या ३५ वर्षांपासून पोलिसांना इमानेइतबारे सहकार्य करणाऱ्या पोलीस पंच मोहन सोनवणे यांच्यावरच उपासमारीची वेळ येत असेल, तर त्यांनी न्याय मागायचा कोणाकडे? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

मोहन सोनवणे यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील विविध पोलीस ठाण्यांच्या आणि शाखांच्या कामकाजात पंच म्हणून सहकार्य केले आहे. रात्री-अपरात्री पोलिसांना मदतीसाठी धावून जाणे, आरोपींवरील कारवाईच्या वेळी पंच म्हणून उपस्थित राहणे आणि न्यायालयात सत्य परिस्थिती मांडणे, अशी कामे त्यांनी अनेक वर्षे केली आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे. आरोपींना कायद्यानुसार शिक्षा होण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या पंचांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न मात्र ऐरणीवर आला आहे. पोलिसांना गरज असेल तेव्हा पंचांची मदत घ्यायची आणि त्यानंतर त्यांच्या अडचणींकडे दुर्लक्ष करायचे, अशी परिस्थिती असेल तर या व्यवस्थेने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

### पोलीस आयुक्तांकडे लेखी निवेदन

पोलीस पंच मोहन सोनवणे यांनी आपल्या समस्यांबाबत पोलीस आयुक्तांना लेखी पत्र देऊन व्यथा मांडल्याचे समजते. त्यामुळे आता पोलीस आयुक्त या प्रकरणाची दखल घेऊन पंचांच्या अडचणी जाणून घेणार का, त्यांना योग्य मदत मिळण्यासाठी काही उपाययोजना करणार का, याकडे लक्ष लागले आहे.

सोनवणे यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी आजपर्यंत न्यायालयात दिलेल्या साक्षीत सत्य परिस्थिती मांडण्याची भूमिका कायम ठेवली आहे. त्यांच्या साक्षीमुळे काही प्रकरणांमध्ये आरोपींना कायद्यानुसार शिक्षा होण्यास मदत झाली आहे. असे असतानाही पोलिसांना सहकार्य करणाऱ्या पंचाच्या आर्थिक अडचणींकडे लक्ष दिले जात नसेल, तर ही बाब गंभीर आहे.

पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना लाखो रुपयांच्या आसपास वेतन मिळत असताना, पोलिसांच्या कामकाजात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या पंचांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न का सुटत नाही, असा सवाल उपस्थित होत आहे.

पोलिसांना सहकार्य करताना आरोपींची नाराजी पत्करण्याची आणि संभाव्य धोके सहन करण्याची वेळ पंचांवर येऊ शकते. अशा परिस्थितीत त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक सुरक्षिततेचा विचार होणे आवश्यक आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कथित अतिरिक्त उत्पन्नाबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मात्र, अशा उत्पन्नाचे स्रोत किंवा गैरव्यवहार याबाबत कोणताही निष्कर्ष काढण्यापूर्वी संबंधित बाबींची निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे आहे.

३५ वर्षांच्या सहकार्याची हीच परतफेड आहे का? हा प्रश्न केवळ मोहन सोनवणे यांच्यापुरता मर्यादित नसून, पोलिसांना सहकार्य करणाऱ्या पंचांच्या आर्थिक आणि सामाजिक सुरक्षिततेशी संबंधित आहे.

# शेतकऱ्यांना मोठा दिलासाः खा. अशोकराव चव्हाण

## भाजप महायुती शेतकऱ्यांच्या पाठीशीः आ. श्रीजया चव्हाण

मुदखेड : (स. गांवकरी)

दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या नवीन यादीत नांदेड जिल्ह्यातील मुदखेड आणि मुखेड या दोन तालुक्यांचा समावेश केल्याने संपूर्ण जिल्ह्याला दुष्काळी सवलतींचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हा निर्णय शेतकरी व सर्वसामान्यांना मोठा दिलासा देणारा आहे, अशी प्रतिक्रिया माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी व्यक्त केली आहे. तर, या निर्णयातून भाजपा महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे दिसून येते, असे आ. श्रीजया चव्हाण यांनी म्हटले आहे.



या संदर्भात प्रतिक्रिया व्यक्त करताना खा. अशोकराव चव्हाण म्हणाले की, सुरुवातीला काही तांत्रिक कारणांमुळे मुदखेड व मुखेड या तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश होऊ शकला नव्हता. मात्र, त्यानंतर वस्तुनिष्ठ परिस्थिती आणि जिल्हा प्रशासनाकडून आलेले अहवाल लक्षात घेऊन राज्य शासनाने या दोन तालुक्यांसह राज्यातील सुमारे ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला. पहिली यादी जाहीर झाल्यावर काही विरोधकांनी आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून या विषयाचे राजकारण करण्याचा प्रयत्न केला. तहसील कार्यालयांवर मोर्चे काढणे, व्हिडिओ काढून जनतेची दिशाभूल करणे असे प्रकार सुरू होते. मात्र, शासनाने घेतलेल्या या निर्णयाने अशा राजकारण करणाऱ्यांना चोख प्रत्युत्तर मिळाले आहे. अडचणीच्या काळात अशा गंभीर विषयांवर राजकारण न करता वस्तुस्थिती समजून घेतली पाहिजे, असेही त्यांना सांगितले.

भाजप-महायुती सरकार हे नेहमीच शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहणारे सरकार असून, या निर्णयाने ते पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे, असे भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी म्हटले आहे. महसूल मंत्र्यांनी स्वतः भोकर विधानसभा मतदारसंघाचा दौरा करून प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली होती. येथील परिस्थिती इतर तालुक्यांप्रमाणेच गंभीर असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर वस्तुस्थिती लक्षात घेऊन शासनाने तत्काळ नवा शासन निर्णय जारी करत मुदखेड व मुखेड या दोन्ही तालुक्यांना दुष्काळी सवलती लागू केल्याचे त्यांनी सांगितले.

# चौकशीच्या फेऱ्यातील सदस्य एमपीएससी अध्यक्षपदी नको; अक्षय कांबळे यांची मागणी

पुणे : (स. गांवकरी)

एमपीएससी (MPSC) मधील गैरव्यवहार प्रकरणाला आता एक नवीन वळण मिळाले असून, यावरून विद्यार्थी आक्रमक झाले आहेत. या प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीसाठी राज्य सरकारने विद्यार्थ्यांच्या तीव्र आंदोलनानंतर माजी न्यायमूर्ती भोसले यांच्या अध्यक्षतेखालील आणि तुकाराम मुंडे सदस्य सचिव असलेली पाच सदस्यीय चौकशी समिती गठीत केली आहे. मात्र, ही समिती ज्या अध्यक्ष आणि सदस्यांची चौकशी करणार आहे, त्याच संशयाच्या भोवऱ्यात असलेल्या व्यक्तींपैकी एक आणि आयोगाचे विद्यमान सदस्य सतीश वाघेला यांची एमपीएससी आयोगाच्या प्रभारी अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शासनाचा हा निर्णय अत्यंत चुकीचा असून, यामुळे राज्य सरकारच्या निष्पक्षपणे होऊ घातलेल्या चौकशी समितीवरच मोठी शंका उपस्थित होत असल्याचा आरोप एमपीएससी आंदोलनाचे नेते अक्षय कांबळे यांनी केला आहे.



दरम्यान, गैरव्यवहार प्रकरणी आयोग आणि सदस्यांवर शंका उपस्थित केली गेल्यामुळे, चौकशी योग्य पद्धतीने व्हावी यासाठी नैतिक जबाबदारी स्वीकारून भिमनवार यांनी रजा घेतलेली आहे. एकीकडे भिमनवार यांनी नैतिकतेतून रजा घेतली असताना, दुसरीकडे मात्र विद्यमान सदस्यांनी त्याच ठिकाणी पदावर बसणे अत्यंत गैर आहे, असेही कांबळे यांनी म्हटले आहे. ज्या व्यक्ती किंवा विभागाची चौकशी होणार आहे, तीच व्यक्ती जर सर्वोच्च पदावर बसली तर चौकशी समितीवर दबाव येऊ शकतो आणि पारदर्शकता धोक्यात येऊ शकते, अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे जे जे संशयाच्या भोवऱ्यात आहेत, अशांपैकी कोणालाही प्रभारी अध्यक्ष करू नये आणि सतीश वाघेला यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी आग्रही मागणी अक्षय कांबळे यांनी मुख्यमंत्री आणि राज्यपालांना पत्राद्वारे केली आहे. लाखो स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य या चौकशीवर अवलंबून असल्याने सरकारने चौकशीची विश्वासार्हता जपण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, असेही त्यांनी या पत्रात नमूद केले आहे.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी संपादकीय

# जनतेचा आवाज दडपता येणार नाही!

सत्तेच्या अहंकारात मोदी सरकारने जनतेला गृहीत धरू नये. विरोधकांचा आवाज दाबल्याने जनतेचे प्रश्न संपत नाहीत आणि बहुमत मिळाल्याने मनमानी करण्याचा अधिकारही मिळत नाही. लोकशाहीत सरकारला प्रश्न विचारणे हा गुन्हा नसून तो नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. जनतेच्या याच अधिकाराची परीक्षा आज देशातील राजकीय परिस्थिती घेत आहे. रस्त्यांवर पोलिसांचे ताफे, चौकाचौकांत बॅरिकेड्स, शस्त्रसज्ज पोलिसांचा पहारा, रेल्वे आणि मेट्रो सेवांवरील निर्बंध, इंटरनेट बंदी आणि विस्कळीत सार्वजनिक वाहतूक! हे चित्र एखाद्या युद्धग्रस्त देशाचे नसून जगातील सर्वांत मोठी लोकशाही म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारताच्या राजधानीचे असेल, तर त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. संविधानाने नागरिकांना अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार दिला आहे. मात्र, जनतेच्या असंतोषाला सामोरे जाण्याऐवजी त्याला रोखण्यासाठी प्रशासनाचा एवढा मोठा फौजफाटा उभा केला जात असेल, तर लोकशाहीच्या स्वरूपाविषयी प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. जनतेच्या प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी तिचा आवाज दडपण्याचा प्रयत्न होत असल्याची भावना यामुळे अधिक तीव्र होते.

### मतदारांचा विश्वास आणि लोकशाही संस्थांची जबाबदारी निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, मतदारांच्या अधिकारांचे संरक्षण आणि घटनात्मक संस्थांची निष्पक्षता हे लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. मतचोरीचे आरोप, निवडणूक प्रक्रियेबाबत व्यक्त होणाऱ्या शंका आणि राजकीय पक्षांकडून उपस्थित केले जाणारे प्रश्न यांची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थांवरील जनतेचा विश्वास टिकवणे ही सरकारची आणि संबंधित संस्थांची जबाबदारी आहे. या प्रश्नांवरून विरोधक आणि सत्ताधारी यांच्यात संघर्ष निर्माण झाला असला, तरी आरोपांचे उत्तर दडपशाहीने देता येणार नाही. निवडणुकीतील अनियमिततेचे आरोप असतील, तर त्यांची सत्यता पुराव्यांच्या आधारे तपासली पाहिजे. विरोधकांच्या शंकांचे निरसन करणे आणि नागरिकांना विश्वासात घेणे हा लोकशाही प्रक्रियेचा भाग आहे. जनतेच्या मनात निर्माण झालेल्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून किंवा आंदोलने रोखून हा प्रश्न सुटणार नाही. उलट, अशा भूमिकेमुळे लोकशाही संस्थांविषयीचा संशय अधिक गडद होऊ शकतो.

### 'डरो मत'चा संदेश आणि विरोधकांची एकजूट लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकशाही, संविधान आणि तरुणांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर सरकारला जाब विचारण्याची भूमिका घेतली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील घटक पक्षांनी रस्त्यावर उतरून आंदोलनाची दिशा स्वीकारली, ही विरोधकांच्या राजकारणातील महत्त्वाची घडामोड आहे. काँग्रेस कमकुवत झाली आहे, विरोधकांमध्ये एकजूट उरलेली नाही आणि मोदी सरकारला आव्हान देण्याची क्षमता कोणातही नाही, असा राजकीय समज निर्माण झाला होता. मात्र, विविध विरोधी पक्षांनी एकत्र येऊन सरकारच्या धोरणांविरोधात आवाज उठवला, तर सत्ताधाऱ्यांसमोर राजकीय आव्हान उभे राहू शकते, हे अशा आंदोलनांतून दिसून येते. लोकशाहीत विरोधी पक्षाचे काम केवळ निवडणुका लढवणे किंवा संसदेत भाषणे करणे एवढेच नसते. सरकारच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे, जनतेच्या असंतोषाला व्यासपीठ देणे आणि सार्वजनिक प्रश्नांवर जनमत संघटित करणे हीदेखील त्याची जबाबदारी आहे. राहुल गांधी यांनी रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची घेतलेली भूमिका याच राजकीय जबाबदारीच्या संदर्भात पाहायला हवी. मात्र, या संघर्षाचे यश केवळ आंदोलनातील गर्दीवर नव्हे, तर प्रश्नांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि ठोस पर्याय मांडण्यावरही अवलंबून असेल.

### दडपशाहीने आंदोलन थांबेल; असंतोष नाही! दिल्लीतील आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी, राजकीय कार्यकर्ते, वकील आणि पत्रकारांवरील पोलिसी कारवाईबाबत गंभीर आरोप समोर आले आहेत. आंदोलकांना ताब्यात घेणे, त्यांना बराच काळ पोलीस वाहनांतून फिरवणे, मारहाण करणे आणि आंदोलनस्थळापासून दूर नेऊन सोडणे यांसारख्या घटनांचे आरोप लोकशाही व्यवस्थेसाठी चिंताजनक आहेत. काही व्यक्तींना गंभीर दुखापती झाल्याचे आणि महिला आंदोलकांशी गैरवर्तन झाल्याचे दावेही करण्यात आले आहेत. या आरोपांची निष्पक्ष चौकशी होऊन सत्य जनतेसमोर आले पाहिजे. पोलिसांना कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचा अधिकार आहे; मात्र, तो अधिकार अमर्याद नाही. आंदोलकांनी कायद्याचे उल्लंघन केले असल्यास कायदेशीर कारवाई करता येते.

# थोडक्यात पण महत्वाचे




## विद्यासागर हायस्कूलमध्ये 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा

तामसा (स. गांवकरी) : येथील नामांकित विद्यासागर मुलींच्या हायस्कूलमध्ये भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ व भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्?दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' विविध शैक्षणिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थिनींमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानाची गोडी वाढावी आणि ग्रंथसंस्कृतीचा प्रसार व्हावा, या उद्देशाने शाळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथदिंडीने करण्यात आली. विद्यार्थिनींनी उत्साहात काढलेल्या या ग्रंथदिंडीद्वारे वाचनाचे महत्त्व आणि पुस्तकांचे जीवनातील स्थान अधोरेखित करण्यात आले. यानंतर शाळेच्या प्रांगणात विविध ज्ञानशाखांवरील पुस्तकांचे ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले. वाचनाचे महत्त्व सांगणाऱ्या आकर्षक रांगोळ्या तसेच विद्यार्थिनींनी तयार केलेली माहितीपूर्ण भित्तिपत्रके उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. दुपारच्या सत्रात विविध वैचारिक आणि बौद्धिक उपक्रम पार पडले. विद्यार्थिनींनी 'वाचाल तर वाचाल', 'डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे कार्य' आणि 'दैनंदिनी लेखनाचे महत्त्व' या विषयांवर प्रभावी मनोगते व्यक्त केली. यासोबतच निवडक पुस्तकांचे परीक्षण सादर करण्यात आले. विशेष म्हणजे, शाळेच्या ग्रंथालयातील तब्बल ५० पुस्तके वाचलेल्या विद्यार्थिनीची काल्पनिक मुलाखत घेण्यात आली. या उपक्रमातून वाचनाची आवड, सातत्य आणि पुस्तकांमधून मिळणाऱ्या ज्ञानाचे महत्त्व अधोरेखित झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका उज्वला चिंचगव्हाणकर होत्या. अध्यक्षीय भाषणातून त्यांनी डॉ. कलाम यांच्या विचारांचा परिचय करून देत विद्यार्थिनींना वाचनाची प्रेरणा दिली. मोबाईलच्या वाढत्या वापराच्या काळात विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी मैत्री जोपासावी.



## समाजासाठी झटणाऱ्या निःस्वार्थी कार्यकर्त्यांची गरज – डॉ. कोहिनकर

पुणे (स. गांवकरी) : सध्याच्या काळात माणूस अधिकाधिक स्वतःपुरता विचार करताना दिसतो. मात्र, बापूसाहेब कांबळे यांच्यासारख्या कार्यकर्त्यांनी स्वतःच्या सुखसोयींचा विचार न करता समाजासाठी आयुष्य समर्पित केले आहे. समाजाची खऱ्या अर्थाने प्रगती साधायची असेल, तर निःस्वार्थ भावनेने समाजासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांची नितांत गरज आहे, असे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. दत्ता कोहिनकर यांनी व्यक्त केले. महामाता रमाबाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारकतर्फे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल बापूसाहेब कांबळे यांना डॉ. दत्ता कोहिनकर यांच्या हस्ते 'धम्मरत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. माजी नगरसेविका लता राजगुरू, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अनुसूचित जाती-जमाती पुणे शहर पूर्व विभागाचे अध्यक्ष कुणाल राजगुरू, नगरसेवक अविनाश साळवे आणि विठ्ठल गायकवाड आदी उपस्थित होते. पुरस्काराला उत्तर देताना बापूसाहेब कांबळे म्हणाले, "धम्म म्हणजे लोकांचे दुःख जाणून घेणे आणि ते दूर करण्यासाठी अविरत प्रयत्न करणे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांनी दाखवलेल्या धम्ममार्गावरून मी वाटचाल करत आहे. समाजासाठी काहीतरी देणे लागतो, ही भावना कायम मनात असल्यामुळेच लहान मुले आणि महिलांसाठी काम करण्याची संधी मला मिळाली." महामाता रमाबाई आंबेडकर यांच्या पवित्र स्मारकाच्या ठिकाणी धम्मचक्र प्रवर्तन दिनी हा पुरस्कार मिळणे, हा केवळ माझाच नव्हे, तर माझ्यासोबत सामाजिक कार्यात योगदान देणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचा गौरव आहे. सामाजिक काम करताना अनेक अडचणी आल्या; मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शिकवण आणि गौतम बुद्धांचा मार्ग यांमुळेच आपण कार्यरत राहू शकलो, अशी भावना कांबळे यांनी व्यक्त केली. नगरसेवक अविनाश साळवे म्हणाले, "आज नालेसफाई किंवा ड्रेनेजचे झाकण बदलले तरी त्याचा मोठ्या प्रमाणावर गाजावाजा केला जातो. चौकाचौकांत प्रसिद्धीसाठी फ्लेक्स लावले जातात. मात्र, बापूसाहेब कांबळे गेल्या २५ वर्षांपासून अविरतपणे सामाजिक कार्य करत आहेत. त्यांनी आपल्या कामाची जाहिरातबाजी कधीही केली नाही. यातूनच त्यांचा निःस्वार्थीपणा दिसून येतो. अशा कार्यकर्त्यांची समाजाला गरज आहे." माजी नगरसेविका लता राजगुरू म्हणाल्या, "बापूसाहेब कांबळे यांचे सामाजिक कार्य मी गेल्या अनेक वर्षांपासून जवळून पाहत आहे. त्यांनी केलेल्या कामामुळेच समाजाने त्यांच्यावर प्रेम केले आहे. हा पुरस्कार म्हणजे महामाता रमाबाई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आशीर्वाद तसेच जनतेचे त्यांच्यावर असलेले प्रेम यांचे प्रतीक आहे." कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल गायकवाड यांनी केले, तर लता राजगुरू यांनी आभार मानले.

# कळवणच्या पाड्यावर सोन्याच्या देवीला नाही, तर 'घर्यादेवाला' मान! मृत पूर्वज चांदीच्या रूपात विराजमान

कनाशी : (स. गांवकरी)

शहरात नवरात्रात सोन्या-चांदीच्या देवीचा झगमगाट पाहायला मिळतो, पण कळवण तालुक्याच्या डोंगरपट्ट्यातील गणोरे, पाटील पाड्यावर चित्र वेगळं आहे. येथे घटात देवी नाही, तर श्रद्धेचा घर्यादेव बसतो.

आदिवासी समाजात शेकडो वर्षांपासून चालत आलेली रूढी अशी आहे की, घरातील आई-वडील किंवा कुटुंबातील कुणाचाही मृत्यू झाल्यास, त्यांच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून चांदीचा देव (टाक) घडवला जातो. नवरात्रीच्या काळात किंवा मुलाच्या लग्नात या चांदीच्या देवाचीच घट म्हणजेच 'घर्यादेव' म्हणून स्थापना केली जाते.

स्थापनेनंतर सलग नऊ दिवस ढाका वादन करून रात्रभर जागरण केले जाते. नवव्या दिवशी वाजत-गाजत मिरवणूक काढून त्याला कायमस्वरूपी देव्हाऱ्यात बसवले जाते. एका मातीच्या घटात आपल्या मृत आई-वडिलांना देवाच्या रूपात पाहण्याची ही परंपरा मन हेलावणारी आहे. खरंच, एका चांदीच्या टाकात आपल्या बाप-जाद्यांना शोधणारी ही आदिवासी संस्कृती थक्क करणारी आहे.

आपल्या पूर्वजांनी रक्ताचं पाणी करून ही परंपरा, ही संस्कृती टिकवून ठेवली. आज मोबाईलच्या जमान्यात तरुण पिढी आपली मुळं विसरत चालली आहे. काळाची गरज हीच आहे की, आजच्या तरुणांनी सुद्धा ही परंपरा टिकवली पाहिजे. बाजारातला देव आणून पूजण्यापेक्षा, ज्या आई-वडिलांनी आपल्याला जन्म दिला, त्यांनाच आपण देव्हाऱ्यात बसवून त्यांची रोज पूजा करावी, यापेक्षा मोठी श्रद्धा कुठलीच नाही.



# LCB पोलिसांची मोठी कारवाई; शेतकऱ्याची दुचाकी फसवून पळवणारा आरोपी आठ महिन्यांनंतर जेरबंद

डांग : (स. गांवकरी)

वघई तालुक्यातील मानमोडी गावातील एका शेतकऱ्याची फॉरेस्ट बीट गार्डच्या नावाने फसवणूक करून मोटारसायकल पळवून नेणाऱ्या आरोपीला डांग जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) पथकाने आठ महिन्यांनंतर अटक केली आहे. सुरत जिल्ह्यातील विहान गावाजवळ सापळा रचून आरोपीला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी त्याच्याकडून सुमारे ६५ हजार रुपये किमतीची स्प्लेंडर प्लस मोटारसायकल जप्त केली असून, या कारवाईमुळे दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या गुन्ह्याचा उलगडा झाला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फेब्रुवारी २०२६ मध्ये सापुतारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मानमोडी गावात एका अनोळखी व्यक्तीने शेतकऱ्याशी संपर्क साधला. त्याने आपण फॉरेस्ट बीट गार्डचे काम करणाऱ्या अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून थंड पेय आणण्यासाठी आलो असल्याचे सांगितले 'बीट गार्ड साहेबांनी मला थंड पेय आणायला पाठवले आहे. तुमच्या मोटारसायकलची चावी द्या, पाच मिनिटांत पेय घेऊन परत येतो,' असे सांगून त्याने शेतकऱ्याचा विश्वास संपादन केला. शेतकऱ्याने विश्वासाने चावी दिल्यानंतर आरोपी मोटारसायकल घेऊन पसार झाला. याप्रकरणी सापुतारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास करताना डांग LCB चे पोलीस उपनिरीक्षक जे. जी. उनडकट आणि त्यांच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, चोरीची मोटारसायकल घेऊन एक संशयित व्यक्ती सुरत जिल्ह्यातील विहान गावाच्या चौकातून वारंवार ये-जा करत आहे.

या माहितीच्या आधारे LCB पथकाने सलग दोन दिवस विहान चौक आणि परिसरातील रस्त्यांवर पाळत ठेवली. दरम्यान, सामपुरा गावाच्या दिशेने तोंडाला रुमाल बांधून मोटारसायकलवरून येणाऱ्या संशयित व्यक्तीला पोलिसांनी पाहिले. त्यानंतर इतर पथकांना दूरध्वनीद्वारे माहिती देत त्याचा पाठलाग करण्यात आला. विहान चौकाजवळील शाळेच्या परिसरात घेराव घालून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.पोलिसांच्या तपासात आरोपीचे नाव विमल उर्फ आर्यन उर्फ अभी उर्फ अभय पटेल चौधरी (वय २४ वर्षे) असे निष्पन्न झाले आहे. तो मूळचा टिंटोई, तालुका अरेठ, जिल्हा सुरत येथील असून सध्या सुरतमधील सहारा दरवाजाजवळ राहत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीविरुद्ध यापूर्वीही विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल आहेत. मांडवी, बारडोली आणि वघई पोलीस ठाण्यांमध्ये चोरीचे गुन्हे नोंद असल्याचे सांगण्यात आले. तसेच राजपारडी (भरूच) आणि वेजलपूर (नवसारी) पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अपहरण व बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यांची नोंद असल्याची माहितीही पोलिसांनी दिली आहे.

सापुतारा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ च्या कलम ३१८(४) अंतर्गत नोंद असलेल्या गुन्ह्याच्या पुढील कायदेशीर कारवाईसाठी आरोपी आणि त्याच्याकडून जप्त करण्यात आलेली सुमारे ६५ हजार रुपये किमतीची स्प्लेंडर प्लस मोटारसायकल संबंधित पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली आहे.डांग LCB पथकाने गोपनीय माहिती, सलग पाळत आणि नियोजनबद्ध कारवाईच्या आधारे आठ महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या या गुन्ह्याचा उलगडा केल्याने पोलिसांच्या कामगिरीचे प्रश्नां झाले आहे.

# तालुकास्तरीय "माझे गाव आरोग्य संपन्न गाव" कार्यशाळा व आढावा बैठक नायगाव येथे संपन्न

नायगाव : (स. गांवकरी)

सुदुढ आरोग्य - सशक्त गाव - समृद्ध भारत अभियान अंतर्गत " माझे गाव आरोग्य संपन्न गाव " तालुकास्तरीय कार्यशाळा व आढावा बैठक आज दि. १५ ऑक्टोबर रोजी नायगाव येथे तालुक्यातील मांजरम, कुंटूर व बरबडा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरबीएसके वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य कर्मचारी व आरोग्य सेविका यांची कार्यशाळा व आढावा बैठक घेण्यात आली.




अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संतोष सूर्यवंशी, नायगाव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री प्रवीणकुमार वानखडे , सहाय्यक गट विकास अधिकारी श्री ऋषिकेश पाटील, तालुका आरोग्य अधिकारी डॉ श्रीकांत पटवेकर, एम अँड ई अनिल कांबळे आदी उपस्थित होते.

श्री वानखेडे यांनी आपल्या भाषणात सांगितले कि, सर्वांनी आरोग्य सेवा नागरिकांना वेळेत दयावी, समन्वयांनी काम करावे व माझे गाव आरोग्य संपन्न गाव कसे होईल याकडे लक्ष दयावे. डॉ. सूर्यवंशी यांनी सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाचा उपकेंद, कर्मचारी निहाय आढावा घेतला व मार्गदर्शन केले. श्री कांबळे यांनी सुद्धा वार्षिक उद्धीष्ठ नुसार आढावा घेतला व कार्यक्रमात कशा सुधारणा करता येईल या बाबत सखोल माहिती दिली.

यावेळी मांजरम वैद्यकीय अधिकारी डॉ प्रद्युमन पाटील, कुंटूर वैद्यकीय अधिकारी डॉ रेखा शिंदे, डॉ सुनील वाघमारे, विस्तार अधिकारी (आरोग्य) महेश मुखेडकर, आरोग्य निरीक्षक अंकुश खिल्लारे,सत्यजीत टिप्रेसवार, चव्हाण, संगेवार, संतोष साखरे, शुभम येरमवार, सर्व समुदाय अधिकारी, आरबीएसके वैद्यकीय अधिकारी, bआरोग्य सेवक, आरोग्य सेविका उपस्थित होते.कार्यशाळा व आढावा बैठकीचे नियोजन तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाने केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मठपती, शैलेश मच्छरलावार, अनुप जगताप व सोमेश यांनी मेहनत घेतली.

# पंकज उदास मंचावर विद्यार्थिनींच्या वक्तृत्वाचा प्रभावी आविष्कार!

नांदेड : (स. गांवकरी)

'युद्ध नको, बुद्ध हवा', 'अमली पदार्थांचे दुष्परिणाम आणि युवा पिढी समोरील आव्हाने', 'हवामान बदलः मानवी अस्तित्वासमोरील नवे आव्हान' आणि 'कृत्रिम बुद्धिमत्ता' या विषयांवर स्पर्धकांनी विचार मांडले.

पंकज उदास मंचावर आयोजित वक्तृत्व स्पर्धेत विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपल्या प्रभावी वक्तृत्वशैलीतून सामाजिक, वैचारिक आणि आधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधित विषयांवर विचार मांडले. 'युद्ध नको, बुद्ध हवा' आणि 'कृत्रिम बुद्धिमत्ता' या विषयांवरील विचारमंथनातून विद्यार्थी-विद्यार्थिनींची अभ्यासपूर्ण मांडणी आणि वक्तृत्वकौशल्याचे दर्शन घडले.

या वक्तृत्व स्पर्धेत महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा येथील श्वेता श्याम माने, ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी येथील श्रद्धा अशोक खरोडे, तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील प्रियंका निखाते यांनी सहभाग नोंदविला.

'युद्ध नको, बुद्ध हवा' या विषयाच्या अनुषंगाने शांतता, मानवता, बंधुभाव आणि भगवान गौतम बुद्धांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

तसेच नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आखाडा बाळापूर येथील तेजस्विनी माधवराव अवचार यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' या विषयावर आपले विचार मांडले. आधुनिक युगात कृत्रिम बुद्धिमत्तेचे वाढते महत्त्व, तंत्रज्ञानामुळे निर्माण होणाऱ्या संधी आणि भविष्यातील संभाव्य आव्हाने या विषयांकडे त्यांनी लक्ष वेधले.

या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना आपले विचार निर्भीडपणे व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले.

# खेड तालुक्यातील बंधाऱ्याचे लोखंडी ढापे बसविण्यासाठी जिल्हा परीषदेचा 2 कोटी निधी

राजगुरुनगर : (स. गांवकरी)

दुष्काळी परीस्थितीवर मात करण्यासाठी पुणे जिल्हा परीषदेच्या अखत्यारीत छोटे पाटबंधारे विभागाच्या ओढ्यावरील बंधा-यात पाणी अडवण्याची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. खेड तालुक्यातील ५० गावातील १०१ बंधाऱ्यापैकी ३५ ग्रामपंचायतीच्या अखत्यारीतील ६१ बंधा-यांचे लोखंडी ढापे बसविण्याची कामे पुर्ण झाली. यामुळे रब्बी हंगामातील ९०० हेक्टर शेतजमिन ओलिताखाली येणार असल्याची माहिती छोटा पाटबंधारे उपविभाग उपअभियंता रुपाली तांदळे यांनी दिली.

खेड पंचायत समितीच्या छोटे पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीतील खेड तालुक्यात ५० गावातील १०१ कोल्हापुर पध्दतीचे, साठवण बंधारे, वळण बंधारे असुन जवळपास २५ बंधारे लोखंडी ढापे चोरीला गेल्याने आणि जुलै ऑगस्ट महिन्यात झालेल्या दमदार पावसात निकामी ठरले.

खेड तालुक्यात यंदा पावसाने अवक्रुपा केल्याने परतीचा पावसाने माघार घेतल्याने खरीप हंगामातील हातात येणारी पिके वाया गेल्याने बळीराजाच्या तोंडचा घास हिरावुन घेतल्याचे स्पष्ट झाले. तालुक्यातील ५० बंधा-यांचे ढापे बसवणे आणि पावसाळ्यापुर्वी ढापे काढण्यासाठी जिल्हा परीषदेने १६ जुलै रोजी ३ कोटी ९२ लाख ३८३२ रुपयांचे अंदाज पत्रकीय रक्कमेला मंजुरी दिल्याप्रमाणे बंधाऱ्याच्या ढाप्यांच्या संख्येनुसार संबंधित कामासाठी ग्रामपंचायतीने एकुण खर्चाच्या ५० टक्के रक्कम वर्ग करण्यात आली तर ५० टक्के खर्च ग्रामपंचायतीनी स्वनिधी तुन खर्च करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती तादंळे यांनी दिली.

तालुक्यातील ५० ग्रामपंचायतीच्या अखत्यारीतील ५० बंधाऱ्याचे लोखंडी ढापे बसविण्यासाठी जिल्हा परीषदेने १ कोटी ९६ लाख १९१६ रुपये संबंधित ग्रामपंचायतीकडे वर्ग केले आहे पावसाळ्यापुर्वी ढापे काढण्यासाठी ग्रामपंचायतीच्या स्वनिधी तुन १ कोटी ९६ लाख १९१६ रुपये खर्चास मंजुरी देण्यात आली आहे. तालुक्यात ३५ ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत ६१ बंधाऱ्याचे लोखंडी ढापे बसवण्यात आले. १४ ग्रामपंचायतीच्या हद्दीतील १५ बंधाऱ्याचे ढापे बसवण्याची कामे तीन चार दिवसांत पुर्ण होऊन पाणी अडवण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक स्थापत्य अभियंता ज्योती भुसारी यांनी दिली.

खेड तालुक्यातील गावनिहाय बंधारे आणि जिल्हा परीषदेने पाणी अडवण्यासाठी ढापे बसवण्याकरीता जिल्हा परीषदेने कंसात मंजुर केलेली ५० टक्के रक्कम पुढीलप्रमाणे :-आडगाव (१४०४३), आखरवाडी (९३६२) आंबोली (२७५०१), औदर (४०९६), काळुस (८१९१७), बहुळ (३८६१८), वि-हाम भलवडी (५९०९७), भोरगिरी भिवेगाव ( ७६०६६), वडगाव घेनंद (९८३००), डेहणे (१८७२४), देवोशी (४७३९४), मिरजेवाडी घनवटवाडी (७०२१), घोटवडी (२५१६०), जऊळुके बु.(१७५५४), धामणगाव (१९८९४), कडुस (१५९१५३), पाडळी काळेचीवाडी ( ७०७९९), कळमोडी (४९१५०), कमान (२३४०५), कनेरसर ( ८७७६८), कान्हेवाडी बु.(९३६१), खरपुड (१४०४३), खरपुडी बु.(४६८१), कोंहिंडे बु.(१४६२८), कोये (४०९५८), कुडे बु.(७०२१), मरकळ (७०२१), वाशेरे (७०२१), नायफड ( १६३८३), पापळवाडी (७०२१), पुर ३८६१८), रासे (१९३०९), साबुर्डी (११७०३), वेताळे( ४३२९९), वरचे भोमाळे (१९३०९), वरुडे (१३८६७४), वाफगाव (१०८२४८), वांद्रा (२३४०५), येणिये खु.(६८४५९), येणिये बु.(२७५०१), शिरोली (७४८९५), आसखेड खु.(५२६६१); टाकळकरवाडी (१८७२४), करंजविहिरे (४५६३९), आव्हाट (५८५१), हेद्रुज (२८०८६), बहिरवाडी (१४०४३), मोरोशी (४६८१), पाळु (५०३२०), मांजरेवाडी (१०५३२२).

## थोडक्यात पण महत्वाचे




### वन्यजीव संवर्धनासाठी प्रा. एस. पी. चव्हाण यांचा सायकल प्रवास

नांदेड (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या जैवशास्त्र संकुलातील प्रा. एस. पी. चव्हाण यांनी वन्यजीव सप्ताह २०२६ निमित्त पर्यावरण व वन्यजीव संवर्धनाचा संदेश देण्यासाठी ६९६ किलोमीटरचा सायकल प्रवास केला. 'अधिवास जोडणे व वन्यजीव जोपासणे' या ब्रीदवाक्यानुसार त्यांनी नांदेड–किनवट–हिंगोली–परभणी–लातूर–नांदेड असा प्रवास करून विद्यापीठाच्या चार उपकेंद्रांना भेटी दिल्या. यावेळी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना वन्यजीव संरक्षण, जैवविविधता आणि पर्यावरण संतुलनाचे महत्त्व पटवून दिले. वयाच्या ५९ व्या वर्षी हा अभिनव उपक्रम राबविल्याबद्दल कुलगुरू प्रा. डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, जैवशास्त्र संकुलाचे संचालक प्रा. बी. एस. सुरवसे यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.



### बंकलगी येथील जळीतग्रस्त कुटुंबास कोगनुरे यांनी दिला मदतीचा हात

सोलापूर (स. गांवकरी) : दक्षिण सोलापूर तालुक्यातील बंकलगी येथील बसवराज गोविंद (ढोणज) कोळी यांच्या घराला गॅस सिलिंडरच्या स्फोटामुळे आग लागून संपूर्ण घर जळून खाक झाले. या दुर्घटनेमुळे कोळी कुटुंबावर मोठे संकट ओढवले. या घटनेची माहिती मिळताच एम. के. फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा सागर सिमेंटचे महाराष्ट्र हेड महादेव कोगनुरे यांनी तातडीने दखल घेत संबंधित कुटुंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले करून त्यांना धीर दिला. एम. के. फाऊंडेशनचे बंकलगी येथील काही सहकाऱ्यांनी दूरध्वनीद्वारे या घटनेची माहिती महादेव कोगनुरे यांना दिली. संकटग्रस्त कुटुंबाला मदतीचा हात मिळावा, या उद्देशाने कोगनुरे यांनी तत्परतेने कुटुंबाची भेट घेत मदतीचा हात दिला. यावेळी बंकलगी येथील रेवणसिद्ध कोणदे, राजशेखर सगरे, काशप्पा गुरुजी, मंत्रीशे गुरुजी, भाग्यांणा दुववंत, चंदू कोणदे, नागनाथ कोणदे आदी उपस्थित होते.

### नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर!

हिमायतनगर (स. गांवकरी) : नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात भटक्या कुत्र्यांचा वाढता सुळसुळाट आणि रेबीज प्रतिबंधक इंजेक्शनच्या उपलब्धतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सरसम येथील पीएचसी (प्राथमिक आरोग्य केंद्र) तसेच चिंचोडी प्राथमिक आरोग्य केंद्रात रेबीज प्रतिबंधक इंजेक्शनचा तुटवडा असल्याची तक्रार पुढे येत असून, त्यामुळे कुत्रा चावल्यानंतर उपचारासाठी नागरिकांना हिमायतनगर येथील उपजिल्हा रुग्णालयात धाव घ्यावी लागत असल्याचे सांगितले जात आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सेवा गावाजवळ उपलब्ध व्हावी, यासाठी शासनाने प्राथमिक आरोग्य केंद्रांची व्यवस्था केली आहे. मात्र, कुत्रा चावण्यासारख्या तातडीच्या प्रसंगी आवश्यक इंजेक्शन उपलब्ध नसल्यास रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. विशेषतः लहान मुले, शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागात कामानिमित्त फिरणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनत आहे.

### जळकोटेंची लोकमंगल मल्टिस्टेटच्या सल्लागार अध्यक्षपदी निवड

सोलापूर (स. गांवकरी) : मल्लिनाथ जळकोटे यांची लोकमंगल मल्टिस्टेट अणदूर विभागाच्या सल्लागार मंडळाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील युवकांना स्वावलंबी बनविण्यासाठी कार्य करण्याचा निर्धार लोकमंगल ने केला आहे. लोकमंगल मल्टिस्टेटच्या अणदूर विभागाच्या सल्लागार मंडळाच्या अध्यक्षपदी मल्लिनाथ महादेव जळकोटे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली. या निवडीमुळे अणदूर विभागातील सहकार क्षेत्रात त्यांना काम करण्याची नवी संधी उपलब्ध झाली आहे. या विभागांतर्गत अणदूर, जळकोट, नळदुर्ग, इटकळ, काटगाव आणि तामलवाडी या शाखांचा समावेश आहे. या सर्व शाखांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत सहकाराचे महत्त्व पोहोचविणे, युवकांना उद्योग-व्यवसायासाठी प्रोत्साहन देणे आणि त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी प्रयत्न करणे, ही या जबाबदारीतील महत्त्वाची उद्दिष्टे असणार आहेत. या निवडीच्या कार्यक्रमाला लोकमंगल परिवाराचे कुटुंबप्रमुख, माजी सहकारमंत्री तथा दक्षिण सोलापूरचे आमदार मा. सुभाष बापू देशमुख, लोकमंगल मल्टिस्टेटचे चेअरमन बालाजी शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंत वडगावे (शहापूर, धाराशिव), वीरशैव संघटनेचे अध्यक्ष संजय बताले (धाराशिव), जवाहर महाविद्यालय, अणदूरचे माजी प्राचार्य संगमेश्वर जळकोटे, माजी पंचायत समिती सदस्य मुरलीदादा शिनगारे (शहापूर), तसेच महादेव सोनटक्के, सुदन सुरवसे आणि रतन सुरवसे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना ग्रामीण भागातील तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा उद्योग-व्यवसाय उभारून स्वावलंबी बनावे, असे आवाहन करण्यात आले. जीवनातील संकटांकडे अडथळे म्हणून न पाहता त्यातून नवीन संधी निर्माण करण्याची वृत्ती जोपासली पाहिजे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशस्वी होण्यासाठी जिद्द, मेहनत आणि योग्य मार्गदर्शन आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.



# दिव्यांग ह्यूमन राईट फेडरेशनचे मागण्यांसाठी महापौरांना निवेदन

ठाणे : (स. गांवकरी)

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग बांधवांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात दिव्यांग ह्यूमन राईट फेडरेशनच्या शिष्टमंडळाने महापौर शर्मिला पिपलोळकर-गायकवाड यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी दिव्यांग निधी तसेच दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांशी संबंधित कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. महासभेत या विषयावर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन महापौरांनी दिल्याचे संघटनेने म्हटले आहे.



संघटनेने दिव्यांग बांधव, विधवा महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना महापालिकेकडून ४८ हजार रुपयांचे अनुदान देण्यात यावे, तसेच दिव्यांगांसाठी घर, गाळे व स्टॉल उपलब्ध करून देण्याबरोबरच नोकरीतील सरळ भरतीसंदर्भात कायद्यानुसार कार्यवाही करावी, अशा मागण्या केल्या. दिव्यांगांच्या स्टॉलवरील अतिक्रमण कारवाईला स्थगिती द्यावी, UDID कार्ड व दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे व्यवसायासाठी नियमानुसार परवानगी द्यावी तसेच करामध्ये सवलत अथवा माफी देण्याबाबत निर्णय घ्यावा, अशा विविध मागण्यांचाही निवेदनात समावेश आहे.

यावेळी सभागृह नेते हणमंत जगदाळे, गटनेते पवन कदम, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, समाज विकास अधिकारी वाघमारे यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

फेडरेशनचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. भरत जाधव, राष्ट्रीय उपाध्यक्ष संतोष मोरे, चंद्रकांत पाटील, सुमन पवार, ज्योती बने, रमेश पाटील, विराज, स्वप्नील, कविता उबाळे, पूनम, शीतल गायकवाड यांच्यासह महिला पदाधिकारी व दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, निवेदनातील मागण्यांवर दहा दिवसांत ठोस कार्यवाही न झाल्यास सत्याग्रह आंदोलन तसेच बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा दिव्यांग ह्यूमन राईट फेडरेशनने दिला आहे.

## सुरेश पवार यांची राज्य पत्रकार संघाच्या खानदेश विभागीय उपाध्यक्षपदी नियुक्ती!

रावेर : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या खानदेश विभागीय उपाध्यक्षपदी रावेर तालुक्यातील पाल येथील पत्रकार सुरेश पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पाचोरा येथे आयोजित महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या उत्तर महाराष्ट्रस्तरीय पत्रकार अधिवेशनात ही नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीमुळे पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

पाचोरा येथे आयोजित या अधिवेशनाला पाचोरा-भडगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार किशोर आप्पा पाटील, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, प्रदेश उपाध्यक्ष किशोर रायसाकडा, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष भुवनेश तसेच राज्य कार्यकारिणी सदस्य, उत्तर महाराष्ट्र संघटक तथा दैनिक लोकशाहीचे प्रतिनिधी विनोद रामचंद्र कोळी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

सुरेश पवार हे मागील ११ वर्षांपासून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून संघटनात्मक आणि सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. त्यांनी यापूर्वी तालुका उपाध्यक्ष, जिल्हा उपाध्यक्ष आणि जिल्हाध्यक्ष अशा विविध पदांवर जबाबदारी सांभाळली आहे. या कालावधीत त्यांनी पत्रकारांचे प्रश्न, हक्क आणि न्यायासाठी पुढाकार घेतला असून, पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. पत्रकारितेसोबतच सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी सातपुड्याच्या दुर्गम भागातील गरीब, गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना दरवर्षी शालेय साहित्य उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबविला आहे. वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने ते विविध लोकहिताचे उपक्रम राबवत असतात.

## पिंपरी कावळ येथे एकल महिला नोंदणी मेळावा उत्साहात संपन्न

आळेफाटा : (स. गांवकरी)

श्री राधेश्याम दिव्यांग सशक्तीकरण केंद्राच्या माध्यमातून दि. १५ ऑक्टोबर रोजी पिंपरी कावळ येथे एकल महिला नोंदणी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात जुन्नर तालुक्यातील विविध गावांमधील एकूण ३५ महिलांनी सहभाग घेतला.

पिंपरी कावळ, जांबुत, औरंगपूर, पारगाव तर्फे आळे यांसह परिसरातील गावांमधील महिलांनी या मेळाव्यात उपस्थित राहून नावनोंदणी केली. विधवा, निराधार व घटस्फोटित महिलांसह नियमानुसार पात्र असलेल्या एकल महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. नोंदणीकृत महिलांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे, आवश्यक प्रशिक्षण उपलब्ध करून देणे, कायदेशीर मार्गदर्शन व संरक्षण मिळवण्यासाठी मदत करणे, तसेच त्यांच्या मुलांच्या शिक्षणासंदर्भातील अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणे, यावर या उपक्रमात भर देण्यात आला.

तसेच संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेअंतर्गत पात्र महिलांची बंद झालेली पेन्शन पुन्हा सुरू करण्यासाठी मार्गदर्शन करणे, तसेच नियमानुसार पात्र लाभार्थ्यांना अनुदानाचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचा आयोजकांचा मानस आहे.

या मेळाव्याचे आयोजन श्री राधेश्याम दिव्यांग सशक्तीकरण संस्थापक अध्यक्ष. दीपक चव्हाण आणि पिंपरी कावळ मळगंगा बचत गटाच्या अध्यक्षा वनिता रोहिदास पाबळे यांच्या पुढाकारातून करण्यात आले. या उपक्रमासाठी पिंपरी गावचे पोलीस पाटील कृष्णा शिरतार, शरद भांबिरे, दिगंबर झिंजाड, लक्ष्मण भांबिरे, सुरज खिलारी सारिका पाबळे आणि मंदाबाई भांबिरे यांनी विशेष उपस्थिती व सहकार्य केले.

## धम्म चक्र परिवर्तन दिन हा बौद्ध धम्माच्या इतिहासातील पवित्र दिवस होय - अमोल पुटगे

अक्कलकोट : (स. गांवकरी)

धम्म चक्र परिवर्तन दिन हा बौद्ध धम्माच्या इतिहासातील पवित्र दिवस होय आहे असे प्रतिपादन आंबेडकरी चळवळीतील युवा कार्यकर्ते अमोल पुटगे यांनी व्यक्त केले.

दिनांक १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सलगर येथे अमोल दादा पुटगे मित्रपरिवार यांच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिन बौद्ध समाज बांधव यांच्यासोबत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला..

समाजातील जेष्ठ नागरीक यलप्पा पुटगे सर, चिंचल भगळे, बाबुराव पुटगे, मल्लिकार्जुन धसाडे, कल्याणी भगळे, शिवकरण शिंगे, यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला फुलांचा वर्षाव करण्यात आला.



धम्मचक्र प्रवर्तन दिन हा बौद्ध धम्माच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र दिवस आहे.१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर परमपूज्य भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती.हा दिवस संपूर्ण जगभरात आणि विशेषतःमहाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने आणि आदराने साजरा केला जातो..

'धम्मचक्र प्रवर्तन' म्हणजे बौद्ध धम्माच्या विचारांचे व समतेच्या चक्राची सुरुवात करणे होय. बाबासाहेबांनी या दिवशी भारतात लुप्त झालेल्या बौद्ध धम्माला पुन्हा संजीवनी दिली...

यावेळी समाजातील लहान बाल गोपाळापासून,युवा बांधव,जेष्ठ नागरिक, माता बहिणी उपस्थित होते.

## आकाश एज्युकेशन सर्व्हिसेस लिमिटेड ने आकाश इनव्हिक्टस - इंजिनियरिंग 2.0 लॉन्च केले आहे

पुणे : (स. गांवकरी)

आकाश एज्युकेशन सर्व्हिसेस लिमिटेड, जे भारतातील आघाडीच्या परीक्षा-तयारी प्रदात्यांपैकी एक आहे, त्यांनी आकाश इनव्हिक्टस-इंजिनियरिंग 2.0 द्वारे आपल्या अभियांत्रिकी तयारी परिसंस्थेला बळकट केल्याची घोषणा केली आहे. ही एक नवीन कामगिरी-चालित शैक्षणिक रचना आहे, जी जेईई मेन, जेईई ॲडव्हान्स्ड आणि राज्य सीईटी परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक सुव्यवस्थित मार्ग तयार करण्यासाठी डिझाइन केलेली आहे.




एक ३६०-अंश तयारीचा अनुभव, सहा स्तंभांवर आधारित विद्यार्थ्यांना वर्गात, त्यांच्या पुस्तकांमध्ये, त्यांच्या चाचण्यांमध्ये आणि त्यांना मिळणाऱ्या मार्गदर्शनामध्ये प्रत्येक टप्प्यावर इनव्हिक्टसचा फरक जाणवेल. हा कार्यक्रम सहा स्तंभांवर उभा आहे:

परिणाम-केंद्रित शैक्षणिक दृष्टिकोन: प्रत्येक वर्ग, सराव सत्र आणि उजळणी चक्र एका उद्देशाने नियोजित केले जाते — जेईई ॲडव्हान्स्ड, जेईई मेन, बिटसॅट आणि राज्य अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांमध्ये सर्वोत्तम शक्य रँक मिळवणे.

रँक-सिद्ध झालेली शिक्षक टीम: शिक्षक टीम ही आकाश इनव्हिक्टसची सर्वात मोठी ताकद आहे. हीच शैक्षणिक टीम आहे जिने इनव्हिक्टस अभ्यासक्रम, पुस्तके आणि चाचणी यंत्रणा उंचावली आहे.

वैज्ञानिकदृष्ट्या रचलेले आणि संशोधन-आधारित अभ्यास साहित्य: या शैक्षणिक टीमने शिक्षण-शास्त्र आणि परीक्षा पद्धतींवरील सखोल संशोधनाचा वापर करून पुस्तके पुन्हा लिहिली आहेत, जी विद्यार्थ्यांना मूलभूत संकल्पनांपासून ते सर्वात कठीण प्रश्नांपर्यंत टप्प्याटप्प्याने घेऊन जातात.

बुद्धिमान चाचणी. सखोल विश्लेषण: चाचणीची वारंवारता, खोली आणि कठोरता यासह पूर्णपणे पुनर्रचित चाचणी यंत्रणा, जिथे प्रत्येक चाचणी विद्यार्थ्याला त्यांची ताकद, त्रुटी आणि सुधारणा करण्याच्या नेमक्या क्षेत्रांचे स्पष्ट चित्र देते.

## दुष्काळी परिस्थितीत ग्रामसेवकांना मुख्यालयी उपस्थित राहणे बंधनकारक - महेश पाटील

नांदेड : (स. गांवकरी)

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता पाणीटंचाई निवारण, जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता, रोजगार हमी योजनेची कामे आणि अन्य आवश्यक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी (ग्रामसेवकांनी) मुख्यालयी उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा गटविकास अधिकारी यांच्या पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडल्यास अथवा कर्तव्यात कसूर केल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी दिले आहेत.

ग्रामविकास विभागाच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली १६ ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठकीतील सूचनांनुसार हे निर्देश देण्यात आले आहेत.

एकापेक्षा अधिक ग्रामपंचायतींचा कार्यभार असलेल्या ग्रामसेवकांच्या भेटीचे वार व वेळ संबंधित गटविकास अधिकारी निश्चित करतील. ग्रामपंचायत कार्यालयाच्या दर्शनी भागात भेटीचे वेळापत्रक आणि संबंधित अधिकाऱ्याचा भ्रमणध्वनी क्रमांक असलेला माहिती फलक लावणे बंधनकारक राहील. या वेळापत्रकाची प्रत सरपंच, पंचायत समिती कार्यालय आणि तहसील कार्यालयातील टंचाई निवारण कक्षाला देण्यात येणार आहे.

ग्रामपंचायतीला भेट देताना ग्रामसेवकांनी गावातील पाणीटंचाईची स्थिती, टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची आवश्यकता, विहीर अधिग्रहणाचे प्रस्ताव, पिण्याच्या पाण्याचे उपलब्ध स्रोत, रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांची मागणी, जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता आणि ग्रामस्थांच्या अडचणींचा आढावा घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

# केवायसीच्या अटीमुळे कर्जमाफीपासून शेतकरी वंचित राहण्याची भीती!

### मृत शेतकरी, बोटांचे ठसे न उमटणारे आणि तांत्रिक अडचणी असलेल्या शेतकऱ्यांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी

किनवट : (स. गांवकरी)

राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी पीककर्जमाफीची घोषणा केल्यानंतर या योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्याची लगबग सुरू आहे. अनेक शेतकऱ्यांनी केवायसी (KYC) प्रक्रिया पूर्ण करून कर्जमाफीचा लाभ मिळविण्याच्या दिशेने पावले उचलली आहेत. मात्र, मृत शेतकऱ्यांची प्रकरणे, बोटांचे ठसे उमटत नसणे, आधार प्रमाणीकरणातील अडचणी तसेच इतर तांत्रिक समस्यांमुळे काही शेतकऱ्यांना ही प्रक्रिया पूर्ण करणे कठीण जात आहे. त्यामुळे अशा शेतकऱ्यांसाठी सहकार विभाग, बँका आणि महसूल विभागाने समन्वयाने विशेष उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी केवायसी आणि आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया महत्त्वाची मानली जाते. मात्र, ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांना प्रत्यक्षात ही प्रक्रिया पूर्ण करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः वयस्कर शेतकऱ्यांचे बोटांचे ठसे स्पष्ट उमटत नसल्याने त्यांचे बायोमेट्रिक प्रमाणीकरण होत नाही. परिणामी, आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असूनही काही शेतकऱ्यांना केवायसी पूर्ण करता येत नसल्याची परिस्थिती निर्माण होत आहे. याशिवाय, पीककर्ज घेतलेल्या शेतकऱ्याचा मृत्यू झाला असल्यास संबंधित कर्जखाते, वारस नोंद, कर्जाची थकबाकी आणि कर्जमाफीसाठी पात्रतेची पडताळणी या बाबी महत्त्वाच्या ठरतात. अशा प्रकरणांमध्ये वारसांना आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, बँकेशी संपर्क साधणे आणि संबंधित कार्यालयांमध्ये पाठपुरावा करणे यासाठी अनेक अडचणी येऊ शकतात. त्यामुळे मृत शेतकऱ्यांच्या पात्र कर्जखात्यांबाबत शासनाने स्पष्ट मार्गदर्शक सूचना जारी करून वारसांसाठी सुलभ प्रक्रिया निश्चित करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

केवळ तांत्रिक अडचणींमुळे किंवा बायोमेट्रिक प्रमाणीकरण होत नसल्यामुळे पात्र शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहू नयेत, यासाठी पर्यायी पडताळणीची व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. बोटांचे ठसे उमटत नसलेल्या शेतकऱ्यांसाठी अधिकृत पर्यायी ओळख पडताळणी, प्रत्यक्ष कागदपत्रांची तपासणी किंवा शासनाने मान्य केलेल्या अन्य पद्धतींचा अवलंब करण्याबाबत संबंधित यंत्रणांनी स्पष्टता द्यावी. तसेच तांत्रिक अडचणी असलेल्या शेतकऱ्यांना बँकांमध्ये वारंवार चकरा माराव्या लागू नयेत, यासाठी विशेष मदत कक्ष सुरू करण्याची गरज आहे.

शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी कर्जमाफी महत्त्वाची ठरू शकते. मात्र, या योजनेचा लाभ घेताना केवायसीच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असतील, तर त्यावर तातडीने उपाय शोधणे आवश्यक आहे. मृत शेतकऱ्यांच्या पात्र कर्जखात्यांसाठी वारसांच्या माध्यमातून प्रक्रिया पूर्ण करण्याची स्पष्ट व्यवस्था, बोटांचे ठसे न उमटणाऱ्यांसाठी पर्यायी प्रमाणीकरण आणि तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी विशेष यंत्रणा उभारावी. शासनाने या मागण्यांचा सकारात्मक विचार करून आवश्यक सुधारणा कराव्यात आणि पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून देण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

**सहकार, बँक आणि महसूल विभागाने समन्वय साधावा**

पीककर्जमाफीची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी सहकार विभागाने बँकांशी समन्वय साधून पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची पडताळणी करावी. महसूल विभागाने आवश्यकतेनुसार वारस नोंदी आणि संबंधित कागदपत्रांच्या पडताळणीसाठी मदत करावी. तसेच बँकांनी केवायसी पूर्ण न झालेल्या शेतकऱ्यांची प्रकरणनिहाय माहिती संकलित करून त्यातील अडचणी दूर करण्यासाठी मार्गदर्शन करावे, अशी मागणी होत आहे.

# नायगावच्या गटशिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार कैलास होनधरणे यांच्याकडे

नायगाव : (स. गांवकरी)

नायगाव पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी पदाच्या अतिरिक्त कार्यभारात बदल करण्यात आला असून, उमरी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सतीश गणपतराव दर्शनवाड यांच्याकडील नायगावच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार काढून घेण्यात आला आहे. त्यांच्या जागी किनवट पंचायत समितीअंतर्गत शिक्षण विभागात कार्यरत असलेले कैलास मधुकर होनधरणे यांच्याकडे नायगावच्या गटशिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याचे आदेश जिल्हा परिषद प्रशासनाने १६ ऑक्टोबर २०२६ रोजी जारी केले आहेत.

जिल्हा परिषद नांदेडच्या शिक्षण विभागामार्फत हा आदेश काढण्यात आला आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम ९५ अन्वये तसेच यापूर्वीच्या प्रशासकीय आदेशांचा संदर्भ घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रशासकीय आदेशानुसार, उमरी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सतीश गणपतराव दर्शनवाड यांच्याकडे नायगाव पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. मात्र, संबंधित पदाचा अतिरिक्त कार्यभार कमी करण्याबाबत विनंती करण्यात आल्याने जिल्हा परिषद प्रशासनाने कार्यभारात बदल करण्याचा निर्णय घेतला.

त्यानुसार, नायगाव पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार कैलास मधुकर होनधरणे, शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती किनवट-१ यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. त्यांना त्यांच्या मूळ पदाच्या जबाबदाऱ्यांसह नायगावच्या गटशिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळावा लागणार आहे.

**कारभार हस्तांतरणाचे निर्देश**

नवीन आदेशानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारून कार्यभार हस्तांतरणाचे प्रमाणपत्र सादर करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे नमूद करण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने हा आदेश निर्गमित करण्यात आला असून, शिक्षण विभागासह संबंधित प्रशासकीय कार्यालयांना याची प्रत पाठविण्यात आली आहे.

नायगाव पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने या पदभार बदलाकडे लक्ष लागले आहे.



क्षेत्रीय कार्यालय एल आय सी ऑफ इंडिया, संपदा विभाग, चर्चगेट, मुंबई विभाग. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### कनाशीच्या डोंगरकुशीत जागली जोगेश्वरी नवरात्राचा भक्ती सोहळा

कनाशी (स. गांवकरी) : डोंगराच्या कुशीत चहूबाजूंनी घनदाट झाडांनी वेढलेलं आणि चणकापूर धरणाच्या निसर्ग सौंदर्याने नटलेलं कनाशी गाव आणि याच गावचं आराध्य दैवत असलेल्या जोगेश्वरी मातेचा उत्सव यंदा मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात गजबजला आहे. रात्रीच्या वेळी झगमगत्या रोषणाईत न्हाऊन निघालेल्या जोगेश्वरी मंदिरात भाविकांची मांदियाळी लोटली होती. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आजूबाजूच्या गंगापूर वरखेडा मोहबारी करभेळ खडकवण सह गोळाखाल सह परिसरातून अशा असंख्य खेड्यापाड्यातून महिला, पुरुष आणि लहान मुलांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. जोगेश्वरी मातेच्या गाभाऱ्यात पाऊल टाकताच मन अगदी प्रसन्न होऊन जाते. ही देवी नवसाला पावणारी म्हणून संपूर्ण परिसरात प्रसिद्ध असून, येथील प्रत्येक भाविकाच्या मनामनात जोगेश्वरी माता भरली आहे. भाविक मोठ्या श्रद्धेने येथे साकडं घालतात आणि देवी पावते, अशी ठाम श्रद्धा आहे. शहरातील मोठमोठ्या मंडपातील कृत्रिम झगमगाटापेक्षा, डोंगराच्या कुशीतल्या या साध्या मंदिरातला भक्तीचा प्रकाश लाख मोलाचा आहे. निसर्गाच्या सानिध्यात भरलेली ही जत्रा म्हणजे कनाशीकरांसाठी मोठी पर्वणीच ठरली आहे.

### चारा उपलब्धतेसाठी 100 टक्के अनुदानावर वैरण बियाणे

नांदेड (स. गांवकरी) : जिल्ह्यातील सद्यस्थितीतील दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आगामी काळात पशुधनासाठी हिरव्या चाऱ्याची उपलब्धता वाढविणे तसेच संभाव्य चाराटंचाईवर मात करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत 100 टक्के अनुदानावर वैरण बियाणे उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येत आहे. या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील पात्र पशुपालकांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा प्रशासन आणि जिल्हा परिषद, नांदेड यांच्या पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे. पशुपालकाकडे वैरण पिकांच्या लागवडीसाठी सिंचनाची सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. वैरण पिकांची लागवड करण्याची तयारी असणे आवश्यक आहे. इच्छुक पशुपालकांनी दिलेल्या गुगल फॉर्ममध्ये आवश्यक माहिती भरून अर्ज सादर करावा. दुष्काळजन्य परिस्थितीत पशुधनासाठी हिरवा चारा उपलब्ध राहावा, यासाठी उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करून वैरण पिकांची लागवड करण्याचे नियोजन पशुपालकांनी आतापासूनच करावे. या उपक्रमामुळे संभाव्य चाराटंचाईच्या काळात पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता वाढण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पशुपालकांनी या उपक्रमात सहभागी होऊन वैरण लागवडीचे नियोजन करावे आणि 100 टक्के अनुदानावर उपलब्ध होणाऱ्या वैरण बियाण्याचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी केले आहे.

### प्रमाणपत्रांमुळे महिलांच्या कष्टाला मिळणार अधिकृत ओळख व सन्मान!

शिर्डी (स. गांवकरी) : राहता तालुक्यात आतापर्यंत २०, हजार महिला शेतकऱ्यांची प्रमाणपत्रासाठी नोंदणी झाली आहे. महिला शेतकरी प्रमाणपत्रांमुळे महिलांच्या कष्टाला अधिकृत ओळख व सन्मान मिळणार असून महिलांचा हा उत्स्फूर्त प्रतिसाद ग्रामीण भागातील महिलांचा कृषी क्षेत्रातील सक्रिय सहभाग आणि अधिकृत ओळख मिळविण्यामधील महत्वपूर्ण भूमिका ठरणार आहे ," असे प्रतिपादन विखे पाटील यांनी केले. महिला सक्षमीकरण विधेयकाच्या अनुषंगाने अहिल्यानगर जिल्ह्यात महिला शेतकरी प्रमाणपत्रांचे वाटप राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री डॉ .राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते राहता येथील कुंदन लॉन्स येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आले. महिला शेतकरी प्रमाणपत्रांमुळे ग्रामीण भागातील महिलांना शेती क्षेत्रात स्वतंत्र ओळख व सन्मान मिळणार असून, हा उपक्रम महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय ठरत आहे. कार्यक्रमात बोलताना विखे पाटील म्हणाले की, "शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांचे अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान असते. त्यांच्या कष्टांना, श्रमांना आणि कृषी क्षेत्रातील सहभागाला अधिकृत मान्यता मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने हे पाऊल उचलले आहे. महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख मिळवून देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि कृषी क्षेत्रातील विविध योजनांचा लाभ थेट त्यांच्यापर्यंत पोहोचवून त्यांना सक्षम करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे."



# कळवणच्या गणोरे पाटील पाड्यावर नवरात्रात घर्यादेवाचा जागर; मातीच्या घटात अखखं विश्व!

कळवण : (स. गांवकरी)

नवरात्र म्हटलं की शहरांमध्ये देवीच्या घटस्थापनेचा उत्साह, आकर्षक सजावट आणि मोठमोठ्या मंडपांतील उत्सव डोळ्यांसमोर येतात. मात्र नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्याच्या डोंगरपट्ट्यात आदिवासी बांधव नवरात्रोत्सवाला आपल्या पारंपरिक श्रद्धेची आणि संस्कृतीची जोड देतात. येथे नवरात्र म्हणजे केवळ घटस्थापना नसून, पिढ्यान्‌पिढ्या जपल्या जाणाऱ्या घर्यादिवाच्या श्रद्धेचा जागर आहे. पूर्वजांच्या परंपरेशी नाळ जोडणारा हा उत्सव आदिवासी जीवनपद्धतीचे वेगळेपण अधोरेखित करतो. काय आहे हा घर्यादेव? आदिवासी बांधव घटस्थापना का करतात? या परंपरेमागील रूढी, श्रद्धा आणि सांस्कृतिक महत्त्व नेमके काय आहे? या प्रश्नांचा वेध घेण्यासाठी दैनिक समर्थ गांवकरीच्या पथकाने कळवण तालुक्यातील गणोरे येथील पाटील पाड्यावर राम चौरे यांच्या निवासस्थानी भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली. शहरांमध्ये मोठमोठ्या मंडपांत देवीची प्रतिष्ठापना केली जात असताना, आदिवासी बांधवांच्या घरात मातीच्या छोट्याशा घटाला अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते. या घटामध्ये केवळ धार्मिक श्रद्धाच नाही, तर निसर्गाशी असलेले नाते, पूर्वजांविषयीचा आदर आणि पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या संस्कृतीचे दर्शन घडते.



डोंगराच्या कुशीत वसलेल्या आदिवासी पाड्यांवर आधुनिकतेच्या प्रवाहातही आपल्या परंपरा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. घर्यादिवाच्या माध्यमातून श्रद्धा, संस्कृती आणि पूर्वजांच्या वारशाचे जतन करणारी ही परंपरा खऱ्या अर्थाने समृद्ध आदिवासी लोकसंस्कृतीचे दर्शन घडवते. मातीच्या घटात अख्खं विश्व पाहणाऱ्या या श्रद्धेचा जागर समाजासमोर आणण्याचा प्रयत्न समर्थ गांवकरी न्यूजच्या पथकाने केला आहे.

# तरुणाईच्या सुदृढ आरोग्यासाठी 'मुख्यमंत्री आरोग्य संवाद' उपक्रम

नांदेड : (स. गांवकरी)

महाविद्यालयीन तरुणाईमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, आरोग्यदायी जीवनशैलीचा अंगीकार करण्यासाठी प्रोत्साहित करणे आणि मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून देणे या उद्देशाने राज्यात प्रथमच 'मुख्यमंत्री आरोग्य संवाद' हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए), नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. १५ ऑक्टोबर) सायंकाळी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील प्रांगणात 'जागर आरोग्याचा... मुख्यमंत्री आरोग्य संवाद' या विशेष कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे मुख्य समन्वयक रामेश्वर नाईक यांनी ऑनलाइन माध्यमातून सहभाग नोंदविला. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

तसेच महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषदेचे अध्यक्ष डॉ. संजय कदम, डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, आयएमएचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रल्हाद कोटकर, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार आणि डॉ. सूर्यकांत जोगदंड यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात वैद्यकीय तज्ज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ आणि आहारतज्ज्ञांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आरोग्याच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले.

# गोरखनाथ भांगरे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षण पुरस्कार जाहीर!

अकोले : (स. गांवकरी)

तालुक्यातील मनोहरपूर गावचे सुपुत्र आणि सध्या मुंबई परिसरात वास्तव्यास असलेले शिक्षक गोरखनाथ गजानन भांगरे सर यांना २०२६ चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षण पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षण क्षेत्रात त्यांनी केलेले उल्लेखनीय कार्य, आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी घेतलेले परिश्रम आणि शैक्षणिक, साहित्यिक व कलाक्षेत्रातील बहुआयामी योगदानाची दखल घेत त्यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने अकोले तालुक्यात आनंद व्यक्त होत आहे.

ठाणे जिल्ह्यातील दुर्गम ग्रामीण भागात शिक्षक म्हणून काम करताना भांगरे सर यांनी अनेक अडचणींवर मात केली. विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती वाढविण्यासाठी पालकांशी संवाद साधणे, त्यांच्या घरी भेटी देणे, गावात जनजागृती करणे आणि शिक्षणाबाबत समाजात जागरूकता निर्माण करणे, अशी कामे त्यांनी सातत्याने केली. शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी लांबचा



प्रवास करावा लागत असतानाही त्यांनी वेळेचे नियोजन आणि कर्तव्यनिष्ठा कायम ठेवली. आपल्या संस्थेच्या स्थापनेपासून त्यांनी योगदान दिले असून आजही विविध उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो.

शिक्षणाबरोबरच निबंधलेखन, कविता, लेखन, चित्रकला, सुलेखन, फलकलेखन आणि नाट्यसमीक्षण अशा विविध क्षेत्रांतही त्यांनी आपला ठसा उमटविला आहे. महाराष्ट्र स्तरावरील निबंध स्पर्धेत खुल्या गटातून सलग तीन वर्षे प्रथम क्रमांक मिळविण्याचा मान त्यांनी मिळविला. कृतीसंशोधन व शैक्षणिक साहित्यनिर्मिती या विषयांत त्यांनी संशोधन करून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडे (एमएससीईआरटी) प्रकल्प सादर केले आहेत.

# डांग जिल्ह्यातील काकरदा येथे ४० हून अधिक कुटुंबांचे सनातन हिंदू धर्मात 'घरवापसी'

डांग : (स. गांवकरी)

वघई तालुक्यातील काकरदा येथे ४० हून अधिक कुटुंबांनी ख्रिश्चन धर्मातून आपल्या मूळ सनातन हिंदू धर्मात स्वेच्छेने पुनर्प्रवेश केल्याचा दावा आयोजकांनी केला आहे. नवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त भेंसकातरी मायादेवी मंदिर परिसरात कृष्णदास बापू यांच्या सान्निध्यात या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास स्थानिक धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. स्थानिक पदाधिकारी औगड श्रीकृष्णदास यांनी दिलेल्या माहितीनुसार, या 'घरवापसी' कार्यक्रमात ४० हून अधिक कुटुंबांनी सहभाग घेतला. यामध्ये सुमारे ३५ अविवाहित मुली, २० अविवाहित तरुण आणि १० विधवा महिलांसह अनेकांनी सनातन हिंदू धर्म स्वीकारल्याचे आयोजकांनी सांगितले.



कार्यक्रमात उपस्थित अनिलभाई सिंगुभाई घोलू यांनी आपले अनुभव व्यक्त केले. पूर्वी आपण हिंदू धर्माचे अनुयायी होतो; मात्र कौटुंबिक अडचणी आणि परिस्थितीमुळे ख्रिश्चन धर्माशी जोडले गेलो होतो, असे त्यांनी सांगितले. तेथे अनुकूल वाटत नसल्याने आणि मायादेवी मंदिरातील कार्यक्रमामुळे प्रेरणा मिळाल्याने आपण आपल्या कुटुंबासह स्वेच्छेने हिंदू धर्मात परतण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

यापुढे आपण सनातन हिंदू धर्माशीच जोडलेले राहणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. आयोजकांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वीही संक्रांत आणि जन्माष्टमीसारख्या धार्मिक सणांच्या निमित्ताने अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. कोणावरही दबाव किंवा बळजबरी न करता, स्वेच्छेने आपल्या मूळ धर्मात परतू इच्छिणाऱ्यांचे स्वागत करणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.नवरात्रीच्या काळात काकरदा येथील मायादेवी मंदिर परिसरात आयोजित या धार्मिक कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

# दिलीप वळसे पाटील महाविद्यालय व श्री पांडुरंग कनिष्ठ महाविद्यालयात 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा

आळेफाटा : (स. गांवकरी)

श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि श्री पांडुरंग कनिष्ठ महाविद्यालय येथे भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ व भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर रोजी 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रंथालय विभाग, मराठी विभाग आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मंगल उनवणे यांनी केले, तर प्रा. नीलम गायकवाड यांनी प्रास्ताविकातून वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व विशद केले. वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडते, विचारशक्ती विकसित होते आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो, असे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रा. अनिल पडवळ, प्रा. अमित मुलानी आणि प्रा. गवारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी



जीवनप्रवासातून विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा, नियमित वाचनाची सवय लावून घ्यावी आणि पुस्तकांच्या माध्यमातून आपले ज्ञान समृद्ध करावे, असे आवाहन त्यांनी केले. वाचन हे केवळ परीक्षेपुरते मर्यादित न ठेवता जीवनाचा अविभाज्य भाग बनवावे, असेही त्यांनी नमूद केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. प्रल्हाद शिंदे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत मार्गदर्शन केले. डॉ. कलाम यांचे जीवन हे जिद्द, मेहनत, ज्ञान आणि स्वप्नपूर्तीचे प्रेरणादायी उदाहरण आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन मोठी स्वप्ने पाहावीत, ज्ञानप्राप्तीसाठी सातत्याने प्रयत्न करावेत आणि वाचनाच्या माध्यमातून स्वतःचा सर्वांगीण विकास साधावा, असे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. सुभाष घोडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास दोन्ही महाविद्यालयांतील प्राचार्य, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, ज्ञानाची गोडी वाढवणे आणि वाचन संस्कृती अधिक समृद्ध करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)
कोकण विभागीय कार्यालय : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र, २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : ३०२ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार दि. १७ ऑक्टोंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## शेवगावात निसर्गाची क्रूर विटंबना! हजारो झाडांची कत्तल, शेकडो टन लाकूड वखारीत

### निष्काळजी अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होणार?

शेवगाव/पोपट पिटेकर (समर्थ गांवकरी)

एकीकडे राज्य शासन झाडे लावा, झाडे जगवा असा नारा देऊन कोट्यवधी रुपये पर्यावरणाच्या संवर्धनावर खर्च करत असताना, दुसरीकडे अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यात मात्र निसर्गाची अत्यंत क्रूर आणि भीषण कत्तल सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. तालुक्यात हजारो झाडांची अवैध कत्तल करून शेकडो टन लाकडाचा साठा गेवराई रोडवरील वसीम शेख यांच्या वखारीवर साचवण्यात आला आहे. या संपूर्ण पर्यावरणाच्या विनाशाकडे वनविभागाचे अधिकारी डोळे झाकून बघ्याची भूमिका घेत असल्याने, शेवगावचा वनविभाग फक्त कागदावरच उरलाय का? असा संतापजनक सवाल नागरिक विचारत आहेत.

झाडांच्या कत्तलीला जबाबदार कोण? वनविभागाकडून तस्करांना अभय?

शेवगाव परिसर आणि आसपासच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर वृक्षतोड सुरू आहे. निष्पाप अन् मुक्या झाडांचा बळी देऊन लाकूड माफिया आपले खिसे भरत आहेत. या अवैध लाकूड तस्करीला आणि हजारो झाडांच्या बळीला वनविभागाचे अधिकारी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे अभय देत आहेत का, असा संशय आता बळावला आहे. वनविभागाच्या या 'कुंभकर्णी' झोपेमुळे नागरिकांमधून अत्यंत तीव्र संताप व्यक्त केला जात असून, कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर आणि माफियांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.









आदर्श ग्रामपंचायत वाघोलीचा दणका: मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचा अंतिम इशारा!–

या गंभीर आणि जीवघेण्या प्रकारानंतर आता माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत प्रथम पुरस्कार प्राप्त 'आदर्श ग्रामपंचायत वाघोली' अत्यंत आक्रमक मोडमध्ये आली आहे.

ग्रामपंचायतीने बेकायदेशीर वृक्षतोडीविरोधात थेट अंतिम कडक नोटीस जारी करत माफियांसह निष्काळजी अधिकाऱ्यांचे धाबे दणाणून सोडले आहेत.

ग्रामपंचायतीने दिलेल्या नोटीसमध्ये स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की:

पूर्वपरवानगी अनिवार्य: ग्रामपंचायत हद्दीतील खाजगी किंवा सार्वजनिक जागेतील झाडे तोडण्यापूर्वी ग्राम पंचायतीची अधिकृत परवानगी (NOC) घेणे बंधनकारक आहे.

वखारींना बंदी: कोणत्याही परवानगीशिवाय तोडलेले लाकूड खरेदी–विक्रीसाठी वखारीत स्वीकारल्यास वखार मालकावर कडक कारवाई होईल.

'मनुष्यवधाचा गुन्हा':विनापरवानगी आणि निष्काळजीपणे तोडलेल्या झाडांमुळे किंवा तोडणीदरम्यान अपघात होऊन एखादी जीवितहानी घडल्यास, संबंधित तोडणाऱ्या व्यक्तीवर, लाकूड वखार मालकावर भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम ान्वये 'मनुष्यवधाचा गुन्हा' दाखल केला जाईल

वखार सील आणि दंडात्मक कारवाई: बेकायदेशीर लाकूड आढळल्यास वखार तातडीने सील करून फौजदारी कारवाई करण्यात येईल.

ग्रामपंचायतीच्या पूर्वपरवानगीशिवाय सुरू असलेली ही वृक्षतोड मानवी जीवितास आणि पर्यावरणास अत्यंत धोकादायक आहे. निसर्गाचा विनाश करणाऱ्या आणि नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या माफियांसह याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही!– उमेश भालसिंग, वृक्षप्रेमी

प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष–

पर्यावरणाचा समतोल ढासळत असताना शेवगावात सुरू असलेला हा लाकूड तस्करीचा गोरखधंदा थांबणार की प्रशासकीय अधिकारी नेहमीप्रमाणे कागदी घोडे नाचवत गप्प बसणार? वाघोली ग्रामपंचायतीने उचललेल्या या आक्रमक पावलामुळे आता लाकूड माफियांचे आणि ढिम्म वनविभागाचे धाबे दणाणले आहेत.

## दुष्काळावर मात करण्यासाठी विविध विभागांशी समन्वय साधावा

### मृद व जलसंधारण, ग्रामविकास आणि रोहयो विभागाच्या एकत्रित बैठकीत निर्देश

मुंबई (समर्थ गांवकरी)

राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाची कामे अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी मृद व जलसंधारण विभाग, ग्रामविकास व पंचायतराज विभाग आणि रोजगार हमी योजना (रोहयो) विभागाची जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमवेत दूरदृश्य प्रणालीद्वारे एकत्रित बैठक पार पडली. मृद व जलसंधारण विभागामार्फत राज्यात राबविण्यात येणारी जलसंधारणाची कामे, रोहयोअंतर्गत होणारी कामे आणि मुख्यमंत्री समृद्ध पंचायत योजना यांची कामे परस्पर समन्वयाने व अभिसरणाच्या माध्यमातून राबवावीत. विविध योजनांमधील कामांचे नियोजन आणि अंमलबजावणी करताना सुसूत्रता राखून उपलब्ध मनुष्यबळ, साधनसंपत्ती आणि निधीचा प्रभावी वापर करावा, असे निर्देश या बैठकीत देण्यात आले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाच्या कामांना गती देणे, विविध विभागांमध्ये समन्वय वाढविणे आणि योजनांच्या अंमलबजावणीत एकात्मिक दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने जिल्हास्तरावर संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कामांचे



नियोजन करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. या बैठकीस ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, तसेच रोजगार हमी योजना विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज उपस्थित होते. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

## राहता तालुका टंचाई आढावा बैठक

## उपलब्ध पाण्याचे सूक्ष्म नियोजन आणि जलस्रोतांचे बळकटीकरण करावे : पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

शिर्डी (समर्थ गांवकरी)

टंचाई निवारण्यासाठी उपलब्ध पाण्याचे सूक्ष्म नियोजन करण्याबरोबरच पाणी स्रोताचे बळकटीकरण मध्ये, दुरुस्ती, खोलीकरण करावे, तसेच ग्रामविकास व महसूल, महावितरण आणि पाणीपुरवठा कृषी आणि पशुसंवर्धन या विभागाने समन्वयाने काम करण्याचे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

राहता येथे तालुकास्तरीय टंचाई आढावा बैठकीचे आयोजन कुंदन हॉल येथे करण्यात आले होते. यावेळी शिर्डी नगराध्यक्ष जयश्री थोरात, उपनगर अध्यक्ष अभय शेळके, राहता नगर परिषदेचे नगराध्यक्ष स्वाधीन गाडेकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी , प्रभारी जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधीर बोराळे, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त उमेश पाटील, तहसीलदार अमोल मोरे, गटविकास अधिकारी विवेक गुंड,यांच्यासह कृषी, पशुसंवर्धन जलसंपदा, महावितरण व सर्व विभागाचे तालुकास्तरीय विभाग प्रमुख, शेतकरी , नागरिक,उपस्थित होते.

पाणी टंचाईच्या निवारणार्थ विविध पाण्याचे स्रोत बळकटीकरण करण्यासाठी कालवे , सिंचन विहिरी, नाले आणि बंधाऱ्याच्या दुरुस्ती करून पाण्याची पाणी गळती थांबावे यासाठी स्वच्छता करण्यात यावी. यासाठी जलसंपदा विभागाने पुढाकार घेतलेला आहे .यात महावितरण कंपनी आणि संबंधित यंत्रणेने पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी आवश्यक असलेला वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा. वारंवार येणाऱ्या शेजाऱ्याच्या विजेचा प्रश्न उद्भवू नये यासाठी योग्य वीजप्रवाह करण्यावर तांत्रिक बाबतीत दक्षता घ्यावी.

लग्न सोहळे व विविध उत्सवातील खर्च कमी करावा–

राज्यातील टंचाईची परिस्थिती पाहता लग्न सोहळे व विविध उत्सवावर होणारा खर्च कमी करण्याचे आवाहन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.



कृषी विभागाने कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ट्रॅक्टर आणि विविध अवजारासाठी असलेले अनुदान शेतकऱ्यांना वेळेत उपलब्ध करून द्यावे, शिर्डी आणि राहता नगर परिषदेने पाणी वापराबाबत नागरिकांमध्ये जाणीव जागृती करून पाण्याचा जपून आणि काटकसरीने योग्य वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.

आढावा बैठकीनंतर जिल्हा परिषदेचा सामान्य प्रशासन विभागाअंतर्गत अनुकंपा तत्त्वावर देण्यात आलेल्या उमेदवारांना नियुक्ती पत्राचे वितरण पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले .यामध्ये आदित्य अनाम, युवराज डोईफोडे, जीविका खांडेकर, प्रवीण पुणेकर, ललिता साळवे प्रथमेश कुसळेकर रिहान खान यांच्यासह इतर उमेदवारांना यांना लिपिक, कनिष्ठ अभियंता, शिक्षक सेवक, ग्रामपंचायत अधिकारी व अन्य पदावरील नियुक्ती पत्राचे वितरण केले.

## १०वी- १२वी उत्तीर्णांसाठी सुवर्णसंधी, सर्वोच्च न्यायालयात बंपर भरती; साठ हजारांहून अधिक असेल पगार

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

सुप्रीम कोर्टामध्ये तरूणांना नोकरी करण्याची संधी आहे. वेगवेगळ्या रिक्त पदांसाठी सुप्रीम कोर्टामध्ये नोकरभरती केली जाणार आहे. त्यामुळे जर तुम्ही देखील सरकारी नोकरीच्या शोधात असाल तर, ही महत्त्वाची बातमी तुमच्यासाठी आहे. भारतीय सर्वोच्च न्यायालयामध्ये १३० रिक्त पदांसाठी भरती केली जाणार आहे. केंद्र सरकारच्या अखत्यारित काम करण्याची संधी हव्या असणाऱ्या गरजू आणि पात्र उमेदवारांसाठी ही एक अत्यंत महत्त्वाची संधी आहे.



भारतीय सर्वोच्च न्यायालयामध्ये, 'ज्युनिअर कोर्ट अटेंडंट' (Junior Court tendant) पदासाठी एकूण १३० रिक्त जागा भरल्या जाणार आहेत. या पदासाठी जर तुम्हाला अर्ज भरायची इच्छा असेल तर, तुमच्याकडे सरकारी मान्यताप्राप्त मंडळातून किमान दहावी ते बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. या सर्व शैक्षणिक पात्रता असणाऱ्या कोर्सेसचं तुमच्याकडे सर्टिफिकेट असणंही महत्त्वाचं आहे. उमेदवाराचं वय ०१ ऑक्टोबर २०२६ रोजी १८ ते २७ वर्षांदरम्यान असावे. शासकीय नियमांनुसार राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयोमर्यादेत सूट देण्यात आली आहे, अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) उमेदवारांना ०५ वर्षे, तर इतर मागासवर्गीय (OBC) उमेदवारांना ०३ वर्षांची सूट देण्यात आली आहे.

१६ ऑक्टोबर २०२६ पासून अर्थात आजपासून सुरू झालेल्या ह्या भरती प्रक्रियेचा शेवटचा दिवस २५ नोव्हेंबर २०२६ हा शेवटचा दिवस असेल. ऑनलाईन पद्धतीने उमेदवारांना अर्ज भरावा लागणार आहे. अनुसूचित जाती (डउ), अनुसूचित जमाती (ST), इतर मागासवर्गीय (OBC), दिव्यांग व्यक्ती (PwDs) आणि माजी सैनिक ($ExSM^2$) या उमेदवारांना ₹७५० फी असेल, तर खुल्या प्रवर्गातील उम `दवारांना ₹१५०० फी भरावी लागणार आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयामध्ये निवड झालेल्या उमेदवारांना दिल्लीमध्ये नियुक्ती दिली जाईल. 'ज्युनिअर कोर्ट असिस्टंट' वेतनाविषयी सांगायचे तर, 'पे मॅट्रिक्स'च्या लेव्हल ३ नुसार २१,७०० रुपये ते ६९,१०० रुपये दरम्यान वेतनश्रेणी असेल. यामध्ये सुरुवातीचे मूळ वेतन (Basic Pay) २१,७०० रुपये अधिक नियमानुसार इतर सरकारी भत्तांचा समावेश असेल. दरम्यान, भारतीय सर्वोच्च न्यायालयाने परिक्षेची तारीख सुद्धा जाहीर केलेली आहे. परिक्षेची तारीख २६ डिसेंबर २०२६ असेल. याची परिक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी.






# नवसाला पावणारी निघोजची मळगंगा देवी

निघोज (समर्थ गांवकरी)

राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचा महिमा राज्यात सर्वदूर आहे. नवसाला पावणारी देवी म्हणून मळगंगा मातेचा महिमा असून चैत्र शुद्ध अष्टमीला तसेच नवरात्र उत्सवात मळगंगा देवीच्या दर्शनाला लाखो भाविक राज्य तसेच परराज्यातून मोठ्या संख्येने येत असतात. मळगंगा देवीचे पुणे व अहिल्यानगर जिल्ह्यात सात स्थाने असून निघोजची माता मळगंगा ही देवी या सातही स्थानात मोठी बहीण म्हणून या मातेचे स्थान महत्वपूर्ण आहे. या सात स्थानातील सर्व बहिणी चैत्र अष्टमीला होणाऱ्या यात्रेसाठी पालखीमधून या ठिकाणी येत असतात यात्रा उत्सव तब्बल दहा दिवस सुरू असतो देवीला हळद लावणे काठी उभारणे तसेच पालखी छबिणा मिरवणूक तसेच घागर दर्शन अशाप्रकारे हा उत्सव राज्यात नावलौकिकास पात्र ठरला आहे. जगप्रसिद्ध रांजणखळगे कुंडावरील यात्रा व मळगंगा देवीची गावांतील यात्रा जवळपास पंधरा दिवस सुरू असते किमान पाच लाखांपेक्षा जास्त भावीक या यात्रेसाठी उपस्थित असतात. देवीचे वर्षातील उस्तवासाठी भावीकांची मोठ्या संख्येने गर्दी असते यामध्ये श्रावण महिन्यातील पालखी सोहळा खैराडी येथे जात असतो. तसेच नवरात्र उत्सवात दहा दिवस दररोज हजारोंच्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात. घटस्थापना ते दसरा या दहा दिवसात भावीक राज्यभरातून मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी करतात. विशेष म्हणजे या तीनही उस्तवात पशूहत्या होत नाही. हे या देवीच्या उस्तवाचे आगळे वेगळे वैशिष्ट्य आहे. नवरात्र उत्सवात महिला भगिनी व भावीक नवरात्र उपवास धरीत देवीची आराधना करतात.दररोज देवीचे पुजारी पहाटे पुजा अर्चा करतात. तसेच देवीच्या महाआरतीचा मान येथील गोंधळी समाजातील दुणगुले कुटुंबाला आहे. दुणगुले कुटुंबातील सदस्य दररोज पहाटे व सायंकाळी देवीची महाआरती संबळ वाद्यांच्या माध्यमातून करतात या महाआरतीसाठी भावीक मोठ्या संख्येने गर्दी करतात. नवरात्र उत्सवात या सायंकाळच्या महाआरतीचा मान मान्यवर व्यक्तींना दिला जातो. तसेच बहुतांश व्यक्ती तसेच लोकप्रतिनिधी यांच्या वतीने सायंकाळी महाप्रसादाचे वाटप करण्यात येते. गोंधळी कुटुंबातील सदस्य महाआरतीबरोबर दसरा नवरात्र उत्सव तसेच दिवाळी कार्यकाळात निघोज पंचक्रोशीतील घरोघरी जाऊन देवीची महती असणारी गाणी गातात ही धार्मिक प्रथा गेली कित्येक वर्षांपासून सुरू आहे. नवरात्र उत्सवात मळगंगा मंदीराच्या मंदीरात समयांचा दिपमहोस्तव दहा दिवस सुरु असतो. घरोघरच्या महिला भगिनी या समया दहा दिवसांसाठी मंदीरात ठेवतात त्यासाठी वाती व तेल देतात या समयांच्या माध्यमातून ही सेवा दिवसरात्र अखंडीत सुरू असते. दहाही दिवस मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट तसेच ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांना मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. नवव्या माळेला देवीचा होम मंदीरापुढे करण्यात येतो सकाळी आठ वाजता होमहवण विधी सुरू होतो. याचे पौराहित्य करण्याचा मान येथील पोपटकाका देशपांडे, बाळूकाका देशपांडे व प्रभाकर काका रसाळ यांना आहे या होम हवण विधीस येथील ज्येष्ठ ग्रामस्थ व गावचे जुने जाणते कारभारी नानासाहेब धोंगडे यांचे कुटुंब बसत असते. यामध्ये सचिन धोंगडे, संदीप धोंगडे व त्यांच्या कुटुंबीयांना या होमहवण विधीस बसण्याचा मान दिला जातो. घटस्थापना सुद्धा धोंगडे कुटुंब व देशपांडे कुटुंबाच्या हस्ते तसेच गायखे पुजारी महिला भगिनी यांच्या हस्ते होत असते. दहाही दिवस पोपटकाका देशपांडे हे दररोज दोन तास देवी महात्म्य वाचन करीत असतात तसेच दररोज पहाटे पाच ते सहा असे एक तास गावातील महिला देवी स्तोत्र तसेच देवी महात्म्य वाचन मंदीरात करीत असतात. देवीचा होमवीधीसाठी




भावीक या होमात श्रीफळ व तूप टाकीत असतात. जवळपास दोन दिवस हा होम धूपत असतो. या होमाचे दर्शन घेण्यासाठी राज्यभरातून मोठ्या संख्येने भावीक येत असतात. दहाव्या माळेला दसरा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दुपारी देवीचा पालखी सोहळा मिरवणुकीने वाजत गाजत

कुंडावर जातो या वेळी कुंडावर महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. त्यानंतर पुन्हा ही पालखी गावाकडे आणण्यात येते. कुंड रस्त्यावर असलेल्या खंडोबा पाऊतके परिसरात देवीच्या पालखीखाली शिलांगण कार्यक्रम म्हणजे सोने लुटण्याचा कार्यक्रम संपन्न होतो या ठिकाणी पालखी विसावा तयार करण्यात आला आहे.पालखी या ठिकाणी विसाव्यासाठी थांबवीण्यात येते. यावेळी जवळपास सायंकाळी सहा ते रात्री नऊ वाजेपर्यंत महिला भगिनी देवीचे औषन करतात तसेच हजारो भावीक देवी दर्शनाचा लाभ घेतात. त्यानंतर रात्री ही पालखी छबिणा मिरवणूक मोठ्या उत्साहात सुरु होते.ढोल लेझीम ताशा, झांज पथक या वाद्याने मिरवणुकीला शोभा येते. यावेळी देवीच्या जयजयकाराच्या घोषनांनी परिसर निनादून जातो. फटाक्यांची आतषबाजी व भंडाऱ्यांची उधळण करीत भावीक नाचण्याचा आनंद घेतात. रात्री नऊ वाजता सुरू झालेली ही मिरवणूक मळगंगा देवीच्या मंदीरापर्यत जाण्यासाठी जवळपास साडेबारा वाजतात त्यानंतर देवीची महाआरती करुण नवरात्र उत्सव व दसरा या सणाची सांगता करण्यात येते.

# सेवा संकल्प अभियानातून २७३ अति तीव्र कुपोषित बालकांच्या पोषणाची जबाबदारी अधिकाऱ्यांकडे

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

- प्रत्येक बालकाला स्वखर्चातून सकस आहार
- कुपोषणमुक्त होईपर्यंत नियमित गृहभेटी व आरोग्य देखरेख

जिल्ह्यातील अति तीव्र कुपोषित (सॅम – SAM) बालकांच्या आरोग्य व पोषणस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी जिल्हा परिषद, अहिल्यानगर प्रशासनामार्फत विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. शासनाच्या 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' जिल्ह्यातील सर्व २७३ सॅम बालकांची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्यासह जिल्हा परिषद व पंचायत समितीस्तरावरील विभागप्रमुख, वैद्यकीय अधिकारी आणि पर्यवेक्षिका यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत १६ ऑक्टोबर रोजी सर्व संबंधित पालक अधिकाऱ्यांनी बालकांच्या घरी प्रत्यक्ष गृहभेट देऊन त्यांच्या आरोग्याची व पोषणस्थितीची पाहणी केली. यावेळी प्रत्येक बालकासाठी एक महिन्याचा पुरेसा सकस आहार आणि त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद अधिकाऱ्यांनी स्वत: केलेली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा उद्देश सॅम बालकांना आवश्यक पोषण, वैद्यकीय उपचार आणि नियमित देखरेख उपलब्ध करून देऊन त्यांना सर्वसाधारण पोषण श्रेणीत आणणे हा आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्व २७३ बालकांना संबंधित अधिकारी दत्तक देऊन त्यांची पालक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही २७३ बालके सकस आहार आणि औषधोपचाराने काही कालावधीनंतर सर्वसाधारण श्रेणी मध्ये गेल्यानंतर इतर अति तीव्र कुपोषित बालके आढळल्यास त्यांना देखील दत्तक घेण्याची ही चळवळ पूर्ण वर्षभर सुरू राहणार आहे.

गृहभेटीतून आरोग्य व पोषणस्थितीचा आढावा

गृहभेटीदरम्यान पालक अधिकाऱ्यांनी बालकांच्या कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांच्या आहाराच्या सवयी, आरोग्यविषयक गरजा आणि संगोपनाच्या पद्धतींचा आढावा घेतला. बालकांना पुरेसा व सकस आहार मिळतो का, त्यांच्या आरोग्यात सुधारणा होत आहे का, तसेच आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत का, याची पाहणी करण्यात आली. प्रत्येक बालकाला महिनाभर पुरेल इतका सकस आहार उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

बालकांच्या आरोग्यविषयक गरजांनुसार वैद्यकीय तपासणी आणि औषधोपचार उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित वैद्यकीय अधिकारी व अंगणवाडी सेविका यांच्या समन्वयाने कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे बालकांच्या पोषणाकडे केवळ आहारपुरवठ्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्या आरोग्याच्या सर्वांगीण सुधारणेकडे लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

कुपोषणमुक्त होईपर्यंत अधिकाऱ्यांची नियमित देखरेख

संबंधित बालक सर्वसाधारण पोषण श्रेणीत येईपर्यंत त्याच्या आरोग्याची आणि पोषणाची जबाबदारी नियुक्त पालक अधिकाऱ्यांकडे निश्चित करण्यात आली आहे. हे अधिकारी दर महिन्याला किमान एकदा बालकाच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन त्याच्या वजनातील वाढ, पोषणस्थिती, आरोग्य आणि उपचारांच्या प्रगतीची पाहणी करणार आहेत. बालकाच्या आरोग्यात शाश्वत सुधारणा होऊन ते सर्वसाधारण पोषण श्रेणीत येईपर्यंत ही प्रक्रिया वर्षभर नियमितपणे राबविण्यात येणार आहे. गृहभेटी, सकस आहाराची उपलब्धता, वैद्यकीय तपासणी आणि नियमित निरीक्षण यांच्या माध्यमातून प्रत्येक बालकाच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यात येणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी सांगितले.

कुपोषण निर्मूलनासाठी प्रशासनाचा विशेष पुढाकार

बालकांच्या आरोग्यपूर्ण वाढीसाठी पोषक आहार, वेळेवर उपचार आणि कुटुंबीयांचे योग्य मार्गदर्शन महत्त्वाचे आहे. ही बाब लक्षात घेऊन सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हा परिषद प्रशासनाने २७३ अति तीव्र कुपोषित बालकांच्या पोषणाची जबाबदारी निश्चित केली आहे.

# सेवा संकल्प अभियान अंतर्गत कल्याण ग्रामीणमध्ये मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापनाविषयी मार्गदर्शन सत्रे



ठाणे (समर्थ गांवकरी)

सेवा संकल्प अभियान अंतर्गत महिलांचे आरोग्य, मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन आणि या विषयाबाबत समाजात असलेला संकोच दूर करण्याच्या उद्देशाने एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, कल्याण ग्रामीण यांच्या वतीने महिला व बाल कल्याण विभाग आणि सिटिझन्स असोसिएशन फॉर चाइल्ड राइट्स (CACR ) या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने दि. १४ व १५ ऑक्टोबर २०२६ रोजी कल्याण ग्रामीण परिसरातील सात ग्रामपंचायतींमध्ये मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात सुमारे ४०० महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या मार्गदर्शन सत्रांमध्ये गावातील महिला, किशोरवयीन मुली, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स, परिचारिका, शासकीय कर्मचारी तसेच इतर नागरिक सहभागी झाले. CACR संस्थेच्या वतीने प्रणाली पोळ, शीतल पटेल आणि कृतिका मांडलिक यांनी मासिक पाळीविषयी सविस्तर माहिती देऊन महिलांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण केली.

मासिक पाळी म्हणजे काय, ती का येते, तिची नैसर्गिक प्रक्रिया कशी असते, मासिक पाळीदरम्यान वैयक्तिक स्वच्छता कशी राखावी, योग्य आहाराचे महत्त्व आणि आरोग्यदायी सवयी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मासिक पाळीविषयी समाजात प्रचलित असलेले गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करण्यावर भर देण्यात आला. उपस्थित महिलांच्या मनातील शंका आणि प्रश्नांचे निरसनही करण्यात आले.

मासिक पाळी हा महिलांच्या आरोग्याशी संबंधित नैसर्गिक विषय असून, त्याबाबत लाज किंवा संकोच न बाळगता मोकळेपणाने संवाद साधणे आवश्यक आहे, हा महत्त्वपूर्ण संदेश या सत्रांतून देण्यात आला. सुरुवातीला काही महिला संकोच व्यक्त करत असल्या, तरी सत्र पुढे जात असताना त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. महिलांनी आपले अनुभव मांडले, उपलब्ध माहितीची देवाणघेवाण केली आणि विषयावर मोकळेपणाने चर्चा केली.

या उपक्रमाचे नियोजन व मार्गदर्शन बाल विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती धनश्री मोहनराव साळुंखे यांनी केले. पर्यवेक्षिका उषा लांडगे व सुनीता भांगरे उपस्थित होत्या. संबंधित ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसेवक आशाबाई बडे, प्रसेन गोतारने, माधुरी राठोड, कैलास जाधव, अमृता शेळके, राजेंद्र सनारे आणि द्वारकानाथ भेरे यांनी आयोजनासाठी सहकार्य केले.

# कथा नवरात्रीच्या, महाशक्तीशाली त्रिनेत्री-रक्त बीज नाशिका, माता कालरात्री

**प्रिय वाचकहो आजची कथा अत्यंत रंजक अशी असून ब्रह्मदेवाच्या अजब व अविचारी वरदानामुळे सृष्टीतील चराचराला व तिन्ही लोकांतील लोकांना राक्षसाने कसे त्रासून सोडले हे आपण पाहणार आहोत, म्हणून आजच्या महाशक्ती त्रिनेत्री देवीचे कार्य अत्यंत महत्वाचे मानले जाते,**

## कथा पुष्प सातवे




नवरात्रीच्या सातव्या दिवशी, *महासप्तमीला, दुर्गा देवीच्या अत्यंत शक्तिशाली आणि उग्र अशा 'माता कालरात्री' रूपाची पूजा केली जाते

हे रूप दिसायला अत्यंत भयानक आहे, परंतु भक्तांसाठी ते अत्यंत कल्याणकारी आहे. 'काल' म्हणजे वेळ किंवा मृत्यू आणि 'रात्री' म्हणजे अंधार किंवा नाश.या देवीचे नावच सूचित करते की ती सर्व प्रकारच्या भीती, अंधार, नकारात्मक शक्ती आणि प्रत्यक्ष मृत्यूचाही नाश करणारी आहे.

माता कालरात्रीचे स्वरूप अत्यंत वेगळे आणि भव्य दिव्य आहे.

तिचा वर्ण कृष्ण (गडद काळा) असून तिचे केस मोकळे, विखुरलेले आहेत. तिला तीन डोळे आहेत, त्यामुळे ती संपूर्ण विश्वाचे नियंत्रण करते तिच्या गळ्यात विजेसारखी चमकणारी मुंडमाला आहे.

महाशक्तीला चार हात आहेत. तिच्या एका हातात खड्ग (तलवार), दुसऱ्या हातात लोखंडी काटा/अस्त्र आहे, तर उरलेले दोन हात भक्तांना अभय आणि वरदान देणाऱ्या मुद्रेत आहेत तिचे वाहन गर्दभ (गाढव) आहे, जे तिला सर्वात उग्र रणांगणावरही स्थिर आणि शक्तिशाली ठेवते.

पौराणिक कथेनुसार, जेव्हा शुंभ आणि निशुंभ या महाप्रतापी असुरांनी तिन्ही लोकांत प्रचंड हाहाकार माजवला होता, तेव्हा सर्व देवांच्या विनंतीवरून देवीने हे महाउग्र रूप धारण केले त्यांच्या सैन्यातील अत्यंत बलवान आणि प्रमुख सेनापती म्हणजे 'रक्तबीज' होता.

रक्तबीजाची तपश्चर्या आणि ब्रह्मदेवांचे वरदान:

रक्तबीजाने ब्रह्मदेवांना प्रसन्न करण्यासाठी अत्यंत कठोर तपश्चर्या केली होती. त्याच्या या उग्र तपश्चर्येवर प्रसन्न होऊन भगवान ब्रह्मदेवांनी त्याला वर मागण्यास सांगितले,

तेव्हा मला अमर होण्याचा वर द्या अशी मागणी असुराने केली,

ते शक्य नाही असे ब्रम्हदेवाने सांगताच मला दुसरा वर द्या अशी मागणी असुराने केली,

तेव्हा असुराने माझ्या रक्ताचा थेंब जर जमिनीवर पडला तर माझ्यासारखाच असुर त्या रक्तातून निर्माण व्हावा, असा वर मागितला, ब्रम्हदेवाने तथास्तु म्हणताच तो असुर सेनापती रक्तबीज हा भय मुक्त झाला पण पुढे मात्र त्यांनी देवांना व भूमीवरील चराचराला त्रास देण्यास सुरुवात केली,

असुर सैन्यात शुंभ व नीशुंभ हे असुरातील महाबलवान राक्षस होते, त्यांनी तिन्ही लोकात हाहाकार माजऊन सर्वांनाच सळो की पळो करून सोडले, आणि घनघोर युद्धाला सुरुवात झाली, या युद्धात देवांनी देवी कालरात्रीला अनेक प्रकारची शश्रे दिली, त्याचा वापर करून देवी अत्यंत कठोर होऊन राक्षसांचा संहार करीत होती रक्तासुरावर शश्र प्रहार होताच रणभूमीवर त्याचे रक्त पडू लागले

आणी

ब्रम्हदेवाने दिलेल्या वरदानामुळे त्याच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबातून असंख्य राक्षस निर्माण होऊ लागले,

तेव्हा देवीने तिसरा डोळा उघडून अत्यंत उग्र रूप धारण करून आपल्या जिभेने रक्त पिण्यास सुरुवात केली, आता मात्र राक्षस निर्माण होणे थांबले, म्हणूनच तिला महा शक्तिशाली असुर संहारक, त्रीनेत्री, रक्तशोषिनी असे म्हणतात

जिने महाशक्तीशाली शुंभ व निशुंभ यांचा संहार तर केलाच पण अगणित असुरांचा नाश केला, व वर प्राप्त झालेल्या प्रमुख सेनापती रक्त बीज याचे रक्त जमिनीवर पडू न देता

एका पात्रात जिभेने जमा करून घेतले व त्याचाही वध केला,त्यामुळे रक्तबिजाच्या थेंबातून निघत असलेल्या राक्षसांची उत्पन्न होण्याची किमया संपली,कालरात्री देवीना विजय प्राप्त झाला, शेवटी देवीने महाशक्तीशाली दुष्ट राक्षसांचा संहार करून तिन्ही लोकांना भयमुक्त केले त्यामुळे महाशक्ती दुर्गा कालरात्रीदेवीला अनन्य साधारण महत्व असून ती दिसायला उग्र असली तरी भक्तांसाठी ती अत्यंत कल्याणकारी आहे, कालरात्री देवीची उपासना केल्याने भक्तांच्या मनातील भीती दूर तर होतेच परंतु वाईट विचार शत्रुबाधा व संकटे नाश पावतात, व इच्छित फल प्राप्ती होते यापुढील म्हणजेच आठव्या भागात आपण महागौरी देवी ची माहिती पाहणार आहोत, जिने शंकराला प्राप्त करण्यासाठी अत्यंत कठोर तपश्चर्या केली,

मग तिची तपश्चर्या सफल झाली का?, त्यासाठी देवीने कोणती योग साधना केली?

तिच्या शरीरावर त्याचा काय परिणाम झाला, ?अशा अनेक प्रश्नांची उत्तरे घेऊन येत आहे आपला दैनिक गावकरीचा उद्याच्या म्हणजेच रविवार १८ ऑक्टोबर च्या अंक

कथा महागौरीची

# महिला शेतकरी प्रमाणपत्रांमुळे महिलांच्या कष्टाला मिळणार अधिकृत ओळख व सन्मान!

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते महिला शेतकरी प्रमाणपत्रांचे वाटप

शिर्डी (समर्थ गांवकरी)




राहता तालुक्यात आतापर्यंत २०, हजार महिला शेतकऱ्यांची प्रमाणपत्रासाठी नोंदणी झाली आहे. महिला शेतकरी प्रमाणपत्रांमुळे महिलांच्या कष्टाला अधिकृत ओळख व सन्मान मिळणार असून महिलांचा हा उत्स्फूर्त प्रतिसाद ग्रामीण भागातील महिलांचा कृषी क्षेत्रातील सक्रिय सहभाग आणि अधिकृत ओळख मिळविण्यामधील महत्वपूर्ण भूमिका ठरणार आहे , असे प्रतिपादन विखे पाटील यांनी केले.

महिला सक्षमीकरण विधेयकाच्या अनुषंगाने अहिल्यानगर जिल्ह्यात महिला शेतकरी प्रमाणपत्रांचे वाटप राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री डॉ .राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते राहता येथील कुंदन लॉन्स येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आले.

महिला शेतकरी प्रमाणपत्रांमुळे ग्रामीण भागातील महिलांना शेती क्षेत्रात स्वतंत्र ओळख व सन्मान मिळणार असून, हा उपक्रम महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय ठरत आहे.

कार्यक्रमात बोलताना विखे पाटील म्हणाले की, शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांचे अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान असते. त्यांच्या कष्टांना, श्रमांना आणि कृषी क्षेत्रातील सहभागाला अधिकृत मान्यता मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने हे पाऊल उचलले आहे. महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख मिळवून देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि कृषी क्षेत्रातील विविध योजनांचा लाभ थेट त्यांच्यापर्यंत पोहोचवून त्यांना सक्षम करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी प्रभारी, जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे, गटविकास अधिकारी विवेक गुंड , तालुका कृषी अधिकारी श्री आबासाहेब भोरे, राहता यांच्यासह कृषी विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी आणि महिला शेतकरी उपस्थित होत्या.

# पारनेर शहरात १ कोटी ७५ लाखांच्या विकासकामांचे सोमवारी भूमिपूजन

## राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांची माहिती

पारनेर (समर्थ गांवकरी)

शुक्रवार दि. १६ आक्टो. २०२६ पारनेर शहरातील रस्ते विकासाला चालना देण्यासाठी आमदार काशिनाथ दाते सर यांच्या विशेष प्रयत्नांतून मंजूर झालेल्या एकूण १ कोटी ७५ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचा भूमिपूजन समारंभ सोमवार दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता पारनेर शहरात आयोजित करण्यात आला आहे. या कामांचा भूमिपूजन समारंभ राज्याचे जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते, तर आमदार काशिनाथ दाते सर यांच्या अध्यक्षतेखाली होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांनी दिली.

या विकासकामांमध्ये पारनेर नगरपंचायतीच्या प्रभाग क्रमांक २ मधील व्यवहारें वस्ती ते साहेबराव गायकवाड वस्ती रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यासाठी २० लाख रुपये, तर प्रभाग क्रमांक ३ मधील जामगाव रस्त्यापासून विजय औटी घरापर्यंत रस्ता करण्यासाठी ४० लाख रुपये मंजूर आहेत.

तसेच जामगाव रोड ते औटी वस्ती ते तराळवाडी रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यासाठी १५ लाख रुपये, महाजन वस्ती ते दादाभाऊ गायकवाड घर रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी २० लाख रुपये, लोणी रोड ते अंबुले वस्ती रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यासाठी ४० लाख रुपये, तसेच जामगाव रस्त्यापासून तराळवाडी मारुती मंदिर रस्त्याची सुधारणा करण्यासाठी ४० लाख रुपये अशी एकूण १ कोटी ७५ लाख रुपयांची कामे प्रस्तावित आहेत.





या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, भाजप मंडलाध्यक्ष राहुल शिंदे, मा. नगराध्यक्ष विजय औटी, जिल्हा सहकारी बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, उद्योजक दिलीप दाते, युवक तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे, माजी उपनगराध्यक्ष दत्तात्रय कुलट, शहराध्यक्ष राजूशेठ औटी, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, युवती तालुकाध्यक्षा अपर्णा खामकर, महिला शहराध्यक्षा कविता औटी, नगरसेवक अशोकराव चेडे, पैलवान युवराज पठारे, नगरसेवक नवनाथ सोबले, नगरसेविका शालूबाई कांतीलाल ठाणगे, नगरसेविका नीता देवराम ठुबे आणि शहर उपाध्यक्ष सुनील गाडगे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, विविध संस्थांचे पदाधिकारी, तरुण मित्र मंडळांचे सदस्य व पारनेर शहरातील नागरिक उपस्थित राहणार आहेत.

पारनेर शहरातील मूलभूत सुविधांचा विकास आणि नागरिकांना चांगल्या दर्जाचे रस्ते उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या कामांना महत्त्व आहे.

नागरिकांनी भूमिपूजन समारंभास उपस्थित राहावे, असे आवाहन महायुतीच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी आमदार दाते सरांचा पुढाकार

## एक महिन्याचे मानधन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी सुपूर्द

पारनेर (समर्थ गांवकरी)

गुरुवार दि. १५ आक्टो. २०२६ सर्वसामान्य जनतेच्या अडचणीच्या काळात धावून जाणे, त्यांच्या समस्या शासनदरबारी मांडणे आणि गरजूंना मदतीचा हात देणे, हीच आमदार काशिनाथ दाते सर यांच्या आजवरच्या कार्याची ओळख राहिली आहे. गेल्या चाळीस वर्षापासून वेगवेगळ्या पदांवर काम करत असताना जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या आमदार दाते सर यांनी आता दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठीही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या सर्व आमदारांना एका महिन्याचे मानधन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी देण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी आपल्या एका महिन्याच्या मानधनाचा धनादेश उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे सुपूर्द केला.



दुष्काळामुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि पशुपालकांसमोर निर्माण होणाऱ्या अडचणींची जाणीव ठेवून मदतनिधीसाठी दिलेले हे योगदान त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक आहे. जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने प्रयत्न करणे असो, संकटग्रस्तांना दिलासा देणे असो किंवा गरजेच्या वेळी मदतीसाठी पुढाकार घेणे असो, सर्वसामान्य माणसाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका आमदार दाते सरांच्या या कृतीतून येते. राजकारण केवळ पदापुरते नाही, तर जनतेच्या संकटात उपयोगी पडण्यासाठी आहे.

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## काष्टीत आदिशक्तीचा सामाजिक उपक्रम प्रेरणादायी

### दररोज अराजकीय व्यक्तीकडून महाआरती



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी गावातील दत्तनगर येथील आदिशक्ती नवरात्र उत्सव समितीच्या वतीने समाजहिताचे उपक्रम राबवून येथील तरुणांना प्रेरणादायी ठरत आहेत. दि.१४ रोजी चौथ्या माळेला महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय पाचपुते, शासकीय ठेकेदार वैभव माने यांच्या हस्ते देवीची महाआरती घेऊन समितीच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष दत्तात्रय पाचपुते म्हणाले दत्तनगर येथील रहिवासी हे अतिशय गरीब कष्टकरी आहेत, दररोज मोलमजुरी करुण आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. नवरात्र उत्सव निमित्त आदिशक्तीची प्रतिस्थापना करुण पंधरा दिवस वेगवेगळे समाज हिताचे उपक्रम घेऊन येथील तरुणांना दिशा देतात याचा अभिमान वाटतो. अशीच सर्वाची एकजुट ठेवून चांगले काम करा. समितीचे अध्यक्ष जाधव म्हणाले कि येथे आम्ही सर्व जातीधर्माचे लोक गुण्यागोविंदाने रहातो. म्हणून दरवर्षी उत्सव साजरा करताना कोणताही अवाजवी खर्च करित नाही. लोकवर्गणीतून आलेल्या पैशातून शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना मदत करतो.

## भक्ताची देवी मंदिरात नवरात्र निम्मित रोज विविध कार्यक्रम

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

येथील शनी गल्लीतील स्वामी विवेकानंद चौक येथील भक्ताची देवी मंदिरात (ठाणे-माहूरगड) नवरात्रोत्सवास प्रारंभ झाला. या निम्मिताने ९ दिवस मंदिरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले,भक्तासाठी आलेली म्हणून भक्ताची देवी हे नाव पडले,येथे दररोज दर्शनाला गर्दी होत आहे. भक्ताच्या देवीची अशी कथा आहे कि पूर्वीच्या काळी रंगनाथ भगत व बाबू भगत कायम माहूरला दर्शनासाठी असत.पुढे त्यांना देवीने दृष्टांत दिला.तुमचे आता वय झाले आहे तेव्हा आता तुम्ही माहूरला येण्यापेक्षा तिथेच भुईकोट किल्ल्यात कित्येक वर्षांपासून माझे ठाण आहे तेथे कुठलीही पूजा अर्चा होत नाही.तेव्हा माझी प्रतिष्ठापना अन्यत्र करा.रंगनाथ भगत



बाबू भगत यांनी ३०० वर्षांपूर्वी भुईकोट किल्ल्यातून देवीला व महादेवाची पिंड पालखीतून आणली व आजच्या स्वामी विवेकानंद चौकातील भगतांच्या जागी आणून तिची प्रतिष्ठापना केली. तांदळा स्वरूप असलेल्या देवीची स्थापना त्या वाड्यात झाल्यानंतर भाविकांची गर्दी वाढू लागली.नवसाला पावणारी देवी असा तिचा लौकिक वाढू लागला रंगनाथ भगत,बाबू भगत, गोविंद भगत (रामदासी), तान्हा आजी (गुरव) वगेल्या ४२ वर्षापासून नरेन्द्र कुलकर्णी कुटुंबाकडे पूजा-चर्चेची व्यवस्था आली.२२ वर्षांपूर्वी या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला व नवीन मंदिर बांधण्यात आले. शहरात भक्ताच्या देवीचं मंदिर अत्यंत प्रसिद्ध आहे .भक्ताच्या देवीचं मंदिरं हे ३०० वर्षांपासून प्रसिद्ध आहे.त्या काळापासून ते आजतागायत कोणाच्या ही घरी मंगल कार्य ठरले कि त्याची पहिली पत्रिका गणपतीला आणि दुसरी पत्रिका भक्ताच्या देवीला देण्याची प्रथा आहे. नवसाला पावणारी देवी असा ह्या देवीचा लौकिक आहे. नवरात्र उत्सवानिमित्त मंदिरात रोज रात्री ८.३० वा आरती होत आहे तर सकाळी ८ ते ९.

# महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलच्या खेळाडूंचे विविध क्रीडा स्पर्धांमध्ये घवघवीत यश

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

येथील रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलमधील विद्यार्थ्यांनी जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने आयोजित तालुका व जिल्हास्तरीय विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. बुद्धिबळ, तायक्वांदो, व्हॉलीबॉल आणि बॅडमिंटन या खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी पदके व पारितोषिके मिळवून विद्यालयाच्या क्रीडा परंपरेत मानाची भर घातली. यशस्वी खेळाडूंचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

**■ तालुकास्तरावर पदकांची लयलूट**

तालुकास्तरीय स्पर्धांमध्ये यश

तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत विराज मचे याने प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. त्याने जिल्हास्तरीय स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करत विभागीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली.

तायक्वांदो स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणाऱ्या समर्थ सोळंके, प्रणव गांधी, अक्षरा बळे आणि अंजली गाडे यांनी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड मिळवली. रौप्यपदक विजेत्यांमध्ये सुहानी पटेल, श्रावणी लोखंडे, सारा भुजबळ आणि आयुष देसाई यांचा समावेश आहे. तर सानिका बोरुडे, समर्थ बनकर, श्रीरंग देशपांडे आणि सोहम रगडे यांनी कांस्यपदक मिळवून यश संपादन केले.



१४ वर्षांखालील मुलांच्या व्हॉलीबॉल संघाने तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. या संघात विराज रोडे, समर्थ खेडकर, आयुष गुंजाळ, यश दरेकर, गौरव डांगे, अर्ष मुजावर, आयुष कोथिंबिरे, स्वराज बाबर, श्रीनिवास फटाकडे आणि ओंकार राजपूत यांचा समावेश होता. या संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच १७ वर्षांखालील मुलांच्या व्हॉलीबॉल संघाने द्वितीय क्रमांक मिळवून उपविजेतेपद पटकावले.

जिल्हास्तरीय स्पर्धांमध्येही चमकदार कामगिरी

जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत विद्यालयाच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवला. या संघात पृथ्वीराज डांगे, जय पिपाडा, यश धाडगे, आरव कुलकर्णी आणि हर्षवर्धन कोथिंबिरे यांचा समावेश होता.

# जिल्हास्तरीय राज्य पुरस्कार चाचणी शिबिर उत्साहात संपन्न

## महादजी शिंदे विद्यालयातील १५ स्काऊट्सचा सहभाग; शिस्त, नेतृत्व आणि सेवाभावाचे धडे



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

भारत स्काउट्स आणि गाईड्स, अहिल्यानगर जिल्हा संस्था व जिल्हा परिषद शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय राज्य पुरस्कार चाचणी शिबिर उत्साहात संपन्न झाले. दि. १४ व १५ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या जिल्हा क्रीडा संकुल, वाडिया पार्क येथे पार पडलेल्या या शिबिरात रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे विद्यालयातील कर्मवीर भाऊराव पाटील पथकाच्या १५ स्काऊट्सनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये आत्मसात करण्याबरोबरच शिस्त, स्वावलंबन, नेतृत्वगुण आणि संघभावनेचे महत्त्व जाणून घेतले.

या शिबिरात महादजी शिंदे विद्यालयाच्या वतीने राजवीर शंकर मखरे, आदित्य आनंदा लोखंडे, संग्राम महेंद्र कोतकर, वीरेन रोहिदास खेतमाळीस, वरुणराजे शिवाजी कोठारे, दिव्यराज पांडुरंग शिंदे, युवराज नितीन आमले, विश्वेश किशोर आगाशे, प्रथमेश नवनाथ कुंभार, युवराज लहू दबडे, सिद्धेश संभाजी मडके, करण विजय सप्ताळ, आनंदा अण्णा शिरवाळे, अर्णव विकास गायकवाड आणि शौर्यराज शिवाजी होलम या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

शिबिराचे उद्घाटन जिल्हा आयुक्त (गाईड) तथा माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड आणि जिल्हा क्रीडाधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी त्यांनी सहभागी प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या. स्काऊट-गाईड चळवळ ही विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, स्वावलंबन, नेतृत्वक्षमता आणि समाजसेवेची भावना विकसित करण्यासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या शिबिरात जिल्हाभरातील एकूण ७० स्काऊट-गाईड प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. शिबिरादरम्यान जिल्हा संघटक (स्काऊट) अरुण पेशकार, जिल्हा संघटक (गाईड) सोनाक्षी तेलंगे यांच्यासह ईश्वर गायकवाड, अविनाश भोसले, संजय शिंदे, सागर साळवे, विकास रत्नपारखे आणि ज्ञानेश्वर धंडारे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. शिबिरप्रमुख म्हणून विकास लोखंडे यांनी जबाबदारी सांभाळली. दोन दिवसांच्या या शिबिरातून विद्यार्थ्यांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षण मिळाले. तसेच शिस्तबद्ध जीवनशैली, संघभावना, नेतृत्वक्षमता आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व समजून घेण्याची संधी मिळाली. महादजी शिंदे विद्यालयातील १५ स्काऊट्सनी या जिल्हास्तरीय शिबिरात उत्स्फूर्त सहभाग नोंदविल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचे कौतुक करण्यात आले.

# अगस्ती विद्यालयात वाचन प्रेरणा दिन व वाचन सप्ताह उत्साहात साजरा

## विविध स्पर्धांतील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण

अकोले (समर्थ गांवकरी)

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त अगस्ती विद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित वाचन सप्ताहात विद्यार्थ्यांसाठी पुस्तक परीक्षण, वक्तृत्व आणि प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या वाचन, विचार, अभिव्यक्ती आणि सामान्यज्ञान कौशल्यांचे दर्शन घडविले.

विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.वाचन संस्कृती रुजविण्यासाठी विविध स्पर्धेचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी

पुस्तक परीक्षण स्पर्धा

लहान गट

१. प्रार्थना रामचंद्र आवारी, २. नूतन गोपाल दराडे, ३. धनश्री संदीप दैने

मोठा गट

१. स्वरांजली सुयोग वाकचौरे, २. सारंगी चंद्रशेखर हासे, ३. लक्ष्मी संदीप दातखिळे

वक्तृत्व स्पर्धा

१. दिव्या प्रकाश साळवे, २. अन्विका प्रशांत वाकचौरे, ३. क्षितिजा रवींद्र मोरे

प्रश्नमंजुषा स्पर्धा

लहान गट




१. अन्विका प्रशांत वाकचौरे, २. गार्गी सचिन जाधव

मोठा गट

१. तन्मय निलेश भोजने, २. मैत्रेयी निलेश सहाणे

वाचन सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, पुस्तकांशी मैत्री वाढविणे, विचारशक्ती विकसित करणे आणि विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते आणि ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यास मदत होण्यासाठी विद्यालयाचे ग्रंथपाल गणपतराव काळे यांच्या पुढाकारातून या स्पर्धा घेण्यात आल्या.

# जामखेड मध्ये थरार! चहा पिण्यासाठी बसलेल्या तरुणावर सत्तुरने हल्ला डावा हात मनगटापासून तोडला

जामखेड तालुका प्रतिनिधी

जामखेड शहरात तरुणावर सत्तुरने हल्ला केल्याची धक्कादाय घटना घडली असून या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. राहुल अंधारे हे पुढारी वड टी सेंटर येथे चहा पिण्यासाठी बसलेले असताना दुचाकीवरून आलेल्या तिघांपैकी तोंड बांधलेल्या दोघांनी हॉटेलमध्ये प्रवेश केला आणि अचानक त्यांच्यावर सत्तुरने वार केले. या हल्ल्यात अंधारे यांचा डावा हात गंभीररित्या जखमी झाला असून तो तुटल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यांना तातडीने पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलवण्यात आले आहे.

दुचाकी वरून तिघे आले दोघांनी केला अचानक हल्ला

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार सायंकाळी सुमारे ७. ३५ वाजण्याच्या सुमारास राहुल अंधारे हे पुढारी वड टी सेंटर येथे चहा पिण्यासाठी बसले होते. त्याचवेळी दुचाकीवरून तिघेजण तेथे आले त्यापैकी तोंड बांधलेल्या दोघांच्या हातात सत्तूर असल्याचे सांगण्यात येते या दोघांनी हॉटेलमध्ये जाऊन अंधारे यांच्यावर अचानक वार केले. हा हल्ला अचानक झाल्याने हॉटेलमधील नागरिकांमध्ये घबराट पसरली.

हल्ल्यादरम्यान अंधारे यांच्या जखमांमधून उडालेले रक्त शेजारी बसलेल्या लोकांवर उडाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली.

प्राथमिक उपचारानंतर अहिल्यानगरला हलवले

हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या राहुल अंधारे यांना तातडीने खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना तातडीने अहिल्यानगर येथील रुग्णालयात हलवण्यात आले. त्यांच्या प्रकृती बाबत अधिकृत माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही.

कला केंद्रातील वादाची पार्श्वभूमी?

राहुल अंधारे यांच्याशी संबंधित कलाकेंद्रातील

**■ तोंड बांधून आलेल्या दोघांचा हल्ला, जखमी तरुणाला अहिल्यानगरला हलवले; पोलिसांकडून तपास सुर...**
**■ जामखेड शहरात भितीचे वातावरण... सामान्य नागरिक भय भित..**

गोंधळाच्या प्रकरणात सुमारे महिनाभरापूर्वी गुन्हा दाखल झाल्याची माहिती आहे तसेच दोन दिवसापूर्वी कला केंद्रावरून वाद झाल्याचे सांगण्यात येत आहे या पार्श्वभूमीवर सदर हल्ला झाला असावा अशी चर्चा परिसरात सुरू आहे मात्र हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. यापूर्वीच्या घटनांचा आणि सध्याच्या हल्ल्याचा काही संबंध आहे का हे पोलिसांच्या तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

पोलीस घटनास्थळी दाखल; तपासाला सुरुवात घटनेची माहिती मिळताच जामखेड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला असून हल्लेखोरांची




ओळख पटवणे आणि घटनेमागील कारणांचा शोध घेण्याच्या दृष्टीने तपास सुरू केला आहे.

पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस तपास करीत आहेत जामखेड शहरात भरवस्तीत घडलेल्या या हल्ल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे व चिंतेचे वातावर निर्माण झाले असून हल्लेखोरांना पोलिसांकडून कधी ताब्यात घेतले जाते आणि या घटनेमागे नेमके कारण काय याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळेत वाचन प्रेरणा दिन व जागतिक हात धुवा दिन उत्साहात साजरा



अकोले (समर्थ गांवकरी)

ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा, अकोले येथे भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन व जागतिक हात धुवा दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचनाची सवय लागावी तसेच पुस्तकांमधून ज्ञान मिळविण्याची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व सांगण्यात आले. तसेच वैयक्तिक स्वच्छता, आरोग्याचे रक्षण आणि आजारांपासून बचाव करण्यासाठी हात स्वच्छ धुण्याची योग्य पद्धत याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. सचिन मुळे यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे जीवनातील महत्त्व पटवून दिले. नियमित वाचनामुळे ज्ञानात भर पडते, विचारशक्ती विकसित होते आणि व्यक्ति

## प्रशासनाची अतिक्रमण मोहीम थंडावली पण व्यापारी स्वताहाच दहा फूट अतिक्रमण केले जमीनदोस्त

जामखेड (समर्थ गांवकरी)

जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या लगतचे अतिक्रमण काढण्याची मोहीम प्रशासनाची थंडावली असली तरी आता विश्वक्रांती चौक ते बीड कॉर्नर पर्यंत असलेले नव्वद टक्के व्यापारी स्वताहाहून पोकलॅन, जेसीबी, टॅक्ट्रर लावून आपापले अतिक्रमण काढून घेत आहेत. त्यामुळे बीड रस्ता धुळीने माखला असून रस्त्याचा श्वास मोकळा झाला आहे. व्यापा-यांच्या भुमिकेवर नागरिकांनी समाधान व्यक्त करून 'देर आये दुरुस्त हुआ' अशी चर्चा करत आहेत. जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या लगतचे अतिक्रमण काढण्याची प्रशासनाची संयुक्त मोहीम ६ ऑक्टोबर पासून सुरू झाली. नगरपरिषदेने दिलेल्या नोटिसीप्रमाणे गटारीपासून दहा फूट



अंतरातील सर्व अतिक्रमण काढण्यात यावे अशा नोटीसा बजावल्या होत्या. त्यानुसार प्रशासनाने शासकीय दुध कार्यालयापासून ते विश्वक्रांती चौकापर्यंत धडाक्यात कारवाई झाली पण तेथून पुढे ती राष्ट्रीय महामार्गाच्या गटारी पासूनच्या अंतरावरून वादात सापडली होती. यावेळी प्रशासन व व्यापारी वाद झाला. तसेच याबाबत व्यापारी व नगरसेवक यांच्यात बैठक होऊन दहा फूट अतिक्रमण काढून घेण्याचे सुचवण्यात आले. त्यानुसार बीड कॉर्नर ते विश्वक्रांती चौक पर्यंत रस्त्याच्या एका बाजुला व्यापा-यांनी स्वताहा होऊन अतिक्रमण काढण्यासाठी पोकलॅन, जेसीबी व टॅक्ट्रर लावून काढून घेत आहेत त्यामुळे सदर रस्ता धुळीने माखला आहे. नगरपरिषदेने व्यापा-यांना गटारी पासून दहा फूट अतिक्रमण काढावे या नोटीसीप्रमाणे व्यापारी अतिक्रमण काढत असल्याने सदर रस्त्याचा श्वास मोकळा झाला आहे.

## मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये स्त्री शक्तीचा जागर व श्री सुक्तम् चे सामुदायिक पठण



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

शारदीय नवरात्र उत्सव हा पावन पर्व आहे. या काळात स्त्री शक्तीचा जागर सर्वत्र होत असतो. प्रत्येकाच्या घरामध्ये आई, बहीण, आत्या, मावशी, काकू, आजी या नात्यांमध्ये आपला समाजातील नातेसंबंध टिकून आहेत. भारत मातेला देखील आई म्हणून संबोधले जाते. मुलींनी किंवा महिलांनी कोणतेही संकट आल्यास न डगमगता सामोरे जाणे आवश्यक आहे. नवरात्र उत्सवानिमित्त देवीची उपासना करण्यात यावी. देवी लक्ष्मीचे श्रीसूक्तम् हे संस्कृत श्लोक असून या श्लोकाच्या पठणाने मुलांची बुद्धी तीव्र होते, तसेच पाठांतर क्षमता आणि एकाग्रता वाढते. संस्कृत भाषा ही आपली संस्कृती आहे, ती प्रत्येकाने जोपासावी, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर यांनी केले. हिंद सेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये विहिंपचे मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे वतीने शारदीय नवरात्रौत्सव निमित्त 'स्त्री शक्तीचा जागर' या उपक्रमा अंतर्गत श्री सुक्तम् पाठाचे सामुदायिक पठण करण्यात आले. याप्रसंगी विहिंपचे मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, अरुण खिची,प्राचार्य प्रा. अनुरीता झगडे आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्राचार्य प्रा. अनुरीता झगडे म्हणाल्या, शाळा ही केवळ पुस्तकी ज्ञान देणारी संस्था नसून संस्कार केंद्र आहे. नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने आम्ही विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, स्वाभिमान आणि भारतीय संस्कृतीची जाणीव जागृत करण्याचा प्रयत्न करत आहोत. श्री सुक्तम् पठणासारख्या उपक्रमांमुळे मुलींमध्ये सकारात्मक ऊर्जा, शिस्त आणि एकाग्रता वाढते. आमच्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थिनी हीच उद्याची सक्षम स्त्री शक्ती आहे.

# गुरुवर्य सबनीसांचे कार्य सतत प्रेरणा देणारे : खा.डॉ.अमोल कोल्हे

## गुरुवर्य रा.प.सबनीस यांची ६६ वी पुण्यतिथी साजरी

नारायणगाव(समर्थ गांवकरी)

नारायणगाव सारख्या ग्रामीण भागामध्ये ग्रामोन्नती मंडळाची स्थापना करून बहुजनांना शिक्षणाची दारे खुली करण्याचे कार्य गुरुवर्य रा.प.सबनीस यांनी केले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी अविद्येमुळे समाजाचे झालेले नुकसान टाळण्यासाठी अधिकाधिक शिक्षणाचा प्रसार होणे गरजेचे आहे असे सांगितले. गुरुवर्य सबनीसांनी याच विचारांना पुढे नेत कृषी शिक्षणातून समाजविकास साधण्याचा प्रयत्न केला. परिसरातील शेतकरी आणि बहुजन वर्गाला शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. गुरुवर्य सबनीसांचे कार्य सतत प्रेरणा देणारे आहे,असे मनोगत शिरूर मतदार संघाचे खासदार डॉ.अमोल कोल्हे यांनी व्यक्त केले.

ग्रामोन्नती मंडळ नारायणगाव यांच्या वतीने गुरुवर्य रा.प.सबनीस यांच्या ६६ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित केलेल्या अभिवादन सभेत ते बोलत होते.

यावेळी जुन्नर तालुक्याचे माजी आमदार अतुल बेनके,ग्रामोन्नती मंडळाचे विश्वस्त प्रकाश पाटे, मोनिका मेहेर,कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिलतात्या मेहेर,अध्यक्ष सुजित खैरे,उपाध्यक्ष शशिकांत वाजगे,कार्यवाह रवींद्र पारगावकर,अरविंद मेहेर, डॉ. आनंद कुलकर्णी, डॉ.संदीप डोळे,रत्नदीप भरवीरकर,तानाजी वारुळे, अल्हाद खैरे,सोमजीभाई पटेल,देवेंद्र बनकर,ऋषिकेश मेहेर, डी. के.भुजबळ,सुखदेव बनकर,निलेश पाटे,एकनाथ शेटे,विकास दरेकर,ऋजित मेहेर,सुरेश संचेती,शास्त्रज्ञ प्रशांत शेटे, राहुल घाडगे,प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी, प्राचार्य राधाकृष्ण गायकवाड, प्राचार्य मिलिंद भुजबळ,मुख्याध्यापिका मानसी भालेराव,सीमा कुलकर्णी,उपप्राचार्य संजय वलटे,सर्व विभागांचे प्रमुख, शिक्षक,विद्यार्थी,माजी मुख्याध्यापक,शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी आमदार अतुल बेनके यावेळी म्हणाले की ग्रामोन्नती मंडळ व त्यांचे सर्व पदाधिकारी सांघिक प्रयत्न करून उत्तम दर्जाची शिक्षण व्यवस्था चालवीत आहेत. दर्जेदार व आधुनिक शिक्षण देणारी ग्रामीण भागातील ग्रामोन्नती मंडळ या संस्थेचा नावलौकिक सर्व दूर पसरला आहे. कालानुरूप शिक्षण क्षेत्रातील ध्येय धोरणांचा बदल संस्थेने वेळोवेळी स्वीकारला आहे.अद्ययावत आणि आधुनिक शिक्षण देणारी ग्रामोन्नती मंडळ ही अग्रगण्य संस्था आहे.

संस्थेचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिलतात्या मेहेर म्हणाले की आज गुरुवर्य नानासाहेब सबनीस यांसोबत त्यांचे आदर्श विद्यार्थी व महाराष्ट्राचे माजी मंत्री स्वर्गीय साबीरभाई शेख यांचीही पुण्यतिथी आहे हा एक उत्तम योगायोग आहे. साबीरभाईंनी आयुष्यभर गुरुवर्यांप्रती आदरभाव व्यक्त केला. गुरुवर्यांना अपेक्षित असे शेती शिक्षणातून ग्रामोद्धाराचे कार्य आपण सर्वांनी निष्ठेने केले पाहिजे.

या श्रद्धांजली सभेत मान्यवरांच्या हस्ते प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी आणि डॉक्टर लहू गायकवाड यांनी संपादित केलेल्या 'ज्ञानऋषी गुरुवर्य रा.प.सबनीस'या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.



या सभेत प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी तसेच कृष्णवी तोडकर,रियांश सावंत या विद्यार्थ्यांनी आणि शिक्षिका स्मिनल घुले यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी ग्रामोन्नती मंडळाच्या विश्वस्त मोनिका मेहेर यांच्यावतीने माध्यमिक विद्यालय गुंजाळवाडी येथील पाच गरजू विद्यार्थिनींना सायकल वितरण करण्यात आले.

पुण्यतिथी निमित्त गुरुवर्य सबनीस साहेबांच्या प्रतिमेची मिरवणूक नारायणगाव बाजारपेठेतून काढण्यात आली होती. मिरवणुकीमध्ये विरोबा मित्र मंडळ, पाटे आळी यांचे ढोल पथक तसेच श्री. अनंतराव इंग्लिश मीडियम स्कूलचे लेझीम पथक मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.

# श्रीगोंदा कन्या विद्यालयाच्या कुस्तीपटूंची राज्यस्तरावर सुवर्णभरारी!

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

**तेजस्विनी गिरमकरची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड; श्रावणी सोलनकरला रौप्यपदक, तर थाय किक बॉक्सिंगमध्ये वैष्णवी भागवत व शर्वरी टकले यांना सुवर्ण टायटल बेल्ट**

क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत रयत शिक्षण संस्थेच्या श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालय, श्रीगोंदा येथील विद्यार्थिनींनी शालेय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत तेजस्विनी श्रीधर गिरमकर हिने ३० किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावत राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली. श्रावणी सोलनकर हिने ३९ किलो वजन गटात रौप्यपदक मिळविले. याशिवाय, गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय थाय किक बॉक्सिंग स्पर्धेत विद्यालयाच्या वैष्णवी भागवत व शर्वरी टकले यांनी सुवर्ण टायटल बेल्ट मिळवून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. खोपोली येथील कारमेल कॉन्व्हेंट हायस्कूलच्या शैक्षणिक संकुलात पार पडलेल्या या स्पर्धेत श्रीगोंदा कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी आपल्या कौशल्याच्या



जोरावर उल्लेखनीय यश मिळविले.

१४ वर्षांखालील वयोगटातील तेजस्विनी गिरमकर हिने ३० किलो वजन गटात प्रतिस्पर्ध्यांवर मात करत सुवर्णपदक पटकावले. तिच्या या कामगिरीमुळे तिची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याच स्पर्धेत श्रावणी सोलनकर हिने ३९ किलो वजन गटात रौप्यपदक मिळवत आपल्या खेळाची चमक दाखविली. दरम्यान, विद्यालयाच्या वैष्णवी भागवत आणि शर्वरी टकले यांनी गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय थाय किक बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्ण टायटल बेल्ट पटकावून क्रीडा क्षेत्रातील आपली गुणवत्ता सिद्ध केली. कुस्ती आणि थाय किक बॉक्सिंग या दोन्ही क्रीडाप्रकारांत विद्यार्थिनींनी मिळविलेल्या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीला नवी उंची प्राप्त झाली आहे.

# दुष्काळी परिस्थितीत ग्रामस्थांना दिलासा देण्यासाठी आमदार विक्रमदादा पाचपुते सरसावले!

## पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी व चाऱ्याच्या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी पुढाकार



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा व नगर विधानसभा मतदारसंघातील विविध गावांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांना दिलासा देण्यासाठी आमदार ड. विक्रमदादा बबनराव पाचपुते यांनी पुढाकार घेतला आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई, जनावरांसाठी पाण्याची उपलब्धता आणि चाऱ्याचा प्रश्न यांसंदर्भात विविध गावांतील प्रमुख नागरिकांनी सोमवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी माऊली संपर्क कार्यालयात आमदार पाचपुते यांची भेट घेऊन आपल्या समस्या मांडल्या.

या वेळी ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेत आमदार पाचपुते यांनी दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने संबंधित प्रशासनाशी समन्वय साधण्याचे आश्वासन दिले.

**पाणीटंचाईग्रस्त गावांचा घेणार आढावा**

गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने गावनिहाय गरजांचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच पशुधनासाठी पाणी व चारा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्याबाबत पुढाकार घेतला जाणार आहे. गावनिहाय पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्यासाठी प्रशासनाशी चर्चा करण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

**शेतकरी, ग्रामस्थ आणि पशुधनाला दिलासा देण्यावर भर**

दुष्काळाच्या कठीण परिस्थितीत ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होणे, जनावरांसाठी पाणी व चाऱ्याची व्यवस्था होणे अत्यंत गरजेचे आहे. या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन नागरिकांना प्रत्यक्ष मदत मिळवून देण्यासाठी वैयक्तिक पातळीवर पाठपुरावा करणार असल्याचे आमदार विक्रमदादा पाचपुते यांनी सांगितले.

# निस्वार्थ कार्याची पावती शेतकरी सेवेची नवी जबाबदारी!

## दादासाहेब जंगले पाटील यांची जिल्हा समन्वयक पदी निवड

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना यशस्वी अंमलबजावणीच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल!

श्रीगोंदा तालुक्यातील जंगलेवाडी येथील शेतकरी कुटुंबातील शेतकऱ्यांचे हित जोपासणारे शिव आनंद शेत रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांची जिल्हा प्रशासनाने जिल्हा समन्वयकपदी नुकतीच निवड केली आहे. दरम्यान जंगली पाटील यांनी कोणतीही अपेक्षा न ठेवता, निस्वार्थ राजकारण विरहित केवळ शेतकरी बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत जिल्हा प्रशासनाने जिल्हा समन्वयक म्हणून नवी जबाबदारी सोपवली आहे.

अहिल्यानगर अपर जिल्हाधिकारी श्री. शैलेश हिंगे यांनी दिलेल्या या जबाबदारीतून शेतकऱ्यांच्या विश्वासाला पात्र ठरण्याची आणखी एक संधी मिळाली आहे.माझ्यासाठी हे पद म्हणजे केवळ सन्मान नसून, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी अधिक जबाबदारीने काम करण्याची संधी आहे. ना पदाची अपेक्षा, ना प्रसिद्धीचा हव्यास एकच ध्येय – शेतकऱ्यांना न्याय! एकच संकल्प – शेत तिथे रस्ता, गाव तिथे समृद्धी!

जिल्हा प्रशासनाने दाखवलेला विश्वास सार्थ ठरवत, सर्व तालुक्यांतील समन्वयक सदस्य, महसूल विभाग, भूमी अभिलेख विभाग, पोलीस प्रशासन आणि शेतकरी बांधवांना सोबत घेऊन या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी माझे



संपूर्ण योगदान देईन.

शेतकऱ्यांच्या हक्कासाठी, त्यांच्या बांधापर्यंत रस्ता पोहोचवण्यासाठी आणि प्रत्येक पात्र शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत प्रामाणिकपणे कार्यरत राहीन! अशी ग्वाही दादासाहेब जंगले पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. विश्वास दाखवल्याबद्दल जिल्हा प्रशासनाचे श्री जंगले यांनी आभार मानले.

# अहिल्यादेवी सृष्टी चोंडीतच झाली पाहिजे! : पांडुरंग माने यांचा इशारा; राजकीय संघर्षावर तीव्र नाराजी

जामखेड (समर्थ गांवकरी)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव असलेल्या चोंडी येथेच 'अहिल्यादेवी सृष्टी' उभारण्यात यावी, ही समस्त अहिल्याभक्तांची अत्यंत रास्त आणि सकारात्मक मागणी आहे. मात्र, अहिल्यानगर जिल्ह्यातील दोन मातब्बर नेत्यांमधील राजकीय मतभेद आणि रस्सीखेच यामुळे गेल्या वर्षभरापासून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला अनावश्यक अडथळे निर्माण होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मात्र अहिल्यादेवी सृष्टी ही चोंडीतच झाली पाहिजे! अशी मागणी पांडुरंग माने यांनी केली आहे.

अहिल्यादेवी सृष्टी हा प्रकल्प कोणत्याही एका पक्षाचा किंवा राजकारणाचा विषय नसून संपूर्ण समाजाच्या अस्मितेचा, इतिहासाचा आणि प्रेरणेचा विषय आहे. त्यामुळे दोन्ही वरिष्ठ नेत्यांनी यामध्ये राजकारण न आणता सत्तेचे राजकारण आणि वैयक्तिक मतभेद बाजूला ठेवावेत आणि अहिल्यादेवींच्या कार्याचा सन्मान राखावा, असा सज्जड इशारा देण्यात आला आहे. अन्यथा, अहिल्या भक्तांच्या तीव्र लोकशाही मार्गाने होणाऱ्या निषेधाला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

चोंडी हेच अहिल्यादेवी सृष्टीचे एकमेव योग्य ठिकाण असल्याचे सांगत, विधान परिषद सभापती मा. राम शिंदे यांनी अहिल्यादेवी सृष्टी त्यांच्या जन्मगावी चोंडी येथेच व्हावी, अशी ठाम भूमिका मांडली आहे. तसेच, गुजरातमधील 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'च्या धर्तीवर चोंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा भव्य पुतळा उभारण्याची जी संकल्पना त्यांनी मांडली आहे, ती निश्चितच विचार करण्यासारखी असून या भूमिकेचे स्वागत करण्यात आले आहे. याच्या उलट, पालकमंत्र्यांच्या सूचनेनुसार चास येथे हा प्रकल्प उभारण्याचा विचार पुढे आला होता; परंतु राहुरी कृषी विद्यापीठाने त्या ठिकाणी जागा देण्यास नकार दिल्याचे सांगितले जाते. त्यामुळे जागेबाबत निर्माण झालेल्या सर्व अडचणी दूर करून चोंडी येथेच सृष्टी उभारण्याच्या दिशेने प्रशासनाने आणि नेत्यांनी ठोस निर्णय घेणे अत्यंत गरजेचे आहे.

सन २०२५ मध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रकल्पासाठी ६०० कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याचे सांगण्यात आले होते. परंतु, वर्षभर उलटूनही हा प्रकल्प प्रत्यक्षात पुढे सरकत नसेल, तर त्यामागील नेमकी कारणे काय आहेत, हे जनतेसमोर स्पष्ट झाले पाहिजे. प्रस्ताव मंजूर होऊनही जर प्रकल्प रखडत असेल, तर त्याची जबाबदारी निश्चित करून पुढील कार्यवाही तातडीने झाली पाहिजे. अहिल्यादेवींच्या नावावर राजकारण करून चालणार नाही, तर त्यांच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्यांनी तो कृतीतून सिद्ध करून दाखवला पाहिजे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची सृष्टी त्यांच्या जन्मगावी चोंडी येथेच पूर्णत्वास नेण्यात यावी.

प्रकल्पाच्या जागेबाबतचा वाद तातडीने संपवून ठोस निर्णय घ्यावा आणि सर्व कायदेशीर अडथळे दूर करावेत.

६०० कोटी रुपयांच्या प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे, हे पारदर्शकपणे जनतेसमोर स्पष्ट करावे.

गुजरातमधील 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'च्या धर्तीवर चोंडी येथे अहिल्यादेवींचा भव्य पुतळा उभारण्याच्या प्रस्तावावर गांभीर्याने विचार व्हावा.

दोन्ही वरिष्ठ नेत्यांनी आपापले राजकीय मतभेद बाजूला सारून या ऐतिहासिक प्रकल्पासाठी एकत्र यावे.

हा प्रकल्प कोणत्याही एका नेत्याचा वैयक्तिक प्रकल्प नसून तो समस्त अहिल्याभक्तांच्या अस्मितेचा आणि महाराष्ट्राच्या गौरवाचा विषय आहे. अहिल्यादेवींच्या नावाचा वापर केवळ राजकीय फायद्यासाठी केला जाऊ नये. त्यांच्या कार्याचा खरा सन्मान करायचा असेल, तर चोंडी येथे सृष्टी उभारण्याच्या मागणीला तात्काळ ठोस कृतीची जोड द्यावी लागेल. आम्ही विकासाच्या विरोधात नाही, तर राजकारणाच्या विरोधात



आहोत अशी ठाम भूमिका घेत, चोंडीच्या विकासाला विरोध नको, राजकीय श्रेयवाद नको आणि निर्णयाला कोणत्याही प्रकारचा विलंब नको, असे बजावण्यात आले आहे. अहिल्या भक्तांच्या भावनांशी खेळण्याचा प्रयत्न केल्यास शांत बसणार नाही, तर लोकशाही मार्गाने तीव्र निषेध नोंदविला जाईल. 'एकच मागणी, एकच निर्धार – अहिल्यादेवी सृष्टी चोंडीतच साकारावी!' हाच संदेश या माध्यमातून दिला गेला आहे.

अहिल्यादेवींचा वैचारिक वारसदार: श्री. पांडुरंग माने

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

# रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाचा राष्ट्रीय स्तरावर गौरव

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक प्रतिभेचा राष्ट्रीय स्तरावर गौरव करणारी अभिमानास्पद कामगिरी रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागातील न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, चांडगाव (ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) येथील गुणवंत विद्यार्थिनी कु. श्रद्धा रमेश लोंढे हिने केली आहे. भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या INSPIRE-MANAK उपक्रमांतर्गत आयोजित १२ व्या राष्ट्रीय प्रदर्शन व प्रकल्प स्पर्धेत (NLEPC) तिने राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकावले. तिच्या या यशामुळे रयत शिक्षण संस्थेसह अहिल्यानगर जिल्हा आणि महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे राष्ट्रीय स्पर्धा

१२ ते १४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत नवी दिल्ली येथील भारत मंडपम, हॉल क्रमांक ५, लेव्हल १ येथे १२ वी राष्ट्रीयINSPIRE-MANAK प्रदर्शन व प्रकल्प स्पर्धा पार पडली. देशातील विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील विद्यार्थ्यांनी आपल्या नावीन्यपूर्ण वैज्ञानिक संकल्पना व प्रोटोटाइप या प्रदर्शनात सादर केले.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने आयोजित केलेल्या या राष्ट्रीय उपक्रमात सुमारे ७५० ते ८०० प्रकल्प सादर करण्यात आले. त्यांमधून निवडक प्रकल्पांची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. १४ ऑक्टोबर रोजी केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या हस्ते निवडक युवा संशोधकांचा गौरव करण्यात आला. या स्पर्धेत महाराष्ट्रातील सात विद्यार्थ्यांनी 'सुपर ६०' गटात स्थान मिळवले.

याच राष्ट्रीय स्पर्धेत चांडगावच्या कु. श्रद्धा रमेश लोंढे हिने प्रथम क्रमांकासह सुवर्णपदक मिळवून आपल्या नावीन्यपूर्ण संशोधनाची राष्ट्रीय स्तरावर छाप पाडली.

दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी उपयोग

श्रद्धा हिने 'AI-Based Teacher Assistant for Visually Impaired' अर्थात दृष्टिदिव्यांगांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित शिक्षक सहाय्यक ही अभिनव संकल्पना आणि तिचा प्रोटोटाइप सादर केला.

दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण अधिक सुलभ आणि उपयुक्त व्हावे, या सामाजिक जाणिवेतून विकसित केलेल्या या प्रकल्पामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या शैक्षणिक उपयोगावर भर देण्यात आला आहे. समाजातील प्रत्यक्ष समस्या ओळखून विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्यावर उपाय शोधण्याची क्षमता श्रद्धाने आपल्या प्रकल्पातून दाखवून दिली.

श्रद्धाच्या या यशामागे तिची जिज्ञासू वृत्ती, सातत्यपूर्ण मेहनत, नावीन्यपूर्ण विचार आणि मार्गदर्शक शिक्षक श्री. सुभाष गायकवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन आहे. विद्यालयाचे मुख्याध्यापक, श्रद्धाचे पालक तसेच चांडगाव शाखेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचेही तिला सहकार्य लाभले.

ग्रामीण भागातील शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीने राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित स्पर्धेत मिळवलेले हे यश विशेष उल्लेखनीय आहे. योग्य मार्गदर्शन, संशोधनासाठी प्रोत्साहन आणि संधी मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थीही देशपातळीवर आपली गुणवत्ता सिद्ध करू शकतात, हे श्रद्धाने दाखवून दिले आहे.

श्रद्धाच्या या देदीप्यमान यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. चंद्रकांत दळवी, उपाध्यक्ष मा. अरुण कडू-पाटील, व्हाइस चेअरमन ड. भगीरथ शिंदे, संघटक डॉ. अनिल पाटील, सचिव मा. किशोर

- **चांडगावची श्रद्धा लोंढे एआय संशोधनात देशात प्रथम**
- **चांडगावची श्रद्धा लोंढे सुवर्णपदकाची मानकरी**
- **नवी दिल्लीतील 'भारत मंडपम' येथे गौरव**

राजेनिंबाळकर, सहसचिव (उच्च) डॉ. शिवलिंग मेनकुदळे, सहसचिव (माध्यमिक) बी. एन. पवार आणि सहसचिव (ऑडिट) डॉ. राजेंद्र मोरे, उत्तर विभागीय समन्वय समितीचे चेअरमन मा. आमदार रोहितदादा पवार, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मा. आमदार आशुतोष काळे, मा. मीनाताई जगधने, मा. बाबासाहेब भोस, ड. संदीप वर्पे आणि मा. सुरेशजी बोळीज ,उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सहाय्यक अधिकारी बाबासाहेब नाईकवडी , प्रमोद तोरणे गुणवत्ता कक्षाचे मार्गदर्शक काकासाहेब वाळुंजकर, माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे, गुणवत्ता कक्षाचे प्रमुख सुधीर साबळे, इन्स्पायर अवॉर्डचे प्रमुख प्रणव नलगे आणि गुणवत्ता विकास कक्षातील सर्व सदस्य यांनीही श्रद्धाच्या यशाचे विशेष कौतुक केले.




विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणारी प्रेरणादायी कामगिरी

INSPIRE-MANAK हा भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचा उपक्रम असून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक विचार, नावीन्यपूर्ण कल्पना आणि सामाजिक उपयोग असलेल्या संशोधनाला प्रोत्साहन देणे हा त्याचा उद्देश आहे. राष्ट्रीय स्तरावर निवडलेल्या उत्कृष्ट प्रकल्पांना पुढील विकासासाठी मार्गदर्शन व संधी उपलब्ध करून दिल्या जातात.

श्रद्धाच्या यशामुळे चांडगाव परिसरातील विद्यार्थ्यांना विज्ञान, संशोधन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात पुढे जाण्याची नवी प्रेरणा मिळाली आहे. दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांवर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपाय शोधण्याचा तिचा प्रयत्न समाजोपयोगी संशोधनाचे महत्त्व अधोरेखित करतो.

चांडगावच्या मातीतून राष्ट्रीय स्तरावर झेप घेणाऱ्या कु. श्रद्धा रमेश लोंढे हिचे यश रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक परंपरेचा आणि ग्रामीण विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव करणारे आहे. तिच्या हातून भविष्यात अधिकाधिक समाजोपयोगी संशोधन घडावे, तिच्या कल्पकतेला व्यापक व्यासपीठ मिळावे आणि तिने यशाची नवनवीन शिखरे सर करावीत, अशा शुभेच्छा सर्व स्तरांतून व्यक्त होत आहेत.

# जागतिक हात धुवा दिनानिमित्त ठाणे जिल्ह्यात स्वच्छता व हात धुण्याबाबत जनजागृती उपक्रम संपन्न

## ग्रामपंचायती, शाळा, आरोग्य केंद्रे व अंगणवाड्यांमध्ये विविध उपक्रम; स्वच्छतेच्या सवयी अंगीकारण्याचे आवाहन

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

जागतिक हात धुवा दिनानिमित्त ठाणे जिल्ह्यातील ग्रामपंचायती, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य उपकेंद्रे, शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये स्वच्छता व हात धुण्याच्या सवयींबाबत जनजागृती करणारे विविध उपक्रम राबविण्यात आले. वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे, हात धुण्याच्या योग्य पद्धतींबाबत जागरूकता निर्माण करणे आणि स्वच्छ व निरोगी समाजनिर्मितीसाठी लोकसहभाग वाढविणे, हा या उपक्रमांचा प्रमुख उद्देश होता.

जिल्हा परिषद, ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित विभागांच्या समन्वयातून हे उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांना हात धुण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक देणे, ग्रामसभांमधून स्वच्छतेविषयी जनजागृती करणे, समुदाय बैठका आयोजित करणे आणि शाळांमध्ये जनजागृती रॅली काढणे अशा उपक्रमांचा समावेश होता.

हातांची स्वच्छता राखल्याने संसर्गजन्य आजारांचा धोका कमी करण्यास मदत होते. त्यामुळे जेवणापूर्वी, शौचालयाचा वापर केल्यानंतर तसेच हात अस्वच्छ झाल्यावर साबणाने हात धुणे आवश्यक आहे. विशेषतः बालकांमध्ये लहान वयापासून स्वच्छतेच्या सवयी रुजविण्यासाठी शाळा आणि अंगणवाडी स्तरावर जनजागृती करण्यात आली. हात धुण्याची योग्य पद्धत दैनंदिन जीवनात अंगीकारण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.





स्वच्छता उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना घनकचरा व्यवस्थापन, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खतनिर्मिती आणि प्लास्टिकचा वापर कमी करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच "3R' अर्थात Reduce (कमी वापर), Reuse (पुनर्वापर) आणि Recycle (पुनर्चक्रण) या संकल्पनांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

घरगुती कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करणे, कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावणे आणि सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# ब्राम्हणवाडा प्राथमिक केंद्र शाळेत वन चेतना फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. पंढरीनाथ पाबळे यांच्या दातृत्वातून आरओ प्लांटचे उद्घाटन!

**ब्राम्हणवाडा (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथील प्राथमिक केंद्र शाळेत वन चेतना फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. पंढरीनाथ तुकाराम पाबळे यांच्या दातृत्वातून आरओ प्लांट बसविण्यात आला. या आरओ प्लांटचे आज उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांना शुद्ध व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना मोठा लाभ होणार आहे. सामाजिक बांधिलकी जपत शैक्षणिक संस्थेला दिलेल्या या योगदानाचे उपस्थितांनी कौतुक केले.

या उद्घाटनप्रसंगी वन चेतना फाउंडेशनचे सर्व सदस्य,




केंद्रप्रमुख संदीप लबडे, मुख्याध्यापक दत्तात्रय गोपाळे सर, सोपान हुलवळे, डॉ. प्रदीप कुमकर, डॉ. निलेश कडाळी, गोरख पावडे, तुषार हुलवळे, मुराद पटेल, रितेश भळगट, मुक्तार मणियार, दीपक गोंदके, पत्रकार संजय गायकर, नवनाथ पवार तसेच ग्रामस्थ शौकत पटेल उपस्थित होते.

शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल वन चेतना फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. पंढरीनाथ तुकाराम पाबळे यांचे उपस्थितांनी आभार मानले. या उपक्रमाबद्दल मुख्याध्यापक दत्तात्रय गोपाळे सर आणि सोपान हुलवळे यांनी आभार व्यक्त केले. सामाजिक दातृत्वातून उभा राहिलेला हा उपक्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# विद्याधामच्या मुलींचा कबड्डी स्पर्धेत डंका

## १४ वर्ष मुली विजेतेपदाच्या मानकरी




**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेतील मुलींनी कबड्डी स्पर्धेत जिगरबाज खेळ करत विजेतेपद पटकावले.

अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय व श्रीगोंदा तालुका क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीगोंदा येथील महाराजा जिवाजीराव कॉलेज येथे श्रीगोंदा तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते .

यामध्ये विद्याधामच्या १४ वर्षे मुलींच्या संघाने आक्रमण आणि बचाव या दोघांचा मेळ घालत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन दाखवत येवती , घोगरगाव , खांडगाव व कोळगाव संघांचा पराभव करत विजेतेपद पटकावले.

या संघातील राजलक्ष्मी चव्हाण , श्रावणी सातव , तन्वी जाधव , ज्ञानेश्वरी सावंत , कार्तिकी वाखारे , वेदिका ढवळे , कल्याणी आढाव , श्रेया कावरे ,कार्तिकी कोकाटे , प्राची औटी यांनी सुरेख खेळ केला .

हा संघ अकोले येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत श्रीगोंदा तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहे .

१९ वर्ष वयोगटातील मुलींच्या कबड्डी संघाने उपविजेतेपद पटकावले. यातील श्रावणी टिळेकर, नागेश्वरी वाघमारे, प्रिती पवार, प्रांजल धोत्रे ,सायली गायकवाड, काजल शेलार , सानुका कोरके यांनी उत्कृष्ट खेळ केला.

या खेळाडूंना क्रीडा शिक्षक संदीप घावटे, अमोल कातोरे , कांता मांडगे, सोनाली वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

संस्थेचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर , सचिव नंदकुमार निकम ,शाळा समितीचे अध्यक्ष चंदुलाल चोरडिया, क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार , मुख्याध्यापक पी .जे . मेरगळ , पर्यवेक्षक एन .एस . डुंबरे , संजय देशपांडे , के .बी .काळे यांनी या निवडीबद्दल अभिनंदन करून विभागस्तर स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# इंदोरी येथे आदिशक्ती देवीच्या आरतीचा मान डॉ. विश्वासराव आरोटे व सौ. परीघा आरोटे यांना!

**अकोले (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील इंदोरी येथील पद्ममावती नगरमध्ये आदिशक्ती देवीची आरती महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे आणि चितळवेढे विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या संचालिका सौ. परीघा आरोटे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी परिसरातील भाविकांनी भक्तिभावाने देवीचे दर्शन घेतले.










या धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने मंदिरासाठी दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने सतरंजी व घड्याळ भेट देण्यात आली. धार्मिक आणि सामाजिक कार्यातून समाजाशी जोडलेली नाळ अधिक दृढ व्हावी, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक गीताराम आरोटे, अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष प्रकाश नवले, प्रवीण धुमाळ, नामवंत उद्योजक सखाराम आरोटे आणि अनिल धुमाळ यांच्यासह परिसरातील मान्यवर उपस्थित होते. धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे पद्ममावती नगर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

# अकोले तालुक्यात मित्रानेच मित्राचा घेतला जीव; पेढेवाडीच्या जंगलात गोळ्या झाडून हत्या, दोघांना अटक!

## प्रेमसंबंधांच्या संशयातून वाद; मृतदेह पालापाचोळ्याखाली लपवला, पोलीस तपासात हत्येचा उलगडा!

**अकोले (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील पेढेवाडी शिवारात मित्रांनीच आपल्या मित्राची गोळ्या झाडून हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. भोरु सोमा कातोरे (वय ३२, रा. दगडवाडी, ता. अकोले) असे मृत व्यक्तीचे नाव असून, या प्रकरणी धोंडू सोमा पथवे (रा. दगडवाडी) आणि नवनाथ नारायण कुलाळ (रा. पेढेवाडी) या दोघांना अकोले पोलिसांनी अटक केली आहे. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारच्या सुमारास ही घटना घडल्याचे समोर आले असून, न्यायालयाने दोन्ही आरोपींना पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मृत भोरु कातोरे आणि दोन्ही आरोपी हे एकमेकांचे मित्र होते. मात्र, आरोपींच्या जवळच्या नात्यातील एका मुलीशी भोरु जवळीक साधण्याचा प्रयत्न करत असल्याचा संशय आरोपींना होता. यावरून दोघांनी त्याला समजावून सांगितले होते. मात्र, त्याच्या वागण्यात बदल होत नसल्याचा आरोप असून, या कारणावरून त्यांच्यातील वाद वाढत गेला. अखेर भोरुचा काटा काढण्याचा कट रचल्याचा आरोप पोलिसांच्या तपासातून समोर आला आहे.

त्यानंतर आरोपींनी भोरुला सोबत घेतले. तिघांनी मद्यप्राशन केल्यानंतर त्याला पेढेवाडी शिवारातील घनदाट जंगलात नेण्यात आले. तेथे त्याला मारहाण करून गावठी बंदुकीतून बरगडीच्या खाली गोळ्या झाडण्यात आल्या. या हल्ल्यात भोरुचा मृत्यू झाला. हत्येनंतर पुरावा




लपविण्याच्या उद्देशाने मृतदेह जंगलात नेऊन त्यावर पालापाचोळा टाकण्यात आल्याचा आरोप आहे. दरम्यान, भोरु घरी परत न आल्याने त्याचा भाऊ मनाजी सोमा कातोरे यांनी अकोले पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी बेपत्ता असल्याची नोंद घेऊन तपास सुरू केला. तपासादरम्यान भोरुची दुचाकी बेवारस अवस्थेत आढळली. तसेच, तो बेपत्ता झालेल्या दिवशी आरोपींसोबत दिसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. संशय बळावल्याने पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. शवविच्छेदन अहवालातून मृत्यू हत्येमुळे झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर गुन्हा दाखल करून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संदीप कोळी करीत आहेत.

# जोर्वे विद्यालयात जागतिक हात धुणे दिन साजरा; स्वच्छ हात, निरोगी जीवनाचा संदेश!




**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

संगमनेर तालुक्यातील जोर्वे येथील समता विद्या मंदिर व शिल्प. मधुकरराव संतुजी थोरात कनिष्ठ महाविद्यालयात १५ ऑक्टोबर रोजी जागतिक हात धुणे दिन साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र गिते अध्यक्षस्थानी होते. अस्वच्छ हातांमुळे अनेक आजारांचा धोका वाढतो. शौचालयातून आल्यानंतर, जेवणापूर्वी, खेळून आल्यानंतर, प्राण्यांना स्पर्श केल्यानंतर तसेच कोणतेही काम केल्यानंतर साबणाने हात स्वच्छ धुणे गरजेचे आहे. हात न धुतल्यास जंतू शरीरात प्रवेश करून विविध आजारांना कारणीभूत ठरू शकतात. त्यामुळे स्वच्छ हात ही निरोगी जीवनाची गुरुकिल्ली आहे. हात धुवा, आजार घालवा, निरोगी राहा आणि हुशार बना, असे प्रतिपादन राजेंद्र गिते यांनी केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना हात धुण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त मराठी विषयाच्या शिक्षिका श्रीमती भांगरे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. श्रीमती शेवाळे यांनी प्रास्ताविकातून डॉ. कलाम यांचा जीवनपट उलगडला, तसेच विद्यार्थ्यांना वाचन संकल्पाची प्रतिज्ञा दिली. सांस्कृतिक विभागप्रमुख भाऊराव भांगरे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी शिक्षिका श्रीमती शिनगर यांनी जागतिक अंध दिनानिमित्त लुई ब्रेल यांची माहिती दिली.

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## जिल्हास्तरीय राज्य पुरस्कार चाचणी शिबिर उत्साहात संपन्न



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

भारत स्काउट्स आणि गाईड्स, अहिल्यानगर जिल्हा संस्था व जिल्हा परिषद शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय राज्य पुरस्कार चाचणी शिबिर उत्साहात संपन्न झाले. दि. १४ व १५ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या जिल्हा क्रीडा संकुल, वाडिया पार्क येथे पार पडलेल्या या शिबिरात रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे विद्यालयातील कर्मवीर भाऊराव पाटील पथकाच्या १५ स्काऊट्सनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये आत्मसात करण्याबरोबरच शिस्त, स्वावलंबन, नेतृत्वगुण आणि संघभावनेचे महत्त्व जाणून घेतले. या शिबिरात महादजी शिंदे विद्यालयाच्या वतीने राजवीर शंकर मखरे, आदित्य आनंदा लोखंडे, संग्राम महेंद्र कोतकर, वीरेन रोहिदास खेतमाळीस, वरुणराजे शिवाजी कोठारे, दिव्यराज पांडुरंग शिंदे, युवराज नितीन आमले, विश्वेश किशोर आगाशे, प्रथमेश नवनाथ कुंभार, युवराज लहू दबडे, सिद्धेश संभाजी मडके, करण विजय सप्ताळ, आनंदा अण्णा शिरवाळे, अर्णव विकास गायकवाड आणि शौर्यराज शिवाजी होलम या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शिबिराचे उद्घाटन जिल्हा आयुक्त (गाईड) तथा माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड आणि जिल्हा क्रीडाधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी त्यांनी सहभागी प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या. स्काऊट-गाईड चळवळ ही विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, स्वावलंबन, नेतृत्वक्षमता आणि समाजसेवेची भावना विकसित करण्यासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या शिबिरात जिल्हाभरातील एकूण ७० स्काऊट-गाईड प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. शिबिरादरम्यान जिल्हा संघटक (स्काऊट) अरुण पेशकार, जिल्हा संघटक (गाईड) सोनाक्षी तेलंगे यांच्यासह ईश्वर गायकवाड, अविनाश भोसले, संजय शिंदे, सागर साळवे, विकास रत्नपारखे आणि ज्ञानेश्वर धंडारे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. शिबिरप्रमुख म्हणून विकास लोखंडे यांनी जबाबदारी सांभाळली.

## कल्याणरोडच्या आराधना ज्ञानपीठच्या रेणुका माता मंदिरात नवरात्र महोत्सव

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

येथील नगर-कल्याण रोड,रेल्वे पुला पुढे, लिंक रोड चौक,स्वाद हॉटेल मागे असणाऱ्या आराधना ज्ञानपीठच्या रेणुका मातादिरात नवरात्रोत्सवास प्रारंभ झाला,यानिम्मिताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिरात दैनंदिन कार्यक्रम मध्ये पहाटे ५ वा.श्री रेणुका माता देवी महापुजा, श्री सद्गुरु पुजन , घंटानाद , देवी सप्तशती पाठ व पठण, सकाळी ७ वा. आरती,दुपारी १२ वा.आरती,सायंकाळी ७.आरती तसेच नित्य राजोपचार पुजन ,कुंकूमार्चन सेवा संपन्न होते,देवी यज्ञ स्वाहाकार सोमवार दि. १८ ऑक्टोबरला दुर्गाष्टमी दिवशी होणार आहे तर विजया दशमी मंगळवार दि.२० ऑक्टोबर रोजी सिमोल्लंघन पुजातसेच रविवार दि.२५ ऑक्टोबरला कोजागिरी पौर्णिमा निमित्त कुलधर्म कुलाचार देवी नवचंडी यज्ञ होणार आहे. कल्याणरोड वरील आयएमए भवना समोर ८ हजार स्के. फुट जागेत असलेल्या आराधना ज्ञानपीठ मध्ये माहूरगड निवासिनी रेणुका मातेचे मंदिर ८ वर्षांपूर्वी बांधण्यात आले आहे यामध्ये रेणुका माता मूर्ती तसेच सिध्दिविनायक गणेश व हंसतीर्थ स्वामी महाराज मूर्ती आहेत. मंदिर हे ४० ३०फुटाचे असून उंची १६ फूट आहे , दाक्षिण्यात्य पद्धतीने हे बांधण्यात आले असून मंदिरावर चार वेद,चार सिंह,गायत्री मातेची मूर्ती, रेणुका,शिव पार्वती,सरस्पती देवीची मूर्ती व द्वारशक्ती मूर्ती आहेत,मंदिराच्या गाभाऱ्यात रेणुका माता मूर्तीवर नित्य पूर्वेकडील व पश्चिमेकडील सूर्यनारायणाचे तेज व दिव्याच्या प्रकाशात देवीची सेवा होत आहे.



## वक्तृत्व स्पर्धेत प्रिशा आठरे हिचा प्रथम क्रमांक; तालुकास्तरीय स्पर्धेसाठी निवड

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)



सेवा संकल्प अभियानांतर्गत आयोजित श्रीगोंदा केंद्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, श्रीगोंदा मुले येथील कु. प्रिशा प्रदीप आठरे हिने लहान गटातून प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशामुळे तिची श्रीगोंदा तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी निवड झाली आहे. श्रीगोंदा केंद्रातील २३ शाळांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. या स्पर्धेत प्रिशाने आपल्या प्रभावी वक्तृत्वाच्या जोरावर प्रथम क्रमांक मिळवत शाळेचा नावलौकिक वाढविला. तिच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. स्पर्धेतील यशाबद्दल केंद्रप्रमुख श्री. उत्तरेश्वर मोहळकर यांच्या हस्ते प्रिशाला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या यशासाठी शाळेचे मुख्याध्यापक अनिल तिखे सर, वर्गशिक्षिका अर्चना ढगे मॅडम तसेच मार्गदर्शक विद्या हराळ मॅडम यांचे तिला मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रिशाच्या या यशाबद्दल शाळेतील शिक्षकवृंद, पालक व शिक्षणप्रेमींनी तिचे अभिनंदन केले आहे. आता तालुकास्तरीय स्पर्धेतही ती यश संपादन करेल, असा विश्वास व्यक्त करत तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवलेंचा मराठवाड्यात दुष्काळी दौरा

■ वाढीव निधी दिवाळीपूर्वीच दुष्काळग्रस्तांना मिळवुन देणार
■ दुष्काळग्रस्त शेतक-यांना हेक्टरी ५० हजारांची मदत द्यावी रिपब्लिकन पक्षाची मागणी







संभाजीनगर/मुंबई (समर्थ गांवकरी)

राज्य सरकारने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली ५ हजार रुपयांची अग्रीम मदत दिवाळी सणासाठी अत्यंत अपुरी असून, दुष्काळग्रस्तांना वाढीव मदत दिवाळीपुर्वीच मिळवुन देंण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. दुष्काळग्रस्त शेतक-यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत राज्य शासनाने त्वरीत द्यावी अशी रिपब्लिकन पक्षाची मागणी आहे. त्यासाठी आपण लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी सांगितले.

छत्रपती संभाजीनगरमधील आडगाव सरक या गावाला भेट दिली. या गावातील बाजरी, कापुस, मका, तुर या पिकांची मोठी हानी झालेली आहे. कपाशीच्या पिकांमध्ये प्रत्यक्ष जावुन शेतक-यांशी ना. रामदास आठवले यांनी संवाद साधला. पिकांची प्रत्यक्ष जावुन पाहणी केली. यावेळी दुष्काळग्रस्त शेतक-यांना हिम्मत देत त्यांना लवकरच वाढीव मदत देण्याचे आश्वासन देवुन दुष्काळग्रस्त शेतक-यांना धीर देण्याचा प्रयत्न ना. रामदास आठवले यांनी केला. त्यानंतर ना. रामदास आठवले यांनी जालना जिल्ह्यातील देवगाव, कुसळी या गावांना भेट देवुन तेथील शेत पिकांच्या झालेल्या नुकसानाची पाहणी केली. तसेच शेतक-यांशी संवाद साधला. शेतक-यांना धीर दिला. यावेळी त्यांच्या सोबत स्थानिक आमदार अनुराधाताई चव्हाण, रिपब्लिकन पक्षाचे राज्य कार्याध्यक्ष बाबुराव कदम, मराठवाडा अध्यक्ष मिलींद शेळके, ॲड. ब्रम्हानंद चव्हाण , दौलत खरात, विजय मगरे, बाळकृष्ण इंगळे, रमेश अण्णा मुळे, राजाकिसन पटाळे, डॉ. नारायण पंढापी आदि मान्यंवर उपस्थित होते.

ना. रामदास आठवले सध्या राज्याच्या दोन दिवसीय दुष्काळ पाहणी दौऱ्यावर आले आहेत. यावेळी बोलताना ते म्हणाले की, शेतकऱ्यांवर मोठे संकट आले असून सरकारने जाहीर केलेली ५ हजारांची मदत पुरेशी नाही. ही मदत वाढवून मिळण्यासाठी आपण केंद्र सरकारकडे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करणार आहोत. दुष्काळामुळे माणसांप्रमाणेच जनावरांचीही अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. भविष्यात असे दुष्काळी संकट पुन्हा उद्भवू नये, यासाठी पर्यावरणाचे रक्षण करण्याला आणि वृक्षारोपणाला विशेष महत्त्व देण्याची गरजही ना. रामदास आठवले यांनी यावेळी व्यक्त केली. राज्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्राचे पथक नुकतेच येऊन गेले आहे. या पथकाचा अहवाल प्राप्त होताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार राज्याला लवकरच भरीव आर्थिक मदत करेल, असा विश्वासही ना. रामदास आठवले यांनी यावेळी व्यक्त केला. या पत्रकार परिषदेत ना. रामदास आठवले यांनी केवळ दुष्काळावरच नव्हे, तर राजकीय मुद्द्यांवरही भाष्य केले. राज्यपाल नियुक्त विधान परिषदेच्या रिक्त असलेल्या पाच जागांपैकी किमान एक जागा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला (RPI) मिळावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली आहे. त्यांच्या या मागणीमुळे महायुतीमधील जागावाटपाच्या चर्चेत आता आरपीआयनेही आपला वाटा मागितल्याचे स्पष्ट झाले आहे.

## वीज कंत्राटी कामगारांचे २७ ऑक्टोबरला आंदोलन; संघटनेचे एकजुटीचे आवाहन

अकोले (समर्थ गांवकरी)

**प्रलंबित मागण्यांवर ठोस निर्णय घेण्याची मागणी; मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक घेण्याची मागणी**

महावितरणमधील वीज कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित मागण्यांवर ठोस निर्णय घ्यावा, या मागणीसाठी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ (संलग्न : भारतीय मजदूर संघ) यांच्यावतीने २७ ऑक्टोबर २०२६ रोजी आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात राज्यातील सर्व वीज कंत्राटी कामगारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कंत्राटी कामगार महासंघाचे जिल्हा सचिव सचिन पाटील यांनी केले आहे.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी १३ ऑक्टोबर रोजी मुंबई येथे मंत्रालय, प्रकाशगड, कामगार आयुक्त कार्यालय आणि वांद्रे पोलीस ठाणे येथे आंदोलनाची नोटीस सादर केली. तसेच ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची भेट घेऊन कामगारांच्या समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक घेण्याची मागणी केली. यावेळी भारतीय मजदूर संघाचे प्रदेश महामंत्री किरण मिलगीर कंत्राटी कामगार महासंघाचे अध्यक्ष निलेश खरात सचिव सचिन मेंगाळे आदी उपस्थित होते.

वारंवार आश्वासने मिळूनही मागण्यांवर प्रत्यक्ष कार्यवाही होत नसल्याने संघटनेने आंदोलनाची भूमिका घेतली आहे. आगामी आंदोलनासह पुढील टप्प्यांतही कामगारांनी संघटनेच्या अधिकृत सूचनांनुसार सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

आता केवळ आश्वासने नकोत, तर ठोस निर्णय हवा, अशी भूमिका मांडत कामगारांच्या हक्कांसाठी एकजुटीने लढा देण्याचे आवाहन संघटनेने केले आहे.

# नवीन लोकप्रतिनिधीचे भोजापुर चारित योगदान काय ?

## नदीजोड प्रकल्प सांगून तालुक्याचे पाणी पळवले जात आहेत त्यावर बोला, सचिन दिघे यांचा सवाल

संगमनेर (समर्थ गांवकरी)

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून भोजापुर चारी पूर्ण झाली आहे. मागील वर्षी आणि याही वर्षी सुरुवातीला चांगला पाऊस झाला त्यामुळे पाणी आले. चारी तयार करून ठेवली होती म्हणून पाणी आले. या चारी मध्ये तुमचे योगदान काय असा सवाल करताना तालुक्याचे पाणी पळवले जात असताना नवीन प्रतिनिधी त्यावर एक शब्द बोलत नाही भोजापूर आणि नदीजोड प्रकल्पाची टिमकी वाजवत असल्याची टीका युवक कार्यकर्ते सचिन दिघे यांनी केली आहे.

तळेगाव दिघे येथील युवक कार्यकर्ते सचिन दिघे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की तळेगाव विभाग आणि दुष्काळी भागासाठी लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी निळवंडे धरण व कालवे पूर्ण केले. भोजापुर धरणातून चारीच्या माध्यमातून निमोण व परिसरासाठी पाणी देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला ही चारी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून तयार झाली.

ज्या ज्या वेळेस चांगला पाऊस झाला त्या त्या वेळेस पाणी नान्नज दुमाला तळेगाव भागाला मिळाले. यावर्षी सुरुवातीला चांगला पाऊस झाला त्यामुळे पाणी आले.

चारी होती म्हणून पाणी नवीन लोकप्रतिनिधी ने काय केले. मागील दोन वर्षांमध्ये तालुक्यामध्ये एकही नवीन काम नाही तळेगाव विभागामध्ये एकही नवीन काम नाही फक्त फ्लेक्स बाजी एवढेच काम आहे.

जनता आपली कामे घेऊन आजही यशोधन कार्यालयातच जात आहे आमदार सत्यजित तांबे व डॉ जयश्रीताई थोरात यांच्या पाठपुराव्यातून सर्वसामान्य जनतेची शासकीय कामे तत्परतेने मार्गी लागत आहे. नवीन लोकप्रतिनिधीला ठोस कोणतेही काम करता आले नाहीत शासनाकडे पैसा नाही. रस्त्यांची कामे होत नाहीत साधे संजय गांधी निराधार योजनेचे सुद्धा देणे थकले आहे. दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे पिण्याच्या पाणी चाऱ्याचा प्रश्न असे अनेक प्रश्न आहेत.



नवीन लोकप्रतिनिधी मूलभूत प्रश्नांवर बोलले पाहिजे. नदी जोड प्रकल्प त्यावर बोलण्यापेक्षा तालुक्याचे पाणी जाते त्यावर बोला. दुष्काळी परिस्थिती आहे त्यावर बोला पिक विमा का मिळाला नाही त्यावर बोला. तालुक्याची रेल्वे पळवली गेली त्यावर बोला. यावर शब्दही न बोलता भुलभुलय्या केले जात असल्याची ती काही त्यांनी केली. तळेगाव मधून शिवसेनेमध्ये नव्याने कोणाचाही प्रवेश झाला नाही जे होते तेच लोक पुन्हा अंगावर झूल टाकून मिरवत आहे.

## नवनागापूर पाणीप्रश्नाला आ. दातेंच्या पाठपुराव्याने गती

### जलजीवन मिशनअंतर्गत ३०० मिमी नवीन पाणीवाहिनीच्या कामाचा मार्ग मोकळा

पारनेर (समर्थ गांवकरी)



शुक्रवार दि. १६ आक्टो. २०२६ नवनागापूर (ता. नगर, जि. अहिल्यानगर) येथील पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नवीन ३०० मिमी पाणीवाहिनीच्या कामासाठी आवश्यक मंजुरी मिळवून देण्याच्या प्रक्रियेत आमदार काशिनाथ दाते सर यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. या कामाला गती मिळाल्याने नवनागापूर येथील ग्रामस्थांनी आमदार काशिनाथ दाते सर यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले.

नवनागापूर गावातील पाणीपुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी जलजीवन मिशनअंतर्गत नवीन पाणीवाहिनी टाकण्याचे काम प्रस्तावित होते. या कामासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया आणि मंजुरीसंदर्भात ग्रामपंचायतीच्या वतीने संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत होता. या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन ग्रामस्थांनी आमदार काशिनाथ दाते सर यांच्याकडेही निवेदनाद्वारे मागणी केली होती.

गावाच्या पाणीप्रश्नाची दखल घेत आमदार दाते सर यांनी संबंधित स्तरावर पाठपुरावा केल्याने या कामाला पुढे नेण्यासाठी मदत झाली. पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम होण्याच्या दृष्टीने हे काम महत्त्वपूर्ण ठरणार असून, ग्रामस्थांना त्याचा लाभ मिळण्याची अपेक्षा आहे.

गावाच्या मूलभूत गरजांपैकी पाणी हा अत्यंत महत्त्वाचा विषय असल्याने या कामासाठी सहकार्य केल्याबद्दल ग्रामस्थांनी आमदार दाते सरांचे आभार व्यक्त केले. यावेळी दिलीप दादा दाते, प्रशांत दादा गायकवाड, अप्पासाहेब सप्रे, राहुल सप्रे, संजय भोर, श्रीकांत पवार, रामदास अडसूरे, रत्नकांत दरेकर, शंकर पवार, केतन तारडे, संकेत तागडकर, बजरंग काळे आणि प्रदोष सांगळे यांच्यासह अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देऊन पाणीपुरवठ्यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर सातत्याने पाठपुरावा करण्याची भूमिका आमदार काशिनाथ दाते सर यांच्या कार्यातून अधोरेखित होत आहे. नवनागापूरच्या पाणीप्रश्नाच्या दृष्टीने हे काम महत्त्वाचे ठरणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

## दुष्काळजन्य परिस्थितीत पर्जन्यवृष्टी व्हावी यासाठी भक्ताची देवी मंदिरात श्री चक्र पूजन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)





येथील शनी गल्लीतील विवेकानंद चौकामध्ये असलेल्या भक्ताची देवी मंदिरात गुरुवर्य डॉक्टर श्री पंकज शास्त्री घेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य श्री चक्र पूजन व ललिता त्रिपुरसुंदरी नवशक्ती अर्चन महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला .

नवरात्र निमित्त रेणुका महिला मंडळ आयोजित विविध कार्यक्रमात मंदिरात दुष्काळजन्य परिस्थित त पर्जन्यवृष्टी व्हावी यासाठी भक्ताची देवी मंदिर मयेथे श्री चक्र पूजन ललिता त्रिपुरसुंदरी नवशक्ती अर्चन चे नरेंद्र कुलकर्णी व गायत्री कुलकर्णी यांनी आयोजन केले होते यावेळी जेष्ठ नेते अभय आगरकर, माजी नगराध्यक्षा अनिता आगरकर, नगरसेवक संभाजी कदम, माजी महापौर सुरेखा कदम एलसीबी चे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व कविता मुटकुळे, संतोष गेनप्पा , नगरसेविका सुनीता गेणाप्पा , सचिन पारखी, वाल्मीक कुलकर्णी ,मंदार मुळे, कुलकर्णी सर आदींसह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

पंकज शास्त्री यांनी ही पूजा केली तर दिनेश निसळ गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वश्री पुरोहितअभिजीत निसळ , तेजस मुदगल, चैतन्य लाखे ,अथर्व करपे, राजेंद्र पानमळकर गुरुजींनी त्यांना सहकार्य केले ललिता पंचमीच्या तिथीला ही पूजा केली जाते यामध्ये हिरण्यर्चन, पुष्पार्चन, फळा र्चन, कुमकुमार्चन आदी करण्यात आले त्यासाठी काजू , बदाम ,मनुके, सुपारी, पिस्ता ,खारीक, अंजीर , खजूर ,नाणे, खोबरे , फळ, कुंकू , हळद,बेलपण, दुर्वा आदी प्रत्येकी १,१०० वापरण्यात आले, अर्चनानंतर हे सर्व भक्तांना प्रसाद रूपात वाटण्यात आले.

# डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेमुळे १०० महिलांच्या पंखाला बळ

## एकविराच्या माध्यमातून टेलरिंग व आरी वर्क प्रशिक्षण

संगमनेर (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली एकविरा फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून महिलांना गृहउद्योग व व्यवसायासाठी व्यासपीठ मिळावे याकरता ७५ महिलांना टेलरिंग व २५ आरी वर्क प्रशिक्षण देण्यात आल्या असून या माध्यमातून या महिलांना स्वयंरोजगाराच्या साठी बळ मिळाले आहे. यशोधन कार्यालय येथे टेलरिंग व आरी वर्क प्रशिक्षण पूर्ण केलेल्या १०० महिलांना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी डॉ.नितीन भांड, रामदास तांबडे, प्रशिक्षक श्रीमती शिला करंजेकर, दिव्या मयूर काळे, समन्वयक शर्मिला हांडे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ.जयश्रीताई थोरात यांनी एकविरा फाउंडेशनच्या माध्यमातून तालुक्यातील महिलांना व युवतींना रोजगार व स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण मिळावे याकरता टेलरिंग व आरी वर्क चे प्रशिक्षण क्लास यशोधन कार्यालय परिसरात सुरू केले आहे. या क्लास मधून आत्तापर्यंत तालुक्यातील ५५० महिलांनी प्रशिक्षण पूर्ण केले असून नव्याने ७५ महिलांनी टेलरिंग व २५ महिलांनी दीड महिन्यांचे आरिवर्क प्रशिक्षण पूर्ण केले आहे. या माध्यमातून रोजगारासाठी त्यांना बळ मिळाले आहे.

यावेळी बोलताना शीला करंजेकर म्हणाल्या की, महिलांनी कुटुंबाची जबाबदारी कायम सांभाळली आहे. आर्थिक स्रोत निर्माण करण्यासाठी घरगुती व्यवसाय स्वयंरोजगार हा अत्यंत गरजेचा झाला आहे जेणे करून आपण कुटुंबाला हातभार लावू शकतो. याचबरोबर सातत्याने कामात राहिल्याने महिलांचे आरोग्य ही चांगले राहते डॉक्टर जयश्रीताई थोरात यांनी सुरू केलेल्या या उपक्रमांमधून अनेक महिलांना व्यवसाय व स्वयंरोजगाराची मोठी संधी आणि व्यासपीठ निर्माण झाले असल्याचे त्या म्हणाल्या.

डॉ. नितीन भांड म्हणाले की, यशोधन कार्यालय हे जनसेवेच्या विश्वासाचे कार्यालय आहे. नागरिकांच्या विविध प्रश्न व समस्या सोडवण्यासाठी यशोधनच्या माध्यमातून लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने प्रयत्न होत असून महिलांसाठीही स्वयंरोजगाराची चांगली संधी एकविरा फाउंडेशनने निर्माण करून दिले असल्याचे ते म्हणाले.




तर शर्मिला हांडे म्हणाल्या की, महिलांच्या स्वयंरोजगार बरोबर डॉक्टर जयश्रीताई थोरात यांनी महिलांच्या आरोग्यासाठी मोठे काम केले आहे. गावोगावी सातत्याने आरोग्य शिबिर होत असून महिलांची तपासणी केली जात आहे. ज्या महिलांमध्ये तपासणी मध्ये काही आढळल्यास एसएमबीटी ट्रस्टच्या माध्यमातून महिलांना आरोग्याबाबतचे मार्गदर्शन व मोफत उपचार केले जातात. महिला सक्षमीकरणाचा हा उपक्रम राज्यासाठी दिशादर्शक ठरत असून तालुक्यातील महिला व युवतींनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले आहे. यावेळी सर्व महिलांना प्रमाणपत्र व आरी वर्क केलेले पिशव्या व साहित्य वाटप करण्यात आले.